म. ग्र. सं. ठाणे
विषय मु. प्रवास
सं. क्र. ३०५




# चित्रांजली

REFBK-0012213

दलाल आर्ट स्टूडिओ प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रमांक ३९६५६ दि
३०५




REFBK-0012213

मग हें रसभाव फुलीं फुलेल।
नानार्थ फळभारें फळा येईल।
तुमचेनि धर्में होईल।
सुरवाडि जगा॥

—ज्ञानदेव

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १२२१२

प्रकाशक :
**दीनानाथ दलाल**
दलाल आर्ट स्टूडिओ
४२, केनेडी ब्रिज, मुंबई ४

●

एकमेव विक्रेते
**अ. अं. कुलकर्णी**
कॉन्टिनेण्टल प्रकाशन
टिळक रोड, पुणें २

●

प्रकाशन दिनांक
श्रीगणेश चतुर्थी, १४-९-६१

●

सर्व हक्क सुरक्षित
मूल्य : रु. ७॥

●

मुद्रक
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४



भरोनि सद्भावाची अंजुली ।
मियां वोंविया फुलें मोकळीं ।
अर्पिली अंघ्रियुगुलीं ।
विश्वरूपाच्या ॥

# श्रेयनामावलि

१२ रंगीत कलाकृति : दीनानाथ दलाल

## साहित्य

▪ पु. भा. भावे ▪ ग. दि. माडगूळकर ▪ बा. भ. बोरकर ▪ मंगेश पाडगांवकर ▪ राजा बढे ▪ कुसुमाग्रज ▪ सदानंद रेगे ▪ शां. शं. रेगे ▪ बाळ सामंत ▪ लोककवि श्री. मनमोहन ▪ शिरीष पै ▪ भय्यासाहेब ओंकार ▪ गोपालकृष्ण भोबे ▪ शंकर वि. वैद्य ▪ शान्ता ज. शेळके ▪ मधुकर केचे ▪ वृन्दा लिमये


## प्रकट आभार


आपल्या भारतीय संस्कृतीचें दर्शन बहुजनसमाजाला चित्ररूप-साहित्याने व्हावें म्हणून प्रामाणिकपणें केलेल्या आमच्या प्रयत्नांना, सर्व लेखक व कवि बंधूंनी मनःपूर्वक सहकार्य दिल्याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. तसेंच थोड्या वेळांत पुस्तकाची सुबक छपाई केल्याबद्दल मौजेचे श्री. वि. पु. भागवत, तिरंगी चित्रांची अप्रतिम छपाई करणारे आशा प्रिंटरीचे श्री. मालपेकर आणि सर्व तऱ्हेच्या कामांत आपुलकीने नेहमींच मदत करणारे श्री. गोपालकृष्ण भोबे, श्रीकृष्ण ठाकूर व श्री. परब यांचे कृतज्ञतापूर्वक आभार !

—प्रकाशक

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३२६५६ वि:
क्रमांक नों दि:



# चित्रांजळी



# मंगलमूर्ति

*ॐकाररूपी भगवान् यो वेदादौ प्रतिष्ठितः ।*
*यं सदा मुनयो देवाः स्मरन्तीन्द्रादयो हृदि ।।*
*यं पूजयन्ति सततं ब्रह्मेशानेन्द्रविष्णवः ।*
*यो हेतुः सर्वजगतां सर्वकारणकारणम् ।।*

—गणेशपुराण

*ॐकारस्वरुपी गजानन असे जो आदि वेदांहुन*
*ज्या इंद्रादिक देव आणिक मुनी ध्यातात रात्रंदिन*
*ब्रह्मा, शंकर, इंद्र, विष्णु करिती ज्याचें सदा पूजन*
*विश्वा कारण सर्व तोच !—सगळ्या तो कारणां कारण*

—शंकर वि. वैद्य



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 72273

# ऋद्धिसिद्धीचा नायक
# सुखदायक भक्तांसी



सुखकर्ता, दुःखहर्ता, गणनायक गणेशाच्या जन्मासंबंधी अनेक कथा प्रचलित आहेत. वराहपुराणांत आढळणारी गणेशजन्माची घटना बरीच निराळी वाटते.

वारंवार आपल्या मार्गांत येणाऱ्या विघ्नांचें निवारण कोणत्या उपायांनी करावें, अनंत काळपर्यंत युद्धें करून आटोक्यांत न येणाऱ्या दानवांचा कायमचा बंदोबस्त कोणत्या युक्तीने करावा यासंबंधी एक भलें मोठें प्रश्नचिन्ह सर्व देवांसमोर उभें होतें; परंतु समस्या कांहीं सुटेना. वेदशास्त्र-स्मृतींचा अधिपति विरंचि, तोसुद्धा हतबुद्ध झाला होता. शेवटीं पाश, पितृप, पावक, पुरुहूत आदि सर्व देव, शतकोटींचें बीज वाचे उच्चारीत अर्धांगी पार्वतीसहित ध्यानस्थ असलेल्या श्रीशंकरांजवळ आले, आणि त्यांनी आपलें गाऱ्हाणें सांगितलें. महादेवांनी निर्निमेष नेत्रांनी आदिमाये-

कडे पाहिलें, आणि त्याच वेळीं त्या रुद्राच्या मुखांतून परमतेजस्वी दैदीप्यमान असा एक युवक प्रकट झाला. त्याची दिव्य कांति आणि अलौकिक असें सौंदर्य पाहून देवलोकांतल्या सर्व स्त्रिया त्याच्यावर लुब्ध झाल्या. याचा भावी परिणाम आदिमायेने ओळखला व रागाने तिच्या मुखांतून शापवाणी निघाली कीं, "हे युवका, तूं गजमुख तथा लंबोदर होशील आणि सर्पाचें यज्ञोपवीत सदैव अंगावर राहिल्याने सामान्य स्त्री तुझ्याजवळ फिरकूं शकणार नाही!" पार्वतीनें दिलेला हा अकारण शाप महादेवांना सहन झाला नाही. क्रोधाविष्ट होऊन त्यांनी आपलें सारें शरीर घुसळलें. त्या घुसळण्याने त्यांच्या रोमरोमांतून गजमुखी आणि करड्या रंगाचे असंख्य विनायक उत्पन्न झाले. सर्व ब्रह्मांड कांपूं लागलें, देव भयभीत झाले. विधात्याने स्तुति करून महादेवांना शांत केलें. महादेवांनी आपल्या मुखांतून उत्पन्न केलेल्या त्या पुत्राला या सर्व विनायकांचें सेनापतित्व देऊन आशीर्वाद दिला की, यापुढे प्रत्येक शुभकार्यांत सर्वप्रथम तुझी पूजा केली जाईल. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला ही गोष्ट घडली म्हणून गणेशचतुर्थी या नांवाने ती विख्यात आहे.

ब्रह्मवैवर्त पुराणांत—विवाहानंतर पार्वतीने श्रीकृष्णाचें व्रत केल्याकारणाने तिला एक पुत्र झाला; या पुत्राला पाहायला सर्व देवांसमवेत शनिदेवहि आले होते, परंतु त्यांनीं मान खालींच घातली होती; त्याचें कारण पार्वतीने शनिदेवांना विचारलें तेव्हां कारण सांगायला उचललेली मान गौरीला घातक ठरली; शनिदेवांची दृष्टि मुलावर पडली आणि मुलाचें शिर धडावेगळें झालें; श्रीविष्णूंनी हत्तीचें शिर आणून मुलाला पुनर्जीवित केलें आणि मांगल्याच्या प्रथम क्षणीं तुझी पूजा केली जाईल असा त्याला वर दिला—अशी कथा आहे.

स्कंद पुराणांत गणेशाचा जन्म पार्वतीच्या अंगच्या मळापासून झालेला आहे. तर कांही ठिकाणीं—पार्वतीने आंघोळीला जातांना कापसाचा बाहुला करून अमृतदृष्टीने त्याला सजीव केलें आणि द्वाररक्षणासाठी ठेवलें; इतक्यांतच महादेवाचें आगमन झालें, आणि उभयतांत युद्ध होऊन तो

बाहुला जेव्हा महादेवांना आटोपेना तेव्हा आपल्या त्रिशूळाने महादेवांनी त्याचें शिर धडापासून वेगळें केलें; आणि फिरून पार्वतीचा हट्ट पुरविण्यासाठी हत्तीचें शिर लावून त्याला सजीवहि केलें; पतिपत्नींनी अनेक वर देऊन देवाच्या देवाहूनहि थोर असें पद त्याला दिलें; तोच हा मंगलमूर्ति मोरया—अशीहि कथा सांगितलेली आहे. आदिदेव गणेशजींच्या मातृभक्तीपेक्षा पितृभक्तीच्या कथा जास्त आहेत. महादेवांनी आपल्या भोळ्या स्वभावाने ओढवून घेतलेल्या संकटांचा परिहार या बुद्धीच्या नायकाने मोठ्या कुशलतेने केलेला आहे. त्यासाठी त्यांना कराव्या लागलेल्या विदूषकीपणाच्या गोष्टींनी आबालवृद्धांना अनादिकालापासून खदखदून हसवलेलें आहे. परंतु या भालचंद्राच्या जीवनांतली सर्वांत प्रमुख घटना म्हणजे महाभारताचें त्यांनी केलेलें लेखन. कृष्णद्वैपायनांनी ज्यावेळीं त्यांना लेखनसाहाय्याची विनंती केली त्यावेळीं त्यांनी आपल्या अभिजात विनोदबुद्धीला अनुसरून व्यासांना विलक्षण अट घातली : "मीं लेखनसाहाय्य करतों; परंतु माझी लेखणी अडतां कामा नये." व्यासांनींहि आव्हानाचा स्वीकार केला. दर सव्वाशे श्लोकांनंतर एक कूटश्लोक व्यास सांगायचे आणि वक्रतुंड गणराज तो सोडवत बसायचे. त्या अवधींत पुनश्च सव्वाशे श्लोक भारतीच्या त्या महान आधारवडाने तयार करायचे. अशा गमतींत महाभारत लिहून झालें.

केवळ भरतखंडाच्या संस्कृतींतच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडांत गणपतीच्या मूर्तीच्या पूजनाची प्रथा होती असें आढळून येतें. जावांत आणि मलायांत गणपतीच्या पंचधातूच्या तसेंच प्रस्तराच्याहि मूर्ति सापडलेल्या आहेत. बाली द्वीपांत देखील चारी बाजूंना ज्वाळांनी रेखित अशा सिंहासनावर अधिष्ठित असलेली गणराजाची मूर्ति मिळाली आहे. तिथल्या राजांच्या व राण्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या प्रतिमा तयार करून त्यांना देवपद देण्यांत येई आणि त्यांच्या त्या प्रतिमांच्या प्रतिष्ठापनेनंतर दक्षिणेला गणेशाची एक मूर्ति बसवण्यांत येई. जावांत कांहीं भीतिप्रद अशा ठिकाणीं गणपतीची मूर्ति स्थापलेली आढळते. अशा मूर्तींतली एक मूर्ति हॉलंड येथील म्यूझियममध्ये

ठेवलेली आहे. ब्रह्मदेशांत गणपतीची 'महापिएन' या नांवाने पूजा केली जाते. फार काय अजूनहि सयाम, काम्बोडिया आदि देशांत गणेशाची पूजा विघ्नहर्ता याच नात्याने केली जाते. चीनमध्ये तर कांहीकांही ठिकाणीं बुद्धाच्या मूर्तीबरोबरच सूर्य, चंद्र, कामदेव आणि गणपति यांच्याहि मूर्ति आहेत. जपानांत आढळणाऱ्या गणपतीच्या मूर्तीच्या हातांत मुळा दिलेला असतो. गणपतीला मुळ्याची भाजी फार प्रिय आहे, असा तिथे समज आहे. तुर्कस्थानांतहि शिवकार्तिकेयांसहित गणपतीचें चित्र संशोधकांना सापडलेलें आहे. असा हा आमच्या आदिदेवाचा अनेक खंडांतला विस्तार!

ऐतिहासिक सत्यांच्या खरेखोटेपणाचा कीस काढणाऱ्या संशोधकांनी गणेशाला सोडलेलें नाही. त्यांच्या मतें रामायणांत गणपतीचा उल्लेख नाही. महाभारतांत जो गणेशाचा उल्लेख आहे तो निव्वळ घुसडलेला वाटतो असेंहि संशोधक म्हणतात. वास्तविक महाभारत व्यासांनी सांगितलें आणि गणेशांनी तें लिहिलें, तेव्हा स्वतःबद्दलचा उल्लेख त्यानें विनयाने टाळला असला पाहिजे हें उघड आहे. 'विद्या विनयेन शोभते' असें म्हणतात— मग विद्यादात्याजवळ तो भरपूर असला पाहिजे! असो!

याज्ञवल्क्याने गणपतीला विघ्नेश असें म्हटलेलें आहे; परंतु गणेश-पुराणांत त्याचा स्पष्टार्थ असा सांगितला आहे की, कोणत्याहि शुभकार्याच्या आरंभीं त्याला आमंत्रण करून त्याची प्रथम पूजा केली नाही तरच रागाने त्या कार्यांत तो विघ्न निर्माण करतो, आणि त्यामुळे कार्यारंभीं त्याची आळवणी केली जाऊं लागली. ख्रिस्तपूर्व काळांतील विघ्नेश गणपतीचें स्वरूप पालटून आज त्याला विघ्नहर्त्याचें रूप मिळालें आहे असेंहि अनेकांचें म्हणणें आहे.

मनूच्या नांवावर मोडणाऱ्या एका श्लोकांत गणेश हा हीन यातींचा देव असा निर्देश आहे. ऋग्वेदांतील 'गणानां गणपति' हा उल्लेख बृहस्पतीला उद्देशून आहे असेंहि संशोधक सांगतात. गणेशाचा अत्यंत प्राचीन असा उल्लेख तेराव्या शतकांत लिहिल्या गेलेल्या जयद्रथ या काश्मिरी पंडिताच्या 'हरचरित्र' या ग्रंथांत सांपडतो. त्याचा एक दांत दशमुखी रावणानें तोडला अशी कथा त्यांत आहे; तर 'शिशुपालवधां'त हें काम परशुरामाने केल्याचा

निर्देश आढळतो. कांहींच्या मतें तो राक्षस असावा तर कांहींनी त्याला हत्तीचें बनावट शिर घालणाऱ्या आदिवासींचा नायक बनवलेलें आहे. शेतांचा नाश करणाऱ्या उंदरावर दहशत म्हणून गजमुख देवतेची निर्मिति झाली असेंहि कांही म्हणतात. परंतु हें सर्व आधुनिक संशोधन अभिजात भाविकांना पटणारें नाहीं. गणेशाची नित्य उपासना प्रामुख्याने दक्षिणेंत होते. त्रावणकोर येथें गणपतीचीं अवाढव्य देवळें आहेत. महाराष्ट्रांत पाली, थेऊर, लेण्याद्रि, ओझर, रांजणगांव, चिंचवड, पुळें, परळी वैजनाथ आदि स्वयंभू गणेशस्थानें प्रसिद्ध आहेत.

महाराष्ट्रांतील सर्व संतांनीं आणि शाहिरांनीं लेखनारंभीं त्याला पहिला मानाचा मुजरा केलेला आहे. ज्ञानेश्वरांनीं 'सर्वांचा आदि' म्हणून वंदन करून "अकार चरणयुगल। उकार उदर विशाल। मकार महामंडल। मस्तकाकारें॥ हे तिन्ही एकवटले। तेथ शब्दब्रह्म कवळलें। तें मियां श्रीगुरुकृपा नमिलें। आदिबीज॥" असें म्हणून प्रथम वंदन केलेलें आहे. श्री रामदासांनी "तुझिये कृपेचेनि बळें। वितुळती भ्रांतीचीं पडळें।" असें स्तवन करून, "ऐसा जो परमसमर्थ। पूर्ण करी मनोरथ। सप्रतीति भजन स्वार्थ। कलौ चंडीविनायकौ॥" अशा शब्दांनी गौरवून नमस्कार केलेला आहे. फार काय कविरायांनी देखील "कार्यसिद्धिकर इतर दैवतें बारा वर्षे वसा। हा आज आठचौदिसां।" अशी रोकड्या प्रचीतीची ग्वाही दिलेली आहे!

अशा या सर्व महान संतांनी, शाहिरांनी कार्यारंभीं वंदिलेल्या आदिदेवाला भक्तिभावाने नमस्कार असो!

—गोपालकृष्ण भोबे

× × ×



# सरस्वति

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रान्विता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना।
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेष-
जाड्यापहा ॥

हे कुंदेंदुतुषार हार धवले ! हे शुभ्र वस्त्रान्विते !
हे वीणावरदंडमंडित करे ! हे श्वेतपद्मास्थिते !
हे ब्रह्माच्युत शंकरादिक सुरां वंद्ये परं देवते !
माते पाव सरस्वती भगवती वारीं मनोमंदते.

—बा. भ. बोरकर.



# सरस्वति



धुळाक्षरें शिकतांना जिला आपण मनोभावें अभिवादन करतों आणि विजयादशमीच्या पाटीपूजनाच्या प्रसंगीं मोठ्या उत्साहाने जिचें रेखाचित्र काढतों त्या देवी सरस्वतीची तोंडओळख कुणाला नाही ? कोणत्याहि सत्कार्याचा आणि सृजनशील उद्योगाचा शुभारंभ आपण तिच्याच नमनाने करीत असतों आणि तिच्याच आशीर्वादाची अभिलाषा बाळगीत

अनुक्रम ........ दि: ........
नों: दि: ........

असतों. आपल्याकडील यच्चयावत् प्रज्ञावंत, प्रतिभावंत, ऋषि, मुनि, कवि, कलावंत आणि कारागीर यांनी तिचेंच ध्यान आणि स्तवनपूजन करून अमर जीवनाची आनंदयात्रा सुरू केलेली आहे आणि तिच्याच कृपाप्रसादाने असंख्य विद्याकलांच्या वरदानाचा अक्षय वारसा मनुष्यजातीसाठी मागे ठेवला आहे. अशी ही देवी सरस्वती आहे तरी कशी? सर्व ज्येष्ठश्रेष्ठांचा निर्वाळा आहे की ती लावण्यमयी आहे, तारुण्यमयी आहे, कारुण्यमयी आहे, चैतन्यमयी आहे, कल्याणमयी आहे आणि म्हणूनच परम आनंदमयी आहे. तिचीं कितीहि स्तुतिस्तोत्रें गायलीं तरी ती व्याख्येला अतीतच राहते. ज्योतीसारखी ती नजरेच्या कक्षेंत येऊन देखील तिची दिव्य दीप्ति कल्पनेच्या आवाक्यालाहि आवरत नाहीं.

अनेक नांवानी आपण तिला हाक घातली आहे. आद्या, वेदगर्भा, जगद्व्यापिनी, शारदा, भारती, सर्वशुक्ला, वागीश्वरी, वीणावती, ब्रह्मविचारसारपरमा अशीं किती म्हणून नांवें सांगावीं? नामरूपादि आठहि प्रकारांनी मानवी कल्पनेने तिचीं दर्शनें घेण्याचा प्रयत्न केला आहे आणि पुढेहि ती तो करीत राहील. त्यामुळे या तिच्या दर्शनांना आणि त्यांच्या नांवांना अंत नाही. सर्व ज्ञानाचा—नव्हे संस्कृतीचाच—उगम तिच्यापासून म्हणून ती आद्या, विधात्याच्या निर्माणशक्तीची परिसीमा म्हणून ब्रह्मकुमारी, वेदांची आदिजननी म्हणून वेदगर्भा, भरतकुळानें यज्ञसंस्थेच्या द्वारा तिची उपासना सार्वत्रिक केली म्हणून भारती, नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञ म्हणून विद्यावती, सर्व कलांची अधिष्ठात्री म्हणून वीणावती, सर्व सत्त्वगुणांची मूर्ति म्हणून सर्वशुक्ला, ब्रह्मविचाराची प्रेरणा आणि परिपूर्ति म्हणून ब्रह्मविचारसारपरमा आणि परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या चतुर्वाणींची अधिदेवता म्हणून वागीश्वरी असा हा सरस्वतीदेवीचा नाममहिमा आहे.

शब्द, शिल्प आणि चित्र या तीनहि माध्यमांनी नानापरींनी तिचें रूप मूर्तिमंत करण्याचा शतकानुशतकें प्रयत्न केला आहे—मग या माध्यमांतून तिची उपासना करणारे वैदिक, शैव, वैष्णव, बौद्ध, जैन कुणीहि असोत. प्रत्येकाने जणू आपल्या प्रतिभेच्या मंगलोदकानें तिला अखंड अभिषेकच

चालवला आहे. ही परमसुंदरी श्वेत कमलावर बसलेली आहे. तिच्या एका हातांत अक्षमाला आहे, दुसऱ्या हातांत पुस्तक आहे आणि मांडीवर वीणा घेऊन ती ती छेडीत आहे. कधी तिच्या हातांत पुंडरीक असतें तर कधी कमंडलु. सामान्यतः राजहंस हें तिचें वाहन—पण जैनांनी तिला मयूराचें वाहन बहाल केलें आहे आणि तिच्या दिव्य निटिलावर चंद्ररेखेची स्थापना केली आहे. सिंहाचें वाहन असलेली सरस्वति, भारतीय शिल्पसंग्रहांत अनेकदा सापडते. समाजांच्या क्रांतिकालांत कुणातरी विजिगीषु प्रज्ञावंताने, क्रियावान् प्रेषितानें तिला तें अर्पण केलें असावें. अशा वाहनावर आरूढ झाल्यावर तिने रौद्र आयुधें आणि उमेची उग्र मुद्रा धारण करावी हें स्वाभाविक नाही का? पण ही कांही तिची नित्य मुद्रा नव्हे. तिची नित्यमुद्रा ही परमसात्त्विकच असणार. बौद्धांच्या लेखीं ती कधी एकमुख, कधी द्विमुख तर कधी त्रिमुख असल्याचें दिसून येतें. तिचीं हीं जीं विविध रूपें कल्पिण्यांत आलीं आहेत तीं प्रतीकात्मक आहेत आणि त्या त्या प्रतीकामागचा रहस्यार्थ उलगडणें हीहि एक हृदयंगम आणि उद्बोधक उपासना होऊं शकते.

ती शुभ्र कमलावर बसली आहे, शुभ्र कमल तिने हातीं घेतलें आहे, शुभ्र वस्त्र तिने परिधान केलें आहे आणि वाहन म्हणून शुभ्र हंसच पसंत केला आहे. स्वतः ती देखील शुभ्रवर्णाच आहे. सत्त्वगुणाची परिसीमा—परमानंद-शांति—ही अशी सर्वशुक्लाच असायची. अशी ही 'सत्त्वरसाची ओतली' अक्षमाला ओढीत अखंड मननांत निमग्न असावी यांत आश्चर्य तें कोणतें? तिच्या हातांतलें पुस्तक हें सर्व वाग्विलासांचें मथित तर वीणा हें सर्व कलांचें प्रतीक. कमंडलु हा तर पावित्र्याचा द्योतक. जणू सर्व पुण्योदकें त्यांत सांठवलेलीं आहेत. ती स्वतः त्यांचेंच पान करीत असते आणि त्यांतल्या एखाद्या तुषाराच्या प्रोक्षणाने वाल्याचा वाल्मीकि करून टाकते.

वेदवाङ्मय चाळलें तर सरस्वती म्हणून जिचें वारंवार उद्गायन आढळतें तें आहे सरस्वती नदीचें. आज ती गुप्त आहे, अंतःसलिला आहे असें आपण मानतों; पण एके काळीं म्हणजे उतथ्य ऋषीच्या

शापानें वाळण्यापूर्वी ती भारतीय संस्कृतीची आदिजननी या नात्याने या भारतवर्षांत वावरत होती. ब्रह्मावर्तांतील ब्रह्मसरांतून ती उगम पावली. ती वाहूं लागली तसे तिचे काठ धनधान्यानेच नव्हे तर ऋषिमुनींच्या मंत्रघोषांनी आणि यज्ञाच्या धूमज्वालांनी गजबजून गेले. विद्याकलांचीं असंख्य राउळें तिच्या घाटावर उभीं झालीं. तिच्या पुण्योदकानें पापताप तर वाहून गेलेच पण पुष्टितुष्टीची लयलूट झाली. सृष्टीच्या शैव वा रौद्र रूपांत देवदर्शन घेणाऱ्या आपल्या द्रष्ट्या पूर्वजांना मग ही साधी नदी कशी वाटावी ? ही कुणीतरी सनातन देवताच जगदुद्धारासाठी, मानवाला दिव्य जीवनाची दीक्षा देण्यासाठी या भूतलावर अवतरली आहे अशी त्यांची मनोमन धारणा होऊन बसली असली पाहिजे. मानवाच्या आंतरिक परमैश्वर्याची ती स्वामिनी आहे. सारें भौतिक वैभव कृतार्थ होतें तें तिच्याच कौतुकामुळे असें त्यांनी मानलें. लक्ष्मीची थोरली बहीण अशी पदवी तिला दिली. म्हणूनच अमृतमंथनानंतर लक्ष्मी वर आली तेव्हा त्यांनी सरस्वतीला आपल्या गळ्यांतील माळेने तिचें स्वागत करायला लावलें आहे. सरस्वती ही देवी आहे असें एकदा मानल्यावर ती नदी कशी झाली याची कांही तरी उपपत्ति ही लावलीच पाहिजे. ती लावणारी काव्यात्म प्रतिभा त्यांच्या ठिकाणीं होतीच. ती त्यांनी किती सुंदर रीतीने लावली आहे पहा !

पद्मपुराणाच्या सृष्टिखंडांत या संबंधींची एक बहारीची कथा वर्णिली आहे. एकदा या विश्वांत एक विचित्र अग्नि निर्माण झाला. जितका आवरावा तितका तो जास्त पेट घेत जायचा. सृष्टींतील सारे विषय इंधनवत् होऊन तो सारखा वाढतच चालला. त्याच्या अनिवार तापाने मनुष्यमात्रच नव्हे तर देव देखील घाबरेघुबरे आले. या अग्नीचें नांव वडवाग्नि. या वडवाग्नीला आवरण्याचें त्राण कुणाहि देवाच्या ठिकाणीं नव्हतें. ब्रह्मकुमारी सरस्वती परमकारुण्याची आणि परमपावित्र्याची देवता असल्यामुळे तिला काय तें त्याला काबूंत आणणें शक्य होतें. म्हणून सर्व देव तिला शरण गेले आणि वडवाग्नीला आवरण्यासाठी विनवूं लागले. ती म्हणाली, 'मी या

अपवित्र विकारीस स्पर्श कशी करूं? माझें कौमार्य त्यामुळें मलिन होईल. तिचा नकार मिळाल्यावर सर्व देवांनी ब्रह्मदेवाच्या दाराशीं धरणेंच धरलें. प्रसंग बांका होता आणि इलाज तर करायला हवाच होता! तेव्हा ब्रह्मदेवाचा नाइलाज होऊन त्याने आपल्या मुलीला ही कामगिरी पार पाडायला फर्मावलें. बिचारी करते काय! निघाली. पण स्फुंदत स्फुंदत. या शोकामुळे ती जलमय झाली. तिच्या कौमार्याला कसलीच झळ पोचूं नये म्हणून महाविष्णूने आपली सर्व शक्ति वेचून ह्या वडवाग्नीला सुवर्णकलशांत कोंडलें आणि तो तिच्या स्वाधीन केला. तिने तो घेतला आणि तो महासिंधूच्या तळाशी ठेवून दिला.

माणसाच्या ठिकाणच्या विकारावरील विजयाचें किती सुंदर रूपक आहे हें! सरस्वति नदी आज प्रत्यक्षांत गुप्त आहे. पण ती अंतःसलिला आहे. त्याच रूपांत ती प्राणाच्या ठिकाणीं वावरत असते. विकाराचा वडवाग्नि एकदा चेतला की आपल्या ठिकाणचे सर्व मानवी आणि दैवी भाव देखील कासावीस होतात. अशा वेळीं याच देवीला शरण जावें लागतें आणि तिच्याकरवी अपार मानवी अनुभूतीच्या महासागरांत त्याचें विसर्जन करावें लागतें. हें साधतें तेव्हाच ती प्रसन्न होऊन बोलूं लागते. तिचे हे सहजोद्गार म्हणजेच सारस्वत. अशी ही सरस्वति कधीं ब्रह्माची, कधीं विष्णूची तर कधी गणपतीचीपत्नी म्हणून रंगवली गेली असली तरी ती खरी आहे चिरकुमारी आणि चिन्मय माता म्हणूनच महात्मायनांत मी तिचें आवाहन करणारांना म्हटलें आहे:

**धरणीसारिखी तूं गे जननी**
**अखंड रमणी, अखंड तरुणी**
**रत्नशोभा रस वाहिनी**
**अमृतदायिनी मर्त्यांतें**

अशा या सरस्वतीची अमृतदायिनी वत्सलता आम्हां सर्वांना प्राप्त होवो!

—वा. भ. बोरकर

x x x



# भगवती लक्ष्मी

जावा येथील लक्ष्मीचें शिल्प

शय्यागृहं तव पिता जगतां नियन्तु-
र्भ्राता मृगाङ्क इतरः पुनरङ्गभूषे ।
वक्षस्यमुष्य वरदे त्वमवस्थिता तद्
वाल्लभ्यमम्ब भवदीयमनन्यलभ्यम् ॥

— वेङ्कटाध्वरिकृतं लक्ष्मीसहस्रम्

शय्यामंदिर होत तात तव गे विश्वप्रभू विष्णुचें
बंधू कौस्तुभ, चंद्र शोभति तुझे त्याचीं खरीं भूषणें ।
ऐसी तूं वरदा असून असशी वक्षीं तयाच्या नत ।
ऐसें प्रेम तुझें किती विरळ गे अन्यांस अन् लाभणें ॥

— सदानंद रेगे



# भगवती लक्ष्मी



मद्रास म्यूझियममधील
लक्ष्मीचें शिल्प

**पद्मासनां पद्महस्तां पद्मां पद्मदलैर्युतां**
**दिग्गजैः सेव्यमानां च काञ्चनैः कलशोत्तमैः ।**
**अमृतं सिञ्चमानां च श्वेतच्छत्रविराजितां**
**सर्वालंकारसंयुक्तां महालक्ष्मीं विचिन्तये ।**

भगवती लक्ष्मी कमलावर आसनस्थ असून तिच्या हातांत कमलपुष्प आहे. चोहों बाजूंस कमळाचीं पानें विखुरलेलीं आहेत. दिग्गजांनी तिच्यावर सुवर्णकलशांतून अमृताचा अभिषेक चालविला आहे. तिच्या मस्तकावर शुभ्र छत्र शोभा देत आहे. तिच्या सर्वांगावर सर्व प्रकारचे अलंकार घातलेले आहेत.

देवदानवांच्या युद्धांत तह झाल्यावर भगवान् विष्णूंच्या सूचनेवरून क्षीरसागराचें मंथन करण्याचें ठरलें. मंदारपर्वताची रवी व वासुकीचा दोर करून मुखाच्या बाजूला दानव व शेपटीच्या बाजूला देव उभे राहून मंथन सुरू झालें. ह्या मंथनांतून सुरा, पारिजातक, अप्सरा, चंद्र, हालाहल, धन्वन्तरी, लक्ष्मी, उच्चैःश्रवा, ऐरावत, कौस्तुभ, कामधेनु, धनुष्य, शंख, अशीं चौदा रत्नें बाहेर पडलीं. लक्ष्मी ही ह्या चौदा रत्नांपैकी एक होती व तिचें आगमन होतांच ऋषींनी श्रीसूक्ताने तिचें स्तवन केलें. त्या सूक्तांत तिचें दिलेलें वर्णन वर उद्धृत केलेलें आहे. ह्या मंथनांतून प्राप्त झालेलीं हीं रत्नें उपस्थितांमध्ये वाटण्यांत आलीं. ब्रह्मदेवाने लक्ष्मी ही श्रीविष्णूला अर्पण केली. म्हणून पुराणकथांमध्ये भगवती लक्ष्मी ही भगवान विष्णूंची धर्मपत्नी म्हणून समजली जाते.

लक्ष्मी ही प्रथम क्षीरसागरापासून उत्पन्न झाली व तीच पुनः भृगु-ऋषींपासून ख्यातीचे उदरीं जन्मास आली. नंतर ब्रह्मदेवाच्या परवानगीने नर्मदेच्या पूर्वतीरावर आपल्या नांवाचें एक नगर तिने वसविलें व तें भृगूंना अर्पण करून ती परत देवलोकीं आली. कांही काळाने ती पुनः आपल्या पित्याकडे—भृगु ऋषींकडे—जाऊन आपलें नगर परत मागूं लागली. पण त्यांनी तें नाकारल्यावर ती विष्णूकडे गेली व आपलें नगर परत मिळावें म्हणून तिने याचना केली. विष्णु भृगुऋषींकडे गेले व त्यांना नगर परत देण्याविषयी त्यांनी प्रेमाने विनंति केली. पण भृगूंनीं नकार दिला. अशा तऱ्हेने आणखी एकदोनदा विष्णूंनी विनंति व आज्ञाहि केली व त्यामुळे भृगूंना राग येऊन ‘तूं भार्येचा पक्ष धरून मला पीडा देत आहेस, यासाठी मनुष्य लोकांत तूं दहा जन्म घेशील व तुझ्या भार्येचा तुला वियोग होऊन तूं दुःख भोगशील’ असा शाप त्यांनी दिला. विष्णूंनीहि ‘तुला मुलाबाळां-पासून सुख मिळणार नाही’ असा भृगु ऋषींना शाप दिला व ते पुन्हा क्षीरसागराकडे परत आले, असें पद्मपुराणांत सांगितलेलें आहे.

लक्ष्मी ही धन आणि ऐश्वर्याची अधिष्ठात्री देवता गणली जाते. स्वभावाने ती अतिशय चंचल म्हणून समजली जाते. ह्याउलट पार्वती ही एकनिष्ठ

समजली जाते. आलंकारिक दृष्ट्या लक्ष्मीचें चंचलत्व मान्य केलें तरी अवतारदृष्ट्या तिची विष्णुपदींची निष्ठा सहज प्रतीत होते. भगवान् विष्णु क्षीरसागरांत शेषशायी असतांना लक्ष्मी त्यांचे पाय चुरीत असतांना दिसते. रामावतारामध्ये तिने धीरगंभीर सीतेचें रूप धारण करून आपल्या पतीची साथ केली. कृष्णावतारांत तिने रुक्मिणीचें रूप धारण केलें. अशा रीतीने पत्नी म्हणून ज्या ज्या वेळेस शक्य होतें त्या त्या वेळीं आपल्या पतीबरोबर जीवन व्यतीत करूनसुद्धा लक्ष्मीला चंचल कां म्हटलें आहे हें उमजत नाही. लक्ष्मीची कृपादृष्टि असणें म्हणजे स्वास्थ्य, सुबत्ता व सुख प्राप्त होणें. असें असल्यामुळे सर्वजण लक्ष्मीदेवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी आपापल्या परीने झटत असल्यास नवल नाही. परंतु ह्या सर्व स्वार्थी भक्तांवर ती तुष्ट होतेच असें नाही.

स्कंद पुराणांत लक्ष्मीने आपल्या वास्तव्याबद्दल कथन करतांना सांगितलें आहे: "जेथे मी राहतें तेथे धर्म, अर्थ आणि सुयशाची वृद्धीच होत राहील हें खास समजावें. ज्या घरांतील गृहिणी सुंदर आणि कलहविनाशी आहे अशा घरांत मी नेहमीच राहतें. जो प्रियभाषी, संयमी, धर्मपरायण, मितभाषी, अहंकारशून्य, परोपकारी आणि सुविद्याविभूषित आहे अशाच्या घरीं राहणेंच मला खूप आवडतें. त्याचप्रमाणे त्याग, पावित्र्य आणि सत्यप्रियता हे तीन महागुण ज्यांच्या ठायीं वास करतात त्यांच्या घरीं मी नक्कीच आढळेन. सद्गुणी, सुशील आणि सुरुचिसंपन्न स्त्रियांच्या निकट माझें अस्तित्व असतेंच. जो धनोपार्जनाचा प्रयत्न करीत नाही, जो हर्ष व क्रोध जाणत नाही अशाचा मला फार राग येतो. ज्या स्त्रिया अस्वच्छ व अव्यवस्थित राहतात, ज्यांच्या ठायीं सद्बुद्धीचा लवलेशहि नसतो, ज्या सदासर्वदा पतीशीं वाद घालतात, ज्या परघरीं राहण्यास उत्सुक असतात, ज्यांच्या ठायीं लज्जा व सहनशीलता यांचा अभाव असतो आणि ज्या आळसांत किंवा झोप घेण्यांत काळ व्यतीत करतात अशा स्त्रियांकडे मी मुळींच राहत नाही." सारांश, ज्या ठिकाणीं सद्गुणी, सदुद्योगी, सद्विचारी आणि सदाचारी व्यक्ति असतात त्या स्थानीं लक्ष्मीचें वास्तव्य असतें.

२

महाभारतांत असें सांगितलें आहे की स्त्री ही पुरुषाची लक्ष्मी आहे. सुगृहिणी घराची शोभा वाढवणारी पुरुषाची देवता आहे. तीच घरादाराची नीट व्यवस्था ठेवते आणि तीच पुरुषाला सत्प्रेरणेने प्रोत्साहन देत असते. तिच्याच साहाय्याने विविध कार्यक्षेत्रांत पुरुष विजयी होत असतो. सुशील पत्नी आपला पति आणि त्याने केलेलें द्रव्यार्जन ह्यांचा व्यवस्थित संभाळ करते, यामुळे त्याच्या घरांत जणू ती लक्ष्मीच्या रूपाने वास करीत असते असें म्हणणें अतिशयोक्त ठरणार नाही. दान करणाऱ्यावर लक्ष्मी संतुष्ट होते आणि त्यामुळे दात्यावर तिची अधिक कृपादृष्टि होते. महाभारतांत अनुशासन पर्वांत 'दानेन द्रविणाधिकः' असा उल्लेख यासंबंधी केलेला आहे.

**यद्गृहे रमते नारी लक्ष्मीस्तद्गृहवासिनी।**
**देवताः कोटिशो वत्स, न त्यजन्ति गृहं हि तत्॥**

महर्षि गर्गमुनींच्या उपर्युक्त उक्तीप्रमाणे ज्या घरांत सद्गुणी स्त्रिया सुखासमाधानाने राहतात अशा घरांत लक्ष्मी राहते व शतकोटि देवताहि तें घर सोडून जात नाहीत.

लक्ष्मीस अप्रिय अशा स्थानांचें वर्णन करतांना कौटिल्याने असें म्हटलें आहे की घाणेरडीं वस्त्रें परिधान करणाऱ्या, दात स्वच्छ न ठेवणाऱ्या, अधिक खाणाऱ्या, निष्ठुर भाषण करणाऱ्या तसेंच सूर्योदयाच्या व सूर्यास्ताच्या समयीं निद्राधीन असणाऱ्या व्यक्तींना लक्ष्मी सोडून जाते. लक्ष्मी विद्वज्जनांवर रुष्ट कां असते ह्याचीं कारणें सुभाषितकारांनी सांगतांना खुद्द लक्ष्मीच्या तोंडून असें वदविलें आहे:

**पीतोऽगस्त्येन तातश्चरणतलहतो वल्लभोऽन्येन रोषात्**
**आबाल्याद्विप्रवर्यैः स्ववदनविवरे धारिता वैरिणी मे।**
**गेहं मे छेदयन्ति प्रतिदिनमुमाकान्तपूजानिमित्तम्**
**तस्मात् खिन्ना सदाऽहं द्विजकुलसदनं नाथ नित्यं त्यजामि॥**

लक्ष्मी विष्णूला सांगते, "नाथ! मी ब्राह्मणांच्या घरांचा नेहमी त्याग करतें, कारण याच ब्राह्मणांपैकी, अगस्त्यनामक एकाने माझ्या पित्याला (सागराला) गिळंकृत केलें होतें. दुसऱ्या एकाने (भृगूने) माझ्या वल्लभाच्या (विष्णूच्या)

छातीवर लत्ताप्रहार केला. अगदी बालपणापासून हे ब्राह्मण माझ्या वैरिणीला (सरस्वतीला) कंठस्थ करतात. तसेंच शंकराच्या पूजेचें निमित्त करून माझें घर (कमळ) दरदिवशीं हे उद्ध्वस्त करतात म्हणून मला खिन्न वाटतें व ह्यांचें सांनिध्य नकोसें वाटतें."

लक्ष्मीचा जन्म कमलपुष्पांत झाला म्हणून त्या पुष्पाचा अलौकिक महिमा वर्णन करण्यांत कवींची अहमहमिका लागलेली दिसते. लक्ष्मीसहस्रस्तोत्र रचणाऱ्या व्यंकटाचार्याने मोठ्या कल्पकतेने वर्णन केलें आहे—

**अहो मुकुंदसुंदरि त्वदीयमन्दिराहितः**
**स्वयं क्षयं व्रजन्भयं स्वरक्षिणं क्षिणोत्यपि ।**
**सरोरुहद्रुहः शिवः शिरोधिरोहदुष्कृतात्**
**विदिक्षि दिक्षु भिक्षुकः स्फुटं नटन्नटाट्यते ॥**

"हे मुकुंदसुंदरी, तुझ्या सुंदर निवासस्थानाचें वैभव या चन्द्राला सहन झालें नाही. आपल्या करस्पर्शाने तो कमळाची शोभा हरण करूं लागला. असल्या पापी चंद्राला मस्तकावर धारण करण्याचें प्रायश्चित्त शंकराला भोगावें लागलेंच. कारण त्यामुळे हातांत भिक्षापात्र घेऊन दाहीदिशांत उघड्या-नागड्याने नाच करीत वणवण हिंडण्याची त्याच्यावर पाळीं आली!"

आश्विन वद्य त्रयोदशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत दीपावली साजरी करण्याची प्रथा हिंदुलोकांत रूढ आहे. दीपावलीची सुरुवात धनत्रयोदशीने होते व पुढे पांच दिवस दिव्यांची आरास केली जाते ह्याचें मूळ हैमराजाच्या कथेंत सापडतें. हैमराजाच्या मुलाचा अपमृत्यु प्रयत्नेंकरूनहि टाळतां आला नाही व प्राणहरण करणाऱ्या यमदूतांनाहि ह्या करुण प्रसंगामुळे वाईट वाटलें. त्यावर यमराजाने सांगितलें की आश्विन वद्य त्रयोदशीपासून पांच दिवस जो दिवे लावील त्यास केव्हाहि अपमृत्यु येणार नाही. नरकचतुर्दशीला वामनावतार घेऊन श्रीविष्णूंनी बळिराजास पाताळीं दडपिलें त्या वेळेस बळिराजाला वर देतांना विष्णूंनी सांगितलें की या तीन दिवसांत जे लोक आपल्या घरीं दिवे लावतील त्यांच्या घरीं लक्ष्मी नेहमी राहील. आश्विन वद्य अमावास्येस लक्ष्मीपूजन करण्याची चाल आहे. बळिराजाच्या कैदेंतून

इतर देवांबरोबर लक्ष्मीचीहि सुटका झाली तो दिवस हाच म्हणून ह्या दिवशीं तिची पूजा करण्याचा प्रघात पडला आहे. आश्विन वद्य अमावास्येस संपत्तीची देवता भगवती महालक्ष्मी आपली बहीण दरिद्रा हिच्यासमवेत आपलें वाहन जो गरुड त्याच्यावर आरूढ होऊन पृथ्वीतलावर भ्रमण करण्याकरता स्वर्गातून अवतीर्ण होते असा पुराणांत उल्लेख आढळतो. ज्या ठिकाणीं अंधःकार व अस्वच्छता आहे त्या ठिकाणीं दरिद्रा रमते व सुंदर, सुशोभित, स्वच्छ व दीपमालांनी प्रकाशित असलेल्या गृहांना लक्ष्मी भेट देते. ह्यासाठी लोक दिवाळीची आरास करतात. देवी भागवतांत लक्ष्मीपूजनाचें सविस्तर वर्णन केलेलें आढळतें.

गुजराथेंत लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती ह्या देवतात्रयीचें पूजन करतात. दौत, रुपया व खातेवही हीं ह्या देवतांचीं प्रतीकें मानून ब्राह्मणाकडून पूजा सांगून व त्यास यथाशक्य दक्षणा देऊन घरोघरीं ही पूजा केली जाते. कांही सधन व्यापारी आपल्या व्यवसायस्थानांत पूजेनिमित्त येणाऱ्या आमंत्रितास व विशेषतः बाळगोपाळांस पानसुपारीबरोबर यथाशक्य चांदीचें द्रव्य देतात. बंगालांत महाकालीची पूजा नवरात्रांत घरोघरीं व सामुदायिकपणें मोठ्या प्रमाणांत साजरी करीत असले तरी त्यानंतर लक्ष्मीपूजन करण्याचीहि पद्धत तिथे आहे. राजपुतान्यांत मांजराला लक्ष्मीचें प्रतिस्वरूप मानून लक्ष्मीचा नैवेद्य मांजरापुढे ठेवण्यांत येतो. कर्नल टॉडच्या 'ॲनाल्स ऑफ राजस्थान' ह्या ग्रंथांत दिवाळीच्या सणाचें तपशीलवार वर्णन केलेलें आढळतें. त्यावरून तेथे सोन्याचांदीचे दागिने व नाणीं ह्यांची दुधा-तुपाने पूजा करण्याची प्रथा आहे असें कळतें. आंध्र लोकांत उंच बैठक करून तिच्याभोवती दिव्यांची आरास केली जाते व ह्या बैठकीवर बसून गृहिणी लक्ष्मीच्या स्तवनाचीं गीतें गाऊन तिचें स्वागत करीत असतात. शीखधर्मात प्रत्यक्ष लक्ष्मीपूजनाचा सोहळा नसला तरी लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं गुरुद्वारांतील ग्रंथसाहेबासमोर सतत दिवा तेवत ठेवण्याची प्रथा आहे.

विष्णुपुराणांत लक्ष्मी ही सौंदर्य व समृद्धीची देवता आहे असें सांगण्यांत आलें आहे. ज्यांना तिला प्रसन्न करून घ्यावयाचें आहे त्यांनी प्रस्तुत

पुराणांत इंद्राने तिची स्तुति करतांना म्हटलेल्या श्लोकांचा दैनंदिन पुनरुच्चार करणें इष्ट आहे असें सांगितलें आहे. "हे शक्तिमान देवी! तुझ्या कृपादृष्टीमुळेंच पुरुषांना स्त्री; संपत्ति, संतति, गृह, मित्र, पीक, आरोग्य, बल, शक्ति, विजय व सुख प्राप्त होऊं शकतें. तूं जगन्माता आहेस; कारण विष्णु हा जगत्पिता आहे. आणि हें सर्व चराचर जग तुम्हीं दोघांनीं व्यापिलेलें आहे. हे माते! तूं सर्व वस्तूंना शुद्ध करतेस म्हणून आमचे खजिने, कोठारें, गृहें, नातेवाईक, आम्ही स्वतः, आमच्या गृहिणी, पुत्रप्रपौत्र, मित्र, कुल, रत्नें व गुरें ह्यांना तूं त्यजून जाऊं नकोस. ज्यांचा तूं त्याग करतेस त्यांना सत्य, पावित्र्य आणि सद्भाव इत्यादि सद्गुण सोडून जातात. तसेंच ज्या हीन व दरिद्री लोकांवर तुझी कृपादृष्टि वळते त्यांच्या ठायीं तत्काळ सद्गुणांची निष्पत्ति होते. हे देवते! तूं माझ्यावर प्रसन्न हो, आणि हे कमलाक्षी, तूं माझा कधीहि त्याग करूं नकोस."

पद्मपुराणांत लक्ष्मीव्रताचें माहात्म्य वर्णन केलेलें आहे. मार्गशीर्ष महिन्यांतल्या पहिल्या गुरुवारीं लक्ष्मीनारायणाची पूजा करावी. तिला गोड पक्वान्नांचा नैवेद्य दाखवून, 'हे देवि लक्ष्मी, मी आज तुझी पूजा यथामति केली आहे, तर तूं प्रसन्न होऊन घरांत निरंतर वास्तव्य कर' अशी तिची प्रार्थना करावी. नंतर नैवेद्याचीं पक्वान्नें ब्राह्मणांस देऊन कांही अवशेष प्रसादाचें पतिपुत्रांसह सेवन करावें. अशा रीतीने मार्गशीर्षांतील चारी गुरुवारीं लक्ष्मीचें पूजन करावें. शेवटीं ब्राह्मणाला व्रत सांगितल्याबद्दल दक्षणा द्यावी. लक्ष्मी प्रसन्न झाल्यास जितकीं वर्षें हें व्रत करण्यांत येईल तितकीं हजार वर्षें व्रतस्थेला लक्ष्मीलोकांतील सुखें उपभोगावयास मिळतील. हें लक्ष्मीव्रत जी करील ती जन्मोजन्मीं श्रीमती व सौभाग्यवती होईल. मात्र ही कथा ऐकल्यावांचून जर कोणी व्रत करील तर त्यास व्रताचें फळ मिळणार नाही, असा इशारा ह्या कथेच्या अखेरीस दिलेला आहे.

**सर्वसिद्धिप्रदे देवि भुक्तिमुक्तिप्रदायिनी।**
**मन्त्रमूर्तिः सदावन्द्ये महालक्ष्मि नमोऽस्तु ते॥**

**—शां. शं. रेगे**

× × ×



# जगन्माता
# उमा

पार्वतीमोषधीमेकामपर्णां मृगयामहे ।
शूली हालाहलं पीत्वा यया मृत्युञ्जयोऽभवत् ॥
अपर्णैव लता सेव्या विद्वद्भिरिति मे मतिः ।
यया वृतः पुराणोऽपि स्थाणुः सूतेऽमृतं फलम् ॥

औषधी एक ही देवी पार्वती शोधितों अम्ही ।
विषदग्ध शिव तो झाला मृत्युंजय हिच्यामुळे ॥
अपर्णा वल्लरी घ्यावा बुधांनी आसरा हिचा ।
हिने पुरातन-स्थाणू वेढितां अमृतें फळे ॥

— मंगेश पाडगांवकर



# जगन्माता उमा



दक्षिणभारतांतील
उमेचे एक शिल्प

**भा**गीरथीची भगिनी, हिमालयाची सुकन्या आणि भगवान् शंकराची तेजस्वी सहचारिणी या त्रिविध नात्यांनी भारतांत सुविख्यात असलेली हैमावती उमा म्हणजे भारताची महान् देवता. उमेभोवती अद्भुतरम्यतेचें वलय फार प्राचीन कालापासून असल्यामुळे तिच्या तेजःपुंज, स्वाभिमानी, पतिपरायण आणि त्यागी व्यक्तिमत्त्वाचें आकर्षण भारतीयांना आजतागायत आहे. भगवान् शंकराची मानिनी सहचारिणी या नात्याने या दोघां पतिपत्नींना भारताने विश्वाचें पालकत्व बहाल केलें आहे. महाकवि कालिदासाने आपल्या रघुवंशाची या 'जगतः पितरौ'ना वंदन करूनच सुरुवात केली आहे.

उमा या नांवाच्या उपपत्तीबाबत विद्वान संशोधकांनी अनेक तर्कवितर्क लढवले आहेत. उ म्हणजे शंकर आणि मा म्हणजे मोजणारी तर 'उमा' या शब्दांत ओंकाराचा समावेश आहे असेंहि अनेकांचें मत आहे. तपश्चर्या करीत असतांना झाडांचीं गळलेलीं पानेंसुद्धा भक्षण करण्याचें नाकारलें म्हणून 'अपर्णा' हें काव्यमय नांव कुमारसंभवांत आढळतें. उमा या नांवाचीं निरनिराळीं रूपें उपलब्ध आहेत. बालिलेयिन 'उम्मु'–उम्मा, अॅकेडियन उम्मी, आणि दक्षिणाच्या नाण्यावरील ओम्मो या देवतेचें चित्र म्हणजे उमेचीं अपभ्रष्ट रूपें. उमेचें आणखी एक प्रख्यात नांव म्हणजे पार्वती. पर्वताची कन्या किंवा पर्वतावर राहणारी अशा अर्थानें तें रूढ झालें. पण पुराणकालांत तिचा विंध्य, मंदार, मेरु आणि कैलास या पर्वतांशींहि संबंध जोडला गेला आहे. उमेचा अरण्यकें आणि उपनिषदें यांत प्रत्यक्ष उल्लेख नाही. पण सायनाचार्यांसारख्या कांही टीकाकारांच्या मतें तैत्तिरीय अरण्यकांतील 'सोम्' या शब्दाचा अर्थ 'उमेसह' (मया सह वर्तमानः) असा आहे. तैतिरीय संहितेवरील आपल्या टीकेंत भट्टभास्कर-मिश्रानें 'सोम'चा अर्थ सायनाचार्यांप्रमाणेच केला आहे. तैतिरीय अरण्यकांचें परिशिष्ट असलेल्या 'याज्ञिकी' उपनिषदांत दुर्गेचा प्रसिद्ध गायत्री मंत्र आहे. "आम्ही देवी कात्यायनीला जाणतों. आम्ही कन्याकुमारीचें स्तवन करतों (धीमहि). देवी दुर्गा आम्हांस मार्गदर्शन करो (प्रचोदयात्).

उमेचें आणखी एक लोकप्रिय रूप म्हणजे दुर्गा–चंडी अथवा काली. हीं रूपें रामायण–महाभारतकाळांत लोकप्रिय होतीं. रामायणाच्या पहिल्या कांडांत उमेचा–हिमालयाची मेनकेपासून झालेली कन्या असा निर्देश आहे. शिवपार्वतीच्या विवाहाची कथा रामायणांत आणि महाभारतांत आढळते. महाभारताच्या सौप्तिकपर्वांत उमेच्या 'काली' या भयानक रूपाचें तपशीलवार वर्णन आहे. काली ही काळ्या वर्णाची, तिचे डोळे रक्तवर्णीय आणि चेहरा व शरीर रक्तानें माखलेलें असें त्यांत वर्णन केलें आहे. महाभारतांत कात्यायनीची प्रद्युम्नानें पूजा केल्याचा उल्लेख आहे. अनिरुद्धानेंहि चंडिकेचें स्तवन केल्याचें आढळतें. पण त्याहिपेक्षा युधिष्ठिरानें

केलेलें दुर्गेचें स्तवन अधिक महत्त्वाचें आहे. त्यांतील दुर्गेचें वर्णन पुराणकालांतील वर्णनाशीं फार जुळतें आहे.

उमा-महेश या दैवतांनी ग्रामीण भारताचें भक्तिजीवन खिस्तशतकाच्या प्रारंभापासून पूर्णतया व्यापलें. तें इतकें की भारतांतील अनेक ग्राम-देवतांचा उमेशीं निकटचा संबंध जोडला गेला. आणि या ग्रामदेवता उमेच्या रूपाशीं इतक्या मिसळून गेल्या की जणू तीं उमेचीं वेगवेगळालीं रूपें आहेत असें वाटावें. पण त्यामुळे या 'पार्वती-परमेश्वरां'ना भारतीयांनी विश्वाचें जनकत्व अत्यंत आपलेपणाने बहाल केलें. कालिदासाच्या कुमार-संभवांतील अपर्णा या काव्यमय नांवाप्रमाणे भारतीयांच्या भावजीवनांत अढळ झालेलें उमेचें आणखी एक लोकप्रिय नांव म्हणजे 'गौरी'. कुमार संभवांत दक्षकन्या सती आणि तिचा व तिच्या पतीचा म्हणजे भगवान शिवाचा दक्षाने आपल्या यज्ञांत केलेला अपमान आणि त्यामुळे मानिनी सतीने केलेलें आत्मार्पण आणि पुनर्जन्मांत तिला उमेचा जन्म मिळून खडतर तपश्चर्येच्या जोरावर तिने भगवान शिवाची प्राप्ति करून घेतली हा अत्यंत लोकप्रिय कथाभाग महाकवीने मोठ्या तन्मयतेने रेखाटला आहे. कालिदासाप्रमाणे त्यानंतर अनेक कवींनी–सुबंधु (वासवदत्ता), बाण (कादंबरी–हर्षचरित), भवभूति (मालतीमाधव)– तिचे अनेक भक्तिभावाने निर्देश केले आहेत. बाणभट्टाच्या कादंबरींत शबरांनी तिची भक्ति केली–तर हरिवंशांत रानटी जमातींनी तिला आवाहन केलें असा निर्देश आहे.

महाकवि कालिदासाच्या कुमारसंभवांत शिवाच्या लग्नाला उपस्थित असलेल्या सप्तमातृकांचा निर्देश आहे. या सप्तमाता म्हणजे ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, ऐंद्राणी, माहेन्द्री आणि चामुण्डा. शिवाशीं निकट संबंध असल्यामुळे या सप्तमाता म्हणजे एक प्रकारें उमेचींच प्रातिनिधिक रूपें मानलीं जातात.

देवीने चण्डमुण्ड राक्षसाचा वध केला म्हणून तिला चामुण्डा हें नांव पडलें. महिष राक्षसाचा वध केला म्हणून महिषासुरमर्दिनी, दुर्गासुराचा वध केला म्हणून दुर्गा, अंगकांति काळी असल्यामुळे काली आणि

३१६४५ दि: २५-५-१९६७

ब्रह्मदेवाने वर दिल्यामुळे गौरवर्ण प्राप्त झाला म्हणून तिला गौरी हीं नांवें तिला पडलीं.

उत्तरभारतांत उमेची उपासना अत्यंत तीव्रतेने होते. उमा म्हणजे महामाया, शक्तिदेवता असें समीकरण आहे. या शक्तिदेवतेचें तात्त्विक आणि आध्यात्मिक चिंतन सांख्य, वेदान्त, वैष्णव आणि तांत्रिक या तत्त्वज्ञानाच्या भिन्नभिन्न शाखांनी मोठ्या तपशिलाने केलेलें आहे. पुराणांत प्रकृति आणि पुरुष यांचींच शक्ति आणि शिव हीं रूपें आहेत असें मानलें गेलें आहे. मार्कंडेय पुराणांतील देवीमाहात्म्यांत शक्तिदेवतेचें माहात्म्य विस्ताराने वर्णिलें आहे. हें देवीमाहात्म्य फार पवित्र मानलें जातें आणि याच देवीचें लोकप्रिय नांव दुर्गा. ती विश्वाचें रक्षण करतेच पण संकटकाळीं चंडीचें रूप धारण करून असुरांचा नाश करते. कालिकापुराण आणि देवीभागवत हे स्वतंत्र ग्रंथ तिच्यावर आहेत.

आदिमायेचीं हीं दोन रूपें. एक उमा आणि दुसरी दुर्गा. उमेने आपल्या पतिपरायण त्यागवृत्तीने भारतीय स्त्रीजनांचीं अंतःकरणें पिढ्यान्‌पिढ्या जिंकलीं, तर दुर्गामातेने संकटकाळीं वीरत्वाचें आवाहन करण्यासाठी क्षत्रियांना स्फूर्ति दिली. यामुळेच उमेला विश्वाचें मातृपद भारतीयांनी स्वयंस्फूर्तीने बहाल केलें.


उमेचें अतिप्रसिद्ध व्रत म्हणजे 'हरितालिका' हें व्रत. विशेषतः महाराष्ट्रांत आणि दक्षिण भारतांत या व्रताची रूढि कुलाचार म्हणून पाळली जाते. सर्व घरांतल्या स्त्रिया हें व्रत पाळतात. विवाहिता, कुमारिका आणि विधवाहि या व्रताचें आचरण करितात. व्रतस्थ असलेली स्त्री या दिवशीं कडक उपोषण करते. निर्जळा, निराहार असें हें व्रत कुमारिका इष्ट वर प्राप्त व्हावा म्हणून करीत असतात तर सुवासिनी स्त्रिया आपल्या कुटुंबाचें कल्याण व्हावें म्हणून करीत असतात. या व्रताच्या उत्पत्तीची कथा अशीच रंजक आहे.

पर्वतराजाची कन्या उमा, ही ज्यावेळीं उपवर झाली, तेव्हा राजाने तिला देवाधिदेव श्रीविष्णूला द्यायची असें ठरविलें; व त्याप्रमाणे त्याने खटपट

सुरू केली. उमेने आपलें अंतःकरण आधीच श्रीशिवाला देऊन टाकलें होतें. आपल्या लग्नाबद्दलची हकिकत जेव्हा उमेच्या कानावर गेली तेव्हा उमेनें आपल्या सखीकडून पित्याला निरोप पाठविला की, 'माझ्या मनांतील वराशिवाय मीं दुसऱ्याला वरणार नाहीं. माझ्या इच्छेविरुद्ध तुम्हीं तसा प्रयत्न केल्यास प्राणत्यागाशिवाय दुसरी गोष्ट मी करणार नाहीं!' एवढा निरोप पाठवून ती स्वस्थ राहिली नाही. तिने आपल्या एका मैत्रिणीशीं गुप्त मसलत केली आणि तिच्या मदतीने ती पळून गेली. एका अटव्य वनांत जाऊन तिने तपःश्चर्या केली. शिव तिला प्रसन्न झाले. आणि त्यानीं तिचें पाणिग्रहण केलें. उमेने जें व्रत आचारिलें, त्याच प्रकारच्या व्रताला 'हरितालिका' असें म्हणतात.

**—बाळ सामंत**

× × ×





# भगवान श्रीकृष्ण

*पुञ्जीभूतं प्रेम गोपाङ्गनानाम्*
*मूर्तीभूतं भागधेयं यदूनाम् ।*
*एकीभूतं गुप्तवित्तं श्रुतीनाम्*
*श्यामीभूतं ब्रह्म मे संनिधत्ताम् ॥*

—राघवचैतन्य

•••••••••••••••••••••••••••••

*गोपिकांचें हें प्रेम पुंजीभूत*
*यदूवंशाचें भाग्य मूर्तिमंत*
*श्रुती गोपायित वित्त एक वाहे*
*श्यामरूपें हें ब्रह्म नांदताहे*

—राजा बढे





# भगवान श्रीकृष्ण

पुञ्जीभूतं प्रेम गोपाङ्गनानां
मूर्तीभूतं भागधेयं यदूनाम् ।
एकीभूतं गुप्तवित्तं श्रुतीनां
श्यामीभूतं ब्रह्म मे संनिधत्ताम् ॥


—राघवचैतन्य

••••••••••••••••••••••••••••

गोपिकांचें हें प्रेम पुंजीभूत
यदूवंशाचें भाग्य मूर्तिमंत
श्रुती गोपायित वित्त एक बाहे
श्यामरूपें हें ब्रह्म नांदताहे

—राजा बढे

# भगवान श्रीकृष्ण



मद्रास म्यूझियममधिल
'कालिया मर्दन' शिल्प

मना! अनंत जन्मांचा तुझा-माझा समागम आहे. पण मी देही आहें आणि तूं निराकार आहेस तुझा संचार त्रिकालाबाधित आहे. काळाच्या प्रवाहावर आरूढ होऊन तूं उलटगतीनं जाऊं शकतोस. कितीदा तरी पूर्वकालीन गोष्टींचा चित्रपट तूं मला दाखविला आहेस. त्या स्मृति अजूनहि माझ्या डोळ्यासमोर तरंगत आहेत. मित्रा! आज मला गोकुळ-वृंदावनांतील त्या बालमुकुंदाचं लोभनीय दर्शन घडवशील का?

अहाहा! गोकुळ हें नांव कानीं पडतांच युगायुगांच्या स्मृति डोळ्या-समोर नाचूं लागतात...मथुरेचा बंदिवास, ती भयानक काळोखी रात्र...

दुथडी भरून वाहणारी यमुना ओलांडून पैलतीरावर असलेल्या गोकुळांत वसुदेवानं हें थोर भाग्याचं लेणं निद्रिस्त यशोदामाईच्या कुशींत सोपवलं. बंदिवासिनी देवकीनं आपला चिमणा जीव यशोदेच्या ओटींत निरवला. देवकीचं दुःख यशोदेच्या आनंदांत परिणत झालं. तिचं पुत्रवात्सल्य यशोदेनं आत्मीयतेनं पुरवलं. देवकीचं हें बालब्रह्म यशोदेच्या कुशींत झोपलं. नंदाच्या अलिंदी रांगू लागलं. गोकुलवृंदावनाच्या परिसरांत तीं इवलीं पावलं पैजणांचा नाद पेरू लागलीं. कुंजवनाच्या कांतारांत जिवाशिवाचे लपंडाव सुरू झाले. तिथं भक्तीचा मळा फुलला. प्रीतपाखरांची किलबिल फडफडल्या पंखांत मिटूं लागली. पुरवासिनी संचाराची जाणीव विसरल्या. यमुनापुलिनावरील वाळूवर केलेल्या रासलीलेने, मेंदी माखलेल्या पैंजणपावलांच्या मुरलीमंजुलकलरवमीलित नादरंगावली उमटूं लागल्या. वृत्तिकमलिनी फुलून आल्या. भक्तिरसपान करतांना मधुमिलिंदांचं मंजुगान सुरू झालं.

लाडक्या ब्रिजलालाभोवती कामनागोपी पिंगा घालूं लागल्या.

**कामना गोपी, गोपी सकल जमल्या**
**वृत्तिचा गोफ विणुन दमल्या**
**तुझ्या भेटीची उत्कंठा हीच तुझी चंद्रावळ**
**मनोमनीं श्रद्धा हीच तुझी राधा**

आणि या राधेसाठी तूं प्राण पाखडलेस. तो राधाधरमधुमिलिंद

**राधामुखारविंदाभवती मिलिंद घालित रुंजी**
**त्रिलोकसुंदर वृंदावन तें, कुंजनीलिमा पुंजी**
**व्रजसुंदरिच्या हृदयानंदा पुरवीं लीलारमणा**
**कंसध्वंसना देवकिनंदन धूमकेतु हा जाणा**
**जें झालें अनुरंजना प्रियजना सानंद इंदीवर**
**लीलालालित शाम कामललिता गोपांगना सुंदर**
**आलिंगी रसरंग हो मधुवनीं श्रृंगारश्रीरंग हा**
**खेळे रासविलास नीलकमलीं कामोत्सवीं भृंग हा**
**कामसुंदरा रमवीं रतिलालस व्रजबाला**

**राधेविण कोण परी भुलवी गे ब्रिजलाला**
**वेढियलें कृष्णप्रिया मदयंती युवतींनी**
**क्लेश हरो केशव तो हृदयिं वसो रातदिनीं**

गोकुळवासी जनांच्या 'ध्यानीं मनीं एक शाम'च नांदत होता. पहाट फुलूं लागली. काळोख धूसर होऊं लागला. विहंगाची किलबिल वसुंधरेला जाग आणूं लागली. चारुगात्री राधा अजून झोपेंतच होती. कसलं तरी स्वप्न ती बघते आहे. किती रंगून गेली आहे त्या स्वप्नांत! आपल्या लाडक्या ब्रिजलालाशीं तिनं लटका अबोला धरला आहे. तिची बहीण चंद्रावळ यमुनेवर पाण्याला गेली असतांना या खट्याळानं तिची वाट अडवली! पण तिनंहि याला चांगलंच छेडलं. "कृष्णा! मी ती राधा नव्हें हो! मी आहें चंद्रावळी. माझी तुझ्यावर मुळीच श्रद्धा नाही. त्या राधेसारखी केवळ तुला पाहण्याची उत्कंठा होती. त्याचा असा उपयोग करणं हिताचं नाही बजावून ठेवतें."

ओढून आणलेलं चंद्रबळ फोल ठरलं. तिनं राधेजवळ कृष्णाची कागाळी केली. बहिणीची कड घेऊन राधा मोठेपणानं नाही नाही तें बोलली— अखेर यशोदेकडे गाऱ्हाणं नेण्याचीहि भीति घातली. त्यामुळंच कृष्ण तिच्याशीं बोलेनासा झाला. तो तिला भेटणार नव्हता—तिच्यासाठी वेणू देखील वाजवणार नव्हता. चंद्रावळ काय किंवा राधा काय—त्यांचा तंटा लटका, त्यांचं भांडणं खोटें. त्यांचा अबोला ओटांतच मिटायचा. एकदा मुरलीचे मंजुळ स्वर कानीं पडले की सारं भान विसरून त्या कुंजवनाकडे धाव घेत. पण यावेळीं कृष्ण त्यांच्या दृष्टीसच पडणार नव्हता.

ती असलंच स्वप्न बघत होती. माधवाच्या शोधार्थ कालिंदीच्या तटावर आली होती. लतातरूंना विचारीत होती—पाखरांना पुसत होती—'माझा शाम कुठं आहे ग?' शुकानं तिला सांगितलं,

**वृंदावनिं तुज भेटेल माधव नीट सरळ जा या वाटेने**
**दिसतिल तुज हरिचरण उमटले यमुनेच्या काठाकाठाने**
**हारांचे सर श्रीहरिचे हे तुटुनि विखुरले वाळूवरती**
**जिकडे गेला माधव तिकडे वनमालेचीं सुमनें दिसती**

दुथडी भरून वाहणारी यमुना ओलांडून पैलतीरावर असलेल्या गोकुळांत वसुदेवानं हें थोर भाग्याचं लेणं निद्रिस्त यशोदामाईच्या कुशींत सोपवलं. बंदिवासिनी देवकीनं आपला चिमणा जीव यशोदेच्या ओटींत निरवला. देवकीचं दुःख यशोदेच्या आनंदांत परिणत झालं. तिचं पुत्रवात्सल्य यशोदेनं आत्मीयतेनं पुरवलं. देवकीचं हें बालब्रह्म यशोदेच्या कुशींत झोपलं. नंदाच्या अलिंदी रांगूं लागलं. गोकुलवृंदावनाच्या परिसरांत तीं इवलीं पावलं पैंजणांचा नाद पेरूं लागलीं. कुंजवनाच्या कांतारांत जिवाशिवाचे लपंडाव सुरू झाले. तिथं भक्तीचा मळा फुलला. प्रीतपाखरांची किलबिल फडफडत्या पंखांत मिटूं लागली. पुरवासिनी संचाराची जाणीव विसरल्या. यमुनापुलिना-वरील वाळूवर केलेल्या रासलीलेने, मेंदी माखलेल्या पैंजणपावलांच्या मुरलीमंजुल्कलरवमीलित नादरंगावली उमटूं लागल्या. वृत्तिकमलिनी फुलून आल्या. भक्तिरसपान करतांना मधुमिलिंदांचं मंजुगान सुरू झालं.

लाडक्या ब्रिजलालाभोवती कामनागोपी पिंगा घालूं लागल्या.

**कामना गोपी, गोपी सकल जमल्या**
**वृत्तिचा गोफ विणुन दमल्या**
**तुझ्या भेटीची उत्कंठा हीच तुझी चंद्रावळ**
**मनोमनीं श्रद्धा हीच तुझी राधा**

आणि या राधेसाठी तूं प्राण पाखडलेस. तो राधाधरमधुमिलिंद

**राधामुखारविंदाभवती मिलिंद घालित रुंजी**
**त्रिलोकसुंदर वृंदावन तें, कुंजनीलिमा पुंजी**
**व्रजसुंदरिच्या हृदयानंदा पुरवीं लीलारमणा**
**कंसध्वंसना देवकिनंदन धूमकेतु हा जाणा**
**जें आलें अनुरंजना प्रियजना सानंद इंदीवर**
**लीलाललित शाम कामललिता गोपांगना सुंदर**
**आलिंगी रसरंग हो मधुवनीं श्रृंगारश्रीरंग हा**
**खेळे रासविलास नीलकमलीं कामोत्सवीं भृंग हा**
**कामसुंदरा रमवीं रतिलालस व्रजबाला**

**राधेविण कोण परी भुलवी गे ब्रिजलाला**
**वेढियलें कृष्णप्रिया मदयंती युवतींनी**
**क्लेश हरो केशव तो हृदयिं वसो रातदिनीं**

गोकुळवासी जनांच्या 'ध्यानीं मनीं एक शाम'च नांदत होता. पहाट फुलूं लागली. काळोख धूसर होऊं लागला. विहंगाची किलबिल वसुंधरेला जाग आणूं लागली. चारुगात्री राधा अजून झोपेंतच होती. कसलं तरी स्वप्न ती बघते आहे. किती रंगून गेली आहे त्या स्वप्नांत! आपल्या लाडक्या ब्रिजलालाशीं तिनं लटका अबोला धरला आहे. तिची बहीण चंद्रावळ यमुनेवर पाण्याला गेली असतांना या खट्याळानं तिची वाट अडवली! पण तिनंहि याला चांगलंच छेडलं. "कृष्णा! मी ती राधा नव्हें हो! मी आहें चंद्रावळी. माझी तुझ्यावर मुळीच श्रद्धा नाही. त्या राधेसारखी केवळ तुला पाहण्याची उत्कंठा होती. त्याचा असा उपयोग करणं हिताचं नाही बजावून ठेवतें."

ओढून आणलेलं चंद्रबळ फोल ठरलं. तिनं राधेजवळ कृष्णाची कागाळीं केली. बहिणीची कड घेऊन राधा मोठेपणानं नाही नाही तें बोलली—अखेर यशोदेकडे गाऱ्हाणं नेण्याचीहि भीति घातली. त्यामुळंच कृष्ण तिच्याशीं बोलेनासा झाला. तो तिला भेटणार नव्हता—तिच्यासाठी वेणू देखील वाजवणार नव्हता. चंद्रावळ काय किंवा राधा काय—त्यांचा तंटा लटका, त्यांचं भांडणं खोटें. त्यांचा अबोला ओठांतच मिटायचा. एकदा मुरलीचे मंजुळ स्वर कानीं पडले की सारं भान विसरून त्या कुंजवनाकडे धाव घेत. पण यावेळीं कृष्ण त्यांच्या दृष्टीसच पडणार नव्हता.

ती असलंच स्वप्न बघत होती. माधवाच्या शोधार्थ कालिंदीच्या तटावर आली होती. लतातरूंना विचारीत होती—पाखरांना पुसत होती—'माझा शाम कुठं आहे ग?' शुकानं तिला सांगितलं,

**वृंदावनिं तुज भेटेल माधव नीट सरळ जा या वाटेने**
**दिसतिल तुज हरिचरण उमटले यमुनेच्या काठाकाठाने**
**हारांचे सर श्रीहरिचे हे तुटुनि विखुरले वाळूवरती**
**जिकडे गेला माधव तिकडे वनमालेचीं सुमनें दिसती**

ध्वजवज्रांकित पदचिन्हें हीं नंदनवानेंचीं हीं वनसुमनें
तुजसाठी या खुणा ठेविल्या तुझ्या प्रीतिच्या श्रीकृष्णाने

'नाही ग राधे' कोकिळा बोलली.

एकाएकी तिची नीज चाळवली. पहाटेपर्यंत तेवत असलेल्या दीपकळी-सारखी ती स्वप्नस्मृतीहि तिच्या मनांत तरंगत होती. एकाएकी तिला मुरलीचे सूर ऐकूं आले. आणि जवळ निद्रित असलेल्या अनयाला चाहूल लागूं न देतां ती उठली. पण अनयहि जागाच होता. त्यानं तिला विचारलं—'

'कुठं निघालीस राधे?'

'कुठून बरं येतो आहे हा पावा?'

'अग भास होतोय तुला राधे—वंशवनांतून वेळूंतून विहरणारा हा पहाटवारा कृष्णाच्या मुरलीचा अनुकार करतो आहे.'

'नाही—माझा माधवच तो!'

हरीचा संकेत तिला कळला. अधीर मनानं आणि तरळत्या पावलांनी ती कुंजवनाकडे निघाली. कदंबाआड लपून बघूं लागली. पण तो कुठंच दिसेना. कुंजवनाभोवती, कालिंदीकूलावर तिनं फेरे घातले. 'कुठं आहे हो माझा गोविंद?' 'जिथं होता तिथंच तो आहे राधे...आपल्या हृदयांतच त्याचा शोध घे!' तें संकेतस्थल तिच्या पूर्ण परिचयाचं होतं. कालिंदीचा काठ पैंजणानं निनादला. आनंदानं उंचबळणाऱ्या कालिंदीच्या लहरींतून पैंजणाचे बोल उठत होते. कालिंदी सर्वांगानं डोलत होती. पण तिचा शाम तिला दिसेना. 'कां बरं माझा गोविंद माझ्यावर रुसला? मी त्याचीं आर्जवं करीन. म्हणेन—देवा, मी चुकलें!—सावळ्या! तुझ्या उदयामुळं आम्हांला उजाळा मिळाला—आमचीं प्रीतिपंकजं फुललीं—आशाआकांक्षांना पालवी फुटली! तुझी मुरली किती बरं भाग्यवती! तिनं तुला भारलं—आपल्या वंशकुलाला तिनं तारलं—तुझ्या अधरावर तिला अढळपद मिळालं! गोपसख्या माधवा! तुझ्या मुरलीचं भाग्य मला कधीकाळीं मिळेल का रे?

—मुकुंदा, आमचं हितगुज तूं जाणतोस एकदा, एकदाच तुझी ती विश्वमोहिनी मुरली—पण असं नको अं—

स्मिताला वदनीं वदनीं राजीव
तुझी मग मुरली वाजीव
प्रीतिला नयनीं नयनीं राजीव
तुझी मग मुरली वाजीव
हृदयीं वनमाला माला साजीव
तुझी मग मुरली वाजीव
राधिका जवळी जवळी लाज़ीव
तुझी मग मुरली वाजीव

मी इतकं विनवतें देवा! पण तूं इतका निष्ठुर कसा रे झालास! की तूंच कुठल्या संकटांत सापडलास!"

आणि त्याच वेळीं यमुनेच्या डोहांतून कालिया-फणीवर दमननृत्य करणारा राधेचा शामसखा हळू हळू पाणभुईवर दिसूं लागला. तें अभिनव दर्शन श्रीकृष्णाच्या पुढील पराक्रमाची नांदीच ठरलं.

असा तो भगवान श्रीकृष्ण.

कंसकंदनिं कुवलयपीडा जिंकिलें जयाने
भयाभीत झाली सारी सभा विस्मयाने
करित करी कुंभक्रीडा मस्त वारणातें
स्मरें मर्दितांना हातीं राधिकास्तनातें
घुमे नाद जिंकियला हा बालकृष्ण वीर
कंस कोसळे भीतीने जाहला बधीर
वृष्टी व्याकुळ गोकुळीं जनपदा द्यायास संरक्षण
तारी बाहुवरी गिरी उचलुनी गोविंद गोवर्धन
सानंदें व्रजसुंदरी अरुण या ओठीं जया चुंबिलें
तो बाहू, बलराज कृष्ण हृदयीं भक्तांचिया बिंबले.

—राजा वढे

× × ×

**ध्वजवज्रांकित पदचिन्हें हीं नंदनवानींचीं हीं वनसुमनें**
**तुजसाठी या खुणा ठेविल्या तुझ्या प्रीतिच्या श्रीकृष्णाने**

'नाही ग राधे' कोकिळा बोलली.

एकाएकी तिची नीज चाळवली. पहाटेपर्यंत तेवत असलेल्या दीपकळी-सारखी तीं स्वप्नस्मृतीहि तिच्या मनांत तरंगत होती. एकाएकी तिला मुरलीचे सूर ऐकूं आले. आणि जवळ निद्रित असलेल्या अनयाला चाहूल लागूं न देतां ती उठली. पण अनयहि जागाच होता. त्यानं तिला विचारलं—'

'कुठं निघालीस राधे?'

'कुठून बरं येतो आहे हा पावा?'

'अग भास होतोय तुला राधे—वंशवनांतून वेळूंतून विहरणारा हा पहाटवारा कृष्णाच्या मुरलीचा अनुकार करतो आहे.'

'नाही—माझा माधवच तो!'

हरीचा संकेत तिला कळला. अधीर मनानं आणि तरळत्या पावलांनी ती कुंजवनाकडे निघाली. कदंबाआड लपून बघूं लागली. पण तो कुठंच दिसेना. कुंजवनाभोवती, कालिंदीकूलावर तिनं फेरे घातले. 'कुठं आहे हो माझा गोविंद?' 'जिथं होता तिथंच तो आहे राधे...आपल्या हृदयांतच त्याचा शोध घे!' तें संकेतस्थल तिच्या पूर्ण परिचयाचं होतं. कालिंदीचा काठ पैंजणानं निनादला. आनंदानं उंचबळणाऱ्या कालिंदीच्या लहरींतून पैंजणाचे बोल उठत होते. कालिंदी सर्वांगानं डोलत होती. पण तिचा शाम तिला दिसेना. 'कां बरं माझा गोविंद माझ्यावर रुसला? मी त्याचीं आर्जवं करीन. म्हणेन—देवा, मी चुकलें!—सावळ्या! तुझ्या उदयामुळं आम्हांला उजाळा मिळाला—आमचीं प्रीतिपंकजं फुललीं—आशाआकांक्षांना पालवी फुटली! तुझी मुरली किती बरं भाग्यवती! तिनं तुला भारलं—आपल्या वंशकुलाला तिनं तारलं—तुझ्या अधरावर तिला अढळपद मिळालं! गोपसख्या माधवा! तुझ्या मुरलीचं भाग्य मला कधीकाळीं मिळेल का रे?

—मुकुंदा, आमचं हितगुज तूं जाणतोस एकदा, एकदाच तुझी ती विश्वमोहिनी मुरली—पण असं नको अं—

स्मिताला वदनीं वदनीं राजीव
तुझी मग मुरली वाजीव
प्रीतिला नयनीं नयनीं राजीव
तुझी मग मुरली वाजीव
हृदयीं वनमाला माला साजीव
तुझी मग मुरली वाजीव
राधिका जवळी जवळी लाज़ीव
तुझी मग मुरली वाजीव

मी इतकं विनवतें देवा! पण तूं इतका निष्ठुर कसा रे झालास! की तूंच कुठल्या संकटांत सापडलास!"

आणि त्याच वेळीं यमुनेच्या डोहांतून कालिया-फणीवर दमननृत्य करणारा राधेचा शामसखा हळू हळू पाणभुईवर दिसूं लागला. तें अभिनव दर्शन श्रीकृष्णाच्या पुढील पराक्रमाची नांदीच ठरलं.

असा तो भगवान श्रीकृष्ण.

कंसकंदनिं कुवलयपीडा जिंकिलें जयाने
भयाभीत झाली सारी सभा विस्मयाने
करित करी कुंभक्रीडा मस्त वारणातें
स्मरें मर्दितांना हातीं राधिकास्तनातें
घुमे नाद जिंकियला हा बालकृष्ण वीर
कंस कोसळे भीतीने जाहला बधीर
वृष्टी व्याकुळ गोकुळीं जनपदा द्यायास संरक्षण
तारी बाहुवरी गिरी उचलुनी गोविंद गोवर्धन
सानंदें व्रजसुंदरी अरुण या ओठीं जया चुंबिलें
तो बाहू, बलराज कृष्ण हृदयीं भक्तांचिया बिंबले.

—राजा बढे

× × ×





# दुर्गतिनाशिनी
# दुर्गा

*दीप्तक्षुद्वेगयोगाद्दनलहलहल्लम्ब जिव्हाग्रलीढं*
*ब्रह्माण्डक्षौद्रबिन्दुप्रबलतरभवज्जा ठराग्निस्फुलिङ्गाम्।*
*कालीं कङ्कालशेषामतुलगल चलन्मुण्डमालाकरालां*
*गुञ्जासंवादिनेत्रामंजिननिवसनां नौमि पाशासिहस्ताम्॥*

*उदरीं भडके क्षुधा म्हणुनिया ब्रह्माण्डहि जी घेत चाटुनी*
*लवलवणाऱ्या लांब जिभेनें—तरिहि प्रदीप्तच हो जठराग्नी*
*अस्थिशेष तनु, चर्मवसन वरि रुळती कंठीं रुण्डमालिका*
*खड्गपाशधर रक्तलोचना सभय वंदितों देवि कालिका*

—शान्ता ज. शेळके

# दुर्गतिनाशिनी दुर्गा



मयुरभंज येथील
महिषाशूर मर्दिनीं शिल्प

नैमिषारण्य हें सर्व तीर्थांत उत्तम आणि सर्व क्षेत्रांत श्रेष्ठ असें क्षेत्र. शौनकादि तपस्वी मुनींनी जगत्कल्याणार्थ तिथे एक महायज्ञ आरंभिला होता. दीर्घकालपर्यंत चालणाऱ्या या यागासाठी भरतखंडांतले सर्व तपोनिष्ठ कर्मनिष्ठ ऋषि तिथे एकत्रित झाले होते. आपल्या तपःसामर्थ्यानें त्रिकालज्ञत्व पावलेल्या या महात्म्यांच्या मेळाव्याचें दर्शन घडावें म्हणून महातपस्वी वेदव्यासशिष्य लोमेश मुनींचें तिथे आगमन झालें. त्यांना पाहून सर्व ऋषि-गणांत परमोल्हास निर्माण झाला. यथासांग स्वागतानंतर आणि आतिथ्यानंतर ऋषिजनांनी विस्तारपूर्वक शिवधर्मांचें विवेचन करण्यासाठी लोमेशांना प्रार्थना

केली. लोमेशांनीं ती मानली, आणि शिवमहात्म्याचें वर्णन यथासांग केलें. लोमेश कथा सांगत असतांनाच मध्येच ऋषिगण आपलें शंकानिरसन होण्याकरिता निरनिराळे प्रश्न विचारीत. आणि आपसांतच त्यांचें शंकानिरसन होई. एकानें प्रश्न विचारला होता—हे भगवन्, दुर्गा ही कोण आणि तिचा अवतार कशासाठी झाला? महामुनि म्हणाले—पूर्वी रुरु दैत्याचा पुत्र दुर्ग याने घोर तपश्चर्या करून भगवान् शिवाला प्रसन्न करून घेतलें. आणि पुरुषमात्राकडून आपण अवध्य व्हावें असें वरदान मागून घेतलें. भोलेनाथ तथास्तु म्हणून अंतर्धान पावले. या दुर्गदैत्याने आपल्या बाहुबलावर त्रैलोक्याचें राज्य जिंकलें, आणि अत्यंत उन्मत्त होऊन देवब्राह्मणांच्या छळवादाला सुरुवात केली. वेदाध्ययन थांबलें, यज्ञशाळांचा विध्वंस झाला. देव, ब्राह्मण दीन, हीन, अनाथ झाले. आपद्ग्रस्त असे हे सर्व देव-ब्राह्मण भगवान महेश्वराला शरण गेले. नीलकंठांना आपण दिलेल्या वराची आठवण झाली. आणि त्यांनी भगवतीकडे एक आदेशपूर्ण दृष्टिक्षेप टाकला. भवानीने त्याच क्षणीं शरणार्थींना अभयदान दिलें. तिने विक्राळ रुद्रशक्ति धारण केली आणि कालरात्रीला आवाहन करून ती महाकालीरूप झाली. दुर्गदैत्याच्या नगरांत जाऊन तिने त्याला युद्धाचें आव्हान दिलें. दुर्गाचें आणि महाकालीचें घनघोर असें युद्ध झालें. देवीला पराभूत करायला दैत्यराजाने अनेक मायावी रूपें धारण केलीं; परंतु जगदम्बेने आकाशांत उड्डाण केलें. अंतराळांत आपण तिला सहज पराभूत करूं शकूं म्हणून दुर्गदैत्यहि तिच्या मागोमाग उडाला. देवीला हेंच पाहिजे होतें. तिने त्रिशूळाच्या प्रहाराने त्याची छाती फोडली, आणि त्याला अलगत भूलोकावर ढकलून दिला. त्या पर्वतप्राय असुराचे राईराईएवढे तुकडे झाले. दैत्यवधानंतर देवतांनी दुदुंभि वाजवून आनंद प्रदर्शित केला, आणि सच्चिदानंद प्रणवरूपिणी आदिमायेचें स्तवन केलें. कोपाविष्ट देवी शांत झाली. दुर्गदैत्याचा वध केला म्हणून ती दुर्गा या नांवाने प्रसिद्ध झाली.

दुर्गदैत्याचा वध झाला आणि देवी अंतर्धान पावली; परंतु एवढ्यानेच तिचें कार्य संपलें नाही. दुर्गाच्या वंशांतील महिषानेंहि बिकट तपःसाधना

केली आणि महादेवांना प्रसन्न करून घेतलें. त्यांच्या वरप्रभावाने तोहि मातला! सर्व देवांना त्याने सळो की पळो करून सोडलें. तेव्हा ब्रह्मा-विष्णु-महेशांनी दुर्गेची प्रार्थना केली. देवी प्रकट झाली तेव्हा तिच्या अष्टभुजा निःशस्त्र होत्या. त्याच वेळीं ब्रह्मा-विष्णु-महेशांच्या मुखांतून ज्वाळा निघाल्या आणि आदिमायेच्या शरिरांत विलीन झाल्या. देवीचें शरीर तेजःपुंज झालें. वैकुंठाने तिच्या एका हातांत सुदर्शन दिलें, लगेच शिवांनीहि दुसऱ्या हातांत त्रिशूळ दिला. याचप्रमाणे ब्रह्मदेव, इंद्र, कुबेर, अग्नि, विश्वकर्मा, वरुण, यांनी तिच्या प्रत्येक हातांत शस्त्र दिलें.

सायुध अशी देवी विंध्य पर्वताच्या दिशेने चालत गेली. महिषाने ज्यावेळीं तिला पाहिली त्यावेळीं अचकटविचकट शब्द उच्चारून त्याने तिला पकडायचा प्रयत्न केला; परंतु त्याला हुलकावण्या देत चकवायचा प्रयत्न देवी करूं लागली. दैत्याने निरनिराळीं रूपें धारण केलीं. शेवटीं तो युद्धास प्रवृत्त झाला. नऊ रात्री हें युद्ध चालू होतें. अखेर दुर्गेने आपल्या त्रिशूळाने महिषावर प्रहार करून त्याला ठार मारलें. महिषासुराच्या वधामुळे देवीला महिषासुरमर्दिनी असें नांव पडलें. देवांनी दुर्गेची स्तुति करून नऊ रात्री मोठा उत्सव केला. तेव्हापासून ही नवरात्राची प्रथा सुरू झाली.

दोन्ही वेळां केवळ आपणामुळे जगदम्बेला श्रम झाले, यामुळे तरी पस्तावून महादेवांनी गप्प बसावें; परंतु नाही! भोळ्या सांबाने कठीण तपस्या करणाऱ्या शुंभ-निशुंभ दैत्यांना असाच एक बेफाट वर दिला—आणि ते प्रबळ झाले. कुणालाहि ते आटोपेनात. तेव्हा चामुंडा देवीच्या रूपाने दुर्गा अवतरली. आणि तिने या दोन्ही असुरांचा संहार केला. चामुंडा दशभुजा आहे. ती सिंहावर आरूढ झालेली अशी आहे. मुकुटधारी असून अंगावर रत्नजडित वस्त्रें आहेत.

‘काळ’ या नांवाचा एक राक्षस असाच मदोन्मत्त झाला. आर्यांना आणि अनार्यांना—मिळेल त्याला—भक्षण करायचा त्याने सपाटा चालवला होता. त्यावेळीं दुर्गेने कालीचें रूप घेतलें. त्या वेळच्या तिच्या रूपाचें

वर्णन काय करावें. ती अर्धनग्न होती. कमरेला तोडलेल्या हातांच्या माळेचा पट्टा घातला होता. गळ्यांत नरमुंडांची माळ होती. आपल्या काळ्याकभिन्न शरिरावर तिने रक्ताचे पट्टे ओढलेले होते. चतुर्भुज अशा या मूर्तीच्या एका हातांत प्रचंड खड्ग होतें. काळाच्या बाजूने रक्तवीर नांवाचा एक राक्षस तिच्याशीं लढूं लागला. तेव्हा आपल्या खड्गाने तिने त्याचें डोकें कापून, त्या रक्तवीराचें रक्त ती घटघटा प्याली. नंतर काळालाहि ठार केलें. या विजयोन्मादाच्या भरांत ती थै थै नाचूं लागली. तिच्या त्या तांडवनृत्याने पृथ्वी थरथरां कापूं लागली. ती कशाच रीतीने आवरेना तेव्हा तिच्या पायाखाली भगवान् शंकरांनी आपला देह अंथरला. बेभान नाचणाऱ्या कालीने आपल्या पायाखालीं येणाऱ्या शंकरांना पाहिलें. अचानक तिची नजर गेली. ती लाजली आणि स्त्रीसुलभ वृत्तीने तिने आपली जीभ बाहेर काढली. (देवीचें तेंच रूप अधिक प्रसिद्ध आहे.) लवलवणाऱ्या लांब जिभेचें खड्गपाशधर, रक्तलोचना असें तें अक्राळविक्राळ रूप पाहून सर्व देवता घाबरल्या. तेजोगोलांचें तेज नाहीसें झालें. महाकालीने कराल नृत्य थांबविलें खरें; पण तिचा क्रोधाग्नि कांहीं शांत झाला नाहीं. तिच्या शरिरांतून प्रगट होणाऱ्या अग्निस्फुलिंगांनी पृथ्वीला दाह होऊं लागला. ब्रह्मा, विष्णु, महेशासह सर्व देवता एकत्र झाल्या आणि त्यांनी स्तुति आरंभिली—

"संपूर्ण जगताचें धारण-पोषण करणाऱ्या महादेवी, तुला आमचा नमस्कार असो ! त्रैलोक्यव्यापिनी कल्याणमयी शिवे तुला नमस्कार असो ! हे विष्णुस्वरूपे तूंच संस्कृतीची जन्मभूमि आहेस ! इंद्र, चंद्र, कुबेर, वरुण, यम, ईशान आणि अग्नीची शक्ति देखील तूंच ! सूर्याच्या प्रभेची शक्तीहि तूंच आहेस ! चतुराननस्वरूपे देवी पंचमहाभूतें हीं तुझीं रूपें आहेत. तूं इंद्रियांची अधिष्ठात्री देवता. पंचमहाभूतांना मिळवून तूंच हा ब्रह्मांडगोळा निर्माण केलास. आणि तुझी इच्छा झाली तर तूंच क्षणांत निर्दाळण करूं शकशील; परंतु हे महामाये तूं जगताची आधारशक्ति आहेस. दृष्य, अदृष्य, स्थूल, सूक्ष्मरूपांतहि तुझीच शक्ति विद्यमान आहे. आमचें रक्षण तुझ्याशिवाय

अन्य कोण करणार? तुझ्याशिवाय आम्ही कुणाला शरण जावें? हे त्रिशक्ति महामाये महादैत्याधिपति दुर्गाला मारून तूं आमचें रक्षण केलेंस. आम्ही तुझ्या चरणावर नतमस्तक आहोंत आम्हांला अभयदान दे! हे भवानी, तुझी करालदृष्टि आवरून अमृतमय दृष्टीने आमच्याकडे पाहा, आणि विपत्तीपासून आमचें रक्षण कर."

ऋषि, गंधर्व, चारणांसहित इंद्रादि देवांनी केलेली ती स्तुति ऐकून महांकालीमाता शांत झाली. तिने सर्वांना अभयदान दिलें आणि म्हणाली—"सर्व देव हो जा तुमचा अधिकार ग्रहण करा! तुम्हीं जी माझी स्तुति केलीत त्याने मी संतुष्ट झालेलें आहें. जो कोणी पवित्र भक्तीने माझें स्मरण करील त्याला विपत्ति कधीहि शिवणार नाही असें मी वरदान देतें."

महामुनि लोमेशांनी सांगितलेल्या या कथा स्कंदांनी अगस्तीस सांगितल्या. त्या स्कंदपुराण म्हणून लौकिकमान्य झाल्या. या स्कंद पुराणाचे ८११०० श्लोक आहेत. आणि त्यांत दुर्गेसंबंधी अनेक कथा आढळतात. स्कंदपुराणाच्या ६ संहिता आणि ५० निरनिराळे खंड आहेत. रेवा खंडांत निराळ्या, काशी खंडांत निराळ्या, तसेंच माहेश्वर, ब्रह्म, प्रभास, अवन्ती, नागर इत्यादि खंडांत जगदम्बा दुर्गेच्या नांवावर शेकडो कथा आढळतात. तसेंच दुर्गापूजेचे प्रकार देखील भारतांतील प्रत्येक प्रांतांत वेगवेगळ्या तऱ्हेचे आहेत. गुजरातेंत—पांढऱ्या रंगाने भिंत सारवून त्यावर शेंदुराचा त्रिशूळ काढतात आणि त्याच्या पुढ्यांत मातीचा ढीग रचून त्यावर धान्य पेरतात. एका छिद्रांकित मातीच्या कलशांत दिवा ठेवून तो त्या त्रिशूळासमोर ठेवला जातो आणि नऊ रात्रीपर्यंत अखंडितपणें तो पेटत राहतो. नवव्या दिवशीं नृत्य-गायनादि प्रकारांसह उत्सवाचें विसर्जन होतें! महाराष्ट्रांत मूर्तीऐवजी कलशावर देवीची स्थापना करतात. कलशासभोवती धान्यहि पेरण्याची पद्धत आहे. भवानीआई, अंबाबाई आदि देवींचे भक्त या दिवसांत मशाली घेऊन घरोघरीं कपडे गोळा करीत फिरत असलेले सर्वपरिचित आहेत. रजपूत लोकांत तोफेवर कुंकवाचा त्रिशूळ काढून त्याची पूजा नवरात्रांत करण्याची पद्धत आहे. दक्षिणेकडील देवळांतहि मोठ्या प्रमाणावर नवरात्राचा उत्सव होतो.

गोमंतकांत, विशेषतः ‘अंत्रुज महालांत’, पत्र-पुष्प-फल-तोयाची समृद्धि असल्याने तिथे या उत्सवाला अधिक रंग येतो. उत्सवमूर्ति आरतीच्या वेळीं मखरांत बसवून त्या मखराला झोके दिले जातात. समोर सुस्वरवाद्यांचा गजर एकसारखा चालत असतो. आणि त्या तालावर तें मखर हालवलें जातें. भारतांतील इतर कोणत्याहि प्रांतापेक्षा बंगालांत दुर्गापूजा हा कुलाचार असल्याने तिथे या महोत्सवाचें महत्त्व फार आहे. देवीच्या मूर्तीबरोबरच घटस्थापना करून वाद्य-नृत्य-गायन-ललितादि कार्यक्रमाच्या जल्लोशाबरोबरच दीपोत्सवहि केला जातो. ‘कालीमातेचा विजय असो’ अशा घोषाने कलकत्ता नगरी दुमदुमून जाते. शेवटच्या तीन रात्री महापूजेच्या असतात. उच्चनीचतेच्या किंवा कसल्याहि हीन भावनांचा लेश या काळांत तिथे मानला जात नाही. स्त्री-पुरुष, राव-रंक सगळेच आपण एकाच कालीमातेचीं लेकरें आहोंत असें समजून देवीसमोर शिर नमवतात. दुर्गेच्या या पूजेंत पशुबलीचे प्रकार मात्र भारतांत सर्व ठिकाणीं अजून आहेत. नवरात्र संपतें आणि दसरा उदय पावतो. वास्तविक दसरा हा कृषिविषयक सण आहे. आपल्या कृषिप्रधान देशांत नवधान्याच्या उत्सवाप्रीत्यर्थ तो साजरा केला जातो असा उल्लेख कांही ग्रंथांत सांपडतो. स्कंद पुराणांत या संबंधींची एक कथा जोडलेली आहे. वरतंतु ऋषीच्या कौत्स नांवाच्या शिष्याने विद्या-विभूषित झाल्यावर आपल्या गुरूला गुरुदक्षिणा मागण्याबद्दल अत्याग्रह केला. वरतंतूंनी चौदा कोटी सुवर्णमुद्रा मागितल्या. कौत्साने तें मान्य करून तो दानशूर आणि उदार अशा रघुराजाकडे गेला. याच वेळीं रघुराजा विश्वजित् यज्ञ करून निष्कांचन झालेला होता; परंतु कांही झालें तरी याचकाची इच्छा पुरी करायची प्रतिज्ञा करून, त्यानें इंद्राशीं एवढ्या रकमेची मागणी केली आणि न दिल्यास लढण्याची तयारी दर्शविली. इंद्राने कुबेराकडून अयोध्या नगरीच्या बाहेर असलेल्या शमीच्या झाडावर सुवर्ण-मुद्रांचा वर्षाव केला. रघूने त्या सर्व मुद्रा कौत्साला दिल्या. कौत्साने त्या आपल्या गुरूस दिल्या. परंतु चौदा कोटीच्या वर कांही वरतंतू घेईना म्हणून कौत्साने परत आणून दिलेल्या बाकी सुवर्णमुद्रा शमीच्या झाडाखाली ठेवून

रघुराजाने त्या प्रजाजनांस लुटायला सांगितल्या. सुव्रत अशा प्रजाजनांनी त्या शमीची पूजा करून मगच त्या मुद्रा लुटल्या. तो दिवस आश्विन महिन्यांतील शुक्ल दशमीचा होता. प्रतिवर्षी रघुराजाच्या अयोध्या नगरींत चाल होती; परंतु कालांतराने फक्त शमीच्या झाडांचीं पानेंच लुटण्याचा प्रघात राहिला.

श्रीरामचंद्रांनी रावणाशीं युद्ध करायला आश्विन शुद्ध दशमीच्या सुमुहूर्ता-वर सीमोल्लंघन केलें म्हणून या दिवसाला सीमोल्लंघनाचें महत्त्व प्राप्त झालेलें आहे अशी कथा रामायणांत आहे. पांडवांचा अज्ञातवासहि याच दिवशीं संपला. विराट नगरींत जातांना सीमेवर असलेल्या दुर्गेच्या प्रतिमेची धर्मांनी भक्तिभावाने पूजा केली. आणि आपलें रक्षण करण्याची विनंती केली. धर्मराजाने केलेलें हें दुर्गास्तोत्र प्रसिद्ध आहे. पांडवप्रतापांत श्रीधरांनी त्याचें सुंदर मराठी भाषांतर केलेलें आहे. धर्मराजाला प्रसन्न झालेली जगदंबा म्हणते, "तुम्ही वास्तव्य करा येथ । प्रगट नेदीच जनांत । शत्रू क्षय पावतील समस्त । सुख अद्भुत तुम्हां होय ।। त्वां जें हें स्तोत्र केलें संपूर्ण । तें पठण करील रात्रंदिन । त्यासी मी दुर्गा प्रसन्न होऊन । वर प्रसाद देईन ।।"

—गोपाळकृष्ण भोबे

x x x



# दत्त दिगंबर

मालाकमण्डलुधरः करपद्मयुग्म ।
मध्यस्थपाणियुगले डमरुत्रिशूले ।
यस्य स्त ऊर्ध्वकरयोः शुभशङ्खचक्रे ।
वन्दे तमात्रिवरदं भुजषट्कयुक्तम् ॥

माला आणिक कमंडलू या दोन्हीं करकमली धरलेलीं
डमरूसह हे त्रिशूळ वरिले मध्य-स्थित या पाणी-युगलीं
दोन्हीं ऊर्ध्वकरांतुनि ज्यांच्या शुभशंखासह चक्र गरगरे
' सहाभुजां ' ना नित्य वंदीं तूं तारिल तारक तीन-वरें

— लोककवि **श्री मनमोहन**



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 37646 दि: 
क्रमांक 304 नों: दि:

# दत्त दिगंबर



दत्त दिगंबर हें साक्षात्कारी दैवत आहे. तत्काळ फळ देणारें असें दत्ताशिवाय अन्य दैवत नाही, असा मुमुक्षु लोकांचा समज आहे. तशा जाज्वल्य निष्ठेने गुरुचरित्राच्या सप्ताहाचें पारायणव्रत केलें तर सातव्या दिवशीं स्वप्नांत किंवा जागृतावस्थेंत दृष्टांत होतो, असा भक्तांना अनुभव आहे. दत्तभक्ति ही शुचिर्भूत, शुचिष्मंत वृत्तीनेच करावी लागते. त्यांत कांही आगळिक झाली तर परिणाम उलटाहि होतो. कारण दत्त ही उग्रमूर्ति असून ती क्षमाशील नाही. याविषयींच्या पडताळ्याच्या कथा श्रीगुरुचरित्रांत विस्ताराने सांगितलेल्या आहेत. दत्तभक्तीने अंगीं निष्ठा बळावते. सत्त्व, रज, आणि तम हे तीन गुण सर्व प्राणिमात्रांस खेळवीत असतात. या तिन्ही गुणांच्या आहारीं जाऊन, भलतीं सलतीं कृत्यें आपल्या हातून घडूं

नयेत म्हणून निष्ठेने ही त्रिगुणात्मक त्रैमूर्तीच्या भक्तीची प्रथा आपल्या पूर्वजांनी अंगीकारिली असावी.

दत्तजीवनासंबंधी मार्कंडेय पुराणांत वेगळी, स्कंद पुराणांत वेगळी व महाभारतांतल्या अनुशासन पर्वांत वेगळी, अशा वेगवेगळ्या कथा आहेत. कर्दम प्रजापतीची पत्नी देवहूति हिला दोन मुलें झालीं. एक कपिल महामुनि व दुसरी अनसूया. भगवान् कपिलदेव हा जगदीश्वराचाच अवतार होता. सिद्धमुनींत तो अग्रगण्य समजला जातो. सांख्यशास्त्राचा त्यानेच प्रचार केला. अनसूया ही ब्रह्मदेवाच्या आज्ञेने अत्रिऋषीची पत्नी झाली. अत्रिऋषींनी आपल्या सनत्सुजात या थोरल्या भावापासून मंत्ररहस्य व उपासना पद्धतीचें सांगोपांग ज्ञान प्राप्त करून घेतलें होतें. आपल्या पोटीं कुलदीपक संतान व्हावें म्हणून दोघांनीहि घोर तपश्चर्या केली. महापतिव्रता अनसूयेचा दरारा फार मोठा होता. सूर्य-चंद्र तिच्या आज्ञेशिवाय उगवत नसत अशी आख्यायिका होती. एकदा देवर्षि नारद फिरत फिरत तिच्या आश्रमांत आला. सती अनसूयेने त्याचें चांगलें स्वागत केलें. तिला आशीर्वाद देऊन नारद तडक कैलासाला गेला. आणि स्वतःच्या सद्गुणांबद्दल अत्यंत गर्वयुक्त असणाऱ्या पार्वतीजवळ त्याने अनसूयेची वारेमाप स्तुति केली. आपल्याहून श्रेष्ठ अशी अन्य स्त्री, शिवाय ती पृथ्वीतलावर, असावी हें शल्य पार्वतीला सहन झालें नाही. तिच्या मनांत असूया उत्पन्न झाली, व कांही तरी करून या अनसूयेचें सत्त्व हरण केलें पाहिजे असा हट्ट तिने शिवाजवळ धरला.

इकडे नारद ब्रह्मलोकाला गेला व ब्रह्मपत्नीच्या मनांत किल्मिष उत्पन्न करून तिथून वैकुंठाला जाऊन लक्ष्मीच्याहि मनांत मत्सर पेरून तो स्वस्थानीं गेला. झालें. ब्रह्मा-विष्णु-महेशांच्या स्वाऱ्या स्त्रीहट्ट पुरविण्यासाठीं ब्राह्मणांच्या रूपाने अत्रिऋषींच्या आश्रमापाशी टळटळीत दुपारीं येऊन 'भिक्षां देहि' म्हणाल्या. अनसूया त्यावेळीं आंघोळ करीत होती. "थांबा, मी विवस्त्र आहें, एवढी आंघोळ पुरी करतें, आणि तुम्हांला इच्छाभोजन देतें" असें तिने आंतून ओरडून सांगितलें, परंतु "असभ्य

तशी बाहेर येऊन भिक्षा वाढ, नाहीतर अम्ही शाप देऊं!” असे शब्द बाहेर उभ्या असलेल्या त्या तिन्ही ब्राह्मणांनी उच्चारतांच पतिभक्तिपरायण अशा त्या पतिव्रतेने पतिचरणांचें मनांत चिंतन करून आंतूनच म्हटलें, “तुम्ही काय, मला लहान बालकांसारखेच आहांत. ही पाहा मी आलें भिक्षा घेऊन!”

आणि बाहेर येऊन तिने पाहिलें तों तीं तीन बालकें आपल्या आश्रमाच्या ओसरीवर खेळत असलेलीं तिला दिसलीं. इतक्यांत अत्रिऋषि अनुष्ठान आटोपून आश्रमांत आले. अंतर्ज्ञानाने त्यांनी सगळा प्रकार जाणला, आणि तिन्ही बाल्कांचें संगोपन करण्यास पत्नीस अनुज्ञा दिली.

एवढा लहानसा हट्ट पुरविण्याकरिता पृथ्वीवर गेलेले आपले नवरे कित्येक दिवसपर्यंत परत न आलेले पाहून देवपत्न्यांचें धाबें दणाणलें. डोळ्यांत प्राण आणून त्या प्रतीक्षा करीत होत्या. इतक्यांत पुनश्च देवर्षींची स्वारी हजर झाली, आणि तिघींचे नवरे बालरूपाने अनसूयेच्या आश्रमांत खेळतांना प्रत्यक्ष पाहिल्याचें त्यांनी देवपत्नींना सांगितलें. पश्चात्तापदग्ध अशा त्या तिघीहि अत्रींच्या आश्रमांत येऊन अनसूयेजवळ आपल्या पतींचें दान मागूं लागल्या. अत्रि आणि अनसूया यांनीं ब्रह्मा-विष्णु-महेशांची स्तुति करून त्यांना आपलें पूर्वीचें रूप घ्यायची विनंति केली. तिघांनीहि आपलें पूर्वीचें रूप धारण करून अत्रि-अनसूयेला इच्छित वर मागायला सांगितलें. आपल्या अंगावर वाढत असलेलीं हीं मुलें आपल्याला आता सोडून जाणार या विचाराने अनसूया दुःखित झाली; पण तिचें मनोगत जाणून देवांनी एकरूप होऊन तीन शिरें, सहा हात असलेला एक पुत्र अनसूयेला दिला. दत्त म्हणजे दिलेला, दत्तक, दैवाने लाभलेला. अचानक येऊन उभा राहिला म्हणून त्याचें नांव दत्त. त्रिमुखी म्हणून दत्तात्रेय व दिगंबर म्हणून अवधूत. परंपरागत चालत आलेली अशी दत्तात्रेयजन्माचीही एकच कथा. आणखीहि आहेत पण त्या विशेष प्रचारांत नाहीत.

महाभारतांतील अनुशासनपर्वांत, अत्रीला तीन पुत्र होते व दत्त हा त्यांपैकी एक असून अत्रीचा पुत्र म्हणून दत्त-आत्रेय या नांवाने प्रसिद्ध झाला,

असें आख्यान आहे. कांही ठिकाणीं तर दत्त हा एक ऋषि असून त्याला 'निमि' नांवाचा एक पुत्रहि होता अशी आख्यायिका आढळते. सृष्टिक्रमानुसार नवमास गर्भवास भोगून मार्गशीर्षाच्या पौर्णिमेस अनसूयेस पुत्र झाला. तोच दत्त, असा स्कंदपुराणांत उल्लेख आढळतो.

श्रीपादयति, नृसिंहयति, नरहरियति असे तीन दत्तसांप्रदायिक झाले. त्यांनी दत्तभक्तीचा बराच प्रसार केला. भाविक लोक त्यांना दत्ताचे अवतार मानतात. गाणगापूर, नरसोबाची वाडी आणि औदुंबर हीं दत्ताचीं राहण्याचीं ठिकाणें. गोव्यांत सांखळी, अबू, गिरनार, चिकमंगळूर, सातारा जिल्ह्यांतील अखलकोप हीं दत्ताचीं जाज्वल्य स्थानें मानलीं जातात.

तीन शिरें, सहा हात, मस्तकीं जटाभार, हातीं शंखचक्रादि तिन्ही देवांचीं आयुधें, काखेंत झोळी व पुढें चार श्वानें असें दत्तगुरूंचें रूप आहे. सोबतीला असणारीं चार श्वानें हीं चतुर्वेदरूप गणलेलीं आहेत. आपल्या अवतारकार्यांत दत्तांनी अनेक चमत्कार केले. निर्धनाला धन दिलें, निपुत्रिकांना पुत्र दिला, वांझ महिषीला दुभती केली, शुष्ककाष्ठाला पालवी फोडली, कृपादृष्टीने मृतात्मा सजीव केला. गुरुचरित्रांत या कथा मोठ्या रसाळपणें नामधारकांनी सिद्धाला सांगितलेल्या आहेत. दत्तसंप्रदायाची व नाथसंप्रदायाची घडण एक वाटते. महाराष्ट्र दोन्ही संप्रदायांना सारखाच मानतो. किंबहुना दत्त ही देवता महाराष्ट्रांत जेवढ्या भाविकतेने पूजिली जाते व तिच्या भक्तीचा महाराष्ट्रांत जेवढा प्रसार आहे, तेवढा भारतवर्षांतील अन्य प्रांतांत असेल की नाही शंका आहे.

महाराष्ट्रांतील खेड्यांत माध्यान्हकाळीं एखादा जोगी, बैरागी भिक्षेसाठी दारांत आला तर तो श्रीदत्तच असेल या भावनेने त्याची संभावना होते. दत्तभक्तीच्या आधीन झालेल्या माणसाचें "दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान। हरपलें मन झालें उन्मन" अशी अवस्था होते. दत्त हा भुतेंखेतें काढून लावणारा देव म्हणूनहि ख्याति आहे. अशा अवस्थेने पछाडलेले, भ्यालेले रोगी गाणगापूर किंवा नरसोबाची वाडी येथे जाऊन राहिले की कालांतराने बरे झालेलेहि अनेकांच्या पाहण्यांत आहेत.

दत्तभक्ति ही त्यागप्रधान तशीच अहिंसात्मक आहे. दत्तभक्तीच्या संप्रदायाला वाहून घेतलेल्या साधुसंतांनी जन्मभर तीर्थाटन व ईश्वरचिंतन करण्याकरिता सर्वसंगपरित्याग केल्याचें त्यांच्या चरित्रांवरून आढळून येतें. चौदाव्या शतकापासून आजपर्यंत श्रीपादश्रीवल्लभांपासून नारायणमहाराज जालवणकर, वासुदेवानंद सरस्वतींपर्यंत ज्यांना दत्तावतारच म्हटलें जातें असे अनेक संत होऊन गेले. विद्यमान लोकांत देखील संतपदवीला पोचलेले असे जे लोक आहेत त्यांत बहुसंख्य दत्तोपासक व दत्तभक्तीचे प्रसारक आहेत. बुद्धकालानंतरच्या कांही प्राचीन लेण्यांत दत्ताची त्रिमूर्ति दिसते. ती अलीकडील कांही चित्रांहून बरीच वेगळी वाटते.

श्रीदत्तांनी एकंदर चोवीस गुरु केले. अलर्क, प्रल्हाद, यदु, सहस्रार्जुन इत्यादींना दत्तांनी उपदेश दिला व त्यांच्यापासून घेतलाहि. त्यांनी केलेल्या चोवीस गुरूंच्या सुंदर कथा भागवताच्या अकराव्या स्कंधांत सांगितलेल्या आहेत. इच्छुकांनी त्या मनःपूर्वक वाचाव्या. अधिकारी पुरुषांना आजहि दत्तमहाराजांचें दर्शन होतें. करवीरांत ते भिक्षा मागतात, गोदावरीच्या तटाकीं त्यांचें भोजन होतें व सह्य पर्वतावर ते विश्रांति घेतात.

**— गोपालकृष्ण भोबे**

× × ×



# आद्यशक्ति
# श्री शिव

गर्जद्भीमभुजङ्गभीषणफणाफूत्कार भीतिप्रदः
क्रीडत्प्रेतपिशाचराक्षसगणः प्रत्यक्षतः प्रान्ततः ।
भालस्थप्रलयानलोद्भटशिखः संक्रान्तसर्वास्पदः
शार्दूलाजिनभृद्भयानकभयो भूयाद्भवो भूतये ॥

—सुभाषितरत्नभाण्डागारम्, शिवप्रकरणम्, क्र. ८७

भासे भेसुर जो भयंकर अशा नागामुळे उग्रशा
प्रेत आणि भुतें नि राक्षस जयाभोती नित क्रीडती !
भाळीं आग जळे विनाशक, धरी अंगांत व्याघ्राजिन
सर्वाधार, जरी भयावह करो कल्याण तो शंकर ॥

—शिरीष पै



# आद्य शक्ति श्री शिव



कोलंबो येथील
शिवाचें एक शिल्प

आ र्यांच्या आराधनेंतली महान् शक्ति म्हणजे शिव. उत्पत्ति आणि स्थितीचा लय करणाऱ्या त्या महान् संहारक अद्भुत शक्तीला शिवरूप मानून, तिलाच शरण गेल्याने प्रचंड उत्पातांपासून आपलें रक्षण होईल म्हणूनच आप, तेज, वायु, आकाश या विष्णुरूपांबरोबरच शिव या दैवतास प्राधान्य आलें. केवळ आर्यांनीच हें दैवत पूज्य मानलें असें नसून अनार्यहि रुद्रभक्तीचें महत्त्व मानूं लागले.

वेद त्याला शिव म्हणत नाहीत. ऋग्वेदांत त्याचा महिमा रुद्र या संज्ञेनेच वर्णन केलेला आहे. प्रजापतीची पत्नी उषा, हिला एक मुलगा झाला.

जन्माला आल्या क्षणापासून त्यानें भयानक असा आकांत करायला सुरुवात केली. विरिंचीनें त्याला त्याचें कारण विचारतांच तो म्हणाला, "हे प्रजापते, माझ्यांतल्या सर्व अमंगलांचा प्रथम नाश कर आणि माझें नामकरण कर." प्रजापतीने त्याला वरदान देऊन त्याचें नांव रुद्र असें ठेवलें. जन्मल्यापासून प्रचंड असें रोदन करणारा म्हणून तो रुद्र, असें स्कंदपुराण सांगतें.

विष्णुपुराणांत एक विलक्षण कथा आहे. एकदा ब्रह्मा आणि शिव यांच्यांत 'अधिक श्रेष्ठ कोण' याबद्दल आपसांत घोर युद्ध झालें. या युद्धांत शिवांनी ब्रह्म्यांचें एक शिर कापून घेतलें; पण ज्या हातांत त्यांनी तें शिर कापून घेतलें होतें, तो हातच लुळा झाला. या घटनेमुळे शिव स्तंभित झाले. ती संधि साधून ब्रह्म्याने मायेने एक वीर निर्माण करून त्याला शिवांवर सोडला. शिवांना त्याचा प्रतिकार करतां येईना. त्यांनी तिथून पळून जाऊन वाराणशींत आश्रय घेतला, व तेथे राहून ब्रह्महत्त्येच्या पातकाचें क्षालन केलें.

शिवाच्या रूपांत अधिक भयानकपणा आणला तो अनार्यांनी. त्यांनी त्यांना वनराजाचें रूप दिलें. त्यांच्या गळ्यांत रुंडमाळा घातल्या. आपल्याप्रमाणे त्यांना मृगचर्म नेसविलें. भीतिप्रद अशा जागीं रक्षणकर्ता म्हणून त्यांच्या प्रतिमा स्मशानादि ठिकाणीं स्थापन केल्याने स्मशानावर त्यांचें स्वामित्व आहे असा लौकिक झाला. यजुर्वेदांत व महाभारतांत शिवासंबंधीं अनेक कथा सांगितल्या आहेत. ईशानसंहिता, शिवपुराण आदि ग्रंथांतहि शिवाचें श्रेष्ठत्व सांगणाऱ्या कथा आहेत. किंबहुना ब्रह्माविष्णूपेक्षाहि शिवमहिमा मोठा आहे असेंहि त्यांत सांगितलें आहे. समुद्रमंथनांतून जें हालाहल निघालें तें समुद्रांत किंवा पृथ्वीवर कुठेहि टाकलें असतें, तर सर्वनाश झाला असता. सर्व देव घाबरून गेले. त्यांना कांही युक्ति सुचेना. अशा वेळीं एकच रक्षणकर्ता पुढे आला—तो म्हणजे श्रीशिव. त्यांनी तें कंठांत धारण केलें व त्या जालीम सर्वनाशी विषामुळे शिवांचा कंठ निळा झाला. त्या वेळेपासून त्यांना 'नीलकंठ' हें नांव पडलें.

प्रजापति दक्षाने, परमेष्ठी ब्रह्मयाची आज्ञा शिरसावंद्य मानून आपली सती नांवाची कन्या श्रीशिवांना दिली. एका क्षुल्लक घटनेवरून सासऱ्याचें व

# दुर्गतिनाशिनी दुर्गा



मयुरभंज येथील
महिषाशूर मर्दिनी शिल्प

नैमिषारण्य हें सर्व तीर्थांत उत्तम आणि सर्व क्षेत्रांत श्रेष्ठ असें क्षेत्र. शौनकादि तपस्वी मुनींनी जगत्कल्याणार्थ तिथे एक महायज्ञ आरंभिला होता. दीर्घकालपर्यंत चालणाऱ्या या यागासाठी भरतखंडांतले सर्व तपोनिष्ठ कर्मनिष्ठ ऋषि तिथे एकत्रित झाले होते. आपल्या तपःसामर्थ्यानें त्रिकालज्ञत्व पावलेल्या या महात्म्यांच्या मेळाव्याचें दर्शन घडावें म्हणून महातपस्वी वेदव्यासशिष्य लोमेश मुनींचें तिथे आगमन झालें. त्यांना पाहून सर्व ऋषि-गणांत परमोल्लास निर्माण झाला. यथासांग स्वागतानंतर आणि आतिथ्यानंतर ऋषिजनांनी विस्तारपूर्वक शिवधर्माचें विवेचन करण्यासाठी लोमेशांना प्रार्थना

केली. लोमेशांनीं ती मानली, आणि शिवमहात्म्याचें वर्णन यथासांग केलें. लोमेश कथा सांगत असतांनाच मध्येच ऋषिगण आपलें शंकानिरसन होण्याकरिता निरनिराळे प्रश्न विचारीत. आणि आपसांतच त्यांचें शंकानिरसन होई. एकानें प्रश्न विचारला होता—हे भगवन्, दुर्गा ही कोण आणि तिचा अवतार कशासाठी झाला? महामुनि म्हणाले—पूर्वी रुरु दैत्याचा पुत्र दुर्ग याने घोर तपश्चर्या करून भगवान् शिवाला प्रसन्न करून घेतलें. आणि पुरुषमात्राकडून आपण अवध्य व्हावें असें वरदान मागून घेतलें. भोलेनाथ तथास्तु म्हणून अंतर्धान पावले. या दुर्गदैत्याने आपल्या बाहुबलावर त्रैलोक्याचें राज्य जिंकलें, आणि अत्यंत उन्मत्त होऊन देवब्राह्मणांच्या छळवादाला सुरुवात केली. वेदाध्ययन थांबलें, यज्ञशाळांचा विध्वंस झाला. देव, ब्राह्मण दीन, हीन, अनाथ झाले. आपद्ग्रस्त असे हे सर्व देव-ब्राह्मण भगवान महेश्वराला शरण गेले. नीलकंठांना आपण दिलेल्या वराची आठवण झाली. आणि त्यांनी भगवतीकडे एक आदेशपूर्ण दृष्टिक्षेप टाकला. भवानीने त्याच क्षणीं शरणार्थींना अभयदान दिलें. तिने विक्राळ रुद्रशक्ति धारण केली आणि कालरात्रीला आवाहन करून ती महाकालीरूप झाली. दुर्गदैत्याच्या नगरांत जाऊन तिने त्याला युद्धाचें आव्हान दिलें. दुर्गाचें आणि महाकालीचें घनघोर असें युद्ध झालें. देवीला पराभूत करायला दैत्यराजाने अनेक मायावी रूपें धारण केलीं; परंतु जगदम्बेने आकाशांत उड्डाण केलें. अंतराळांत आपण तिला सहज पराभूत करूं शकूं म्हणून दुर्गदैत्यहि तिच्या मागोमाग उडाला. देवीला हेंच पाहिजे होतें. तिने त्रिशूळाच्या प्रहाराने त्याची छाती फोडली, आणि त्याला अलगत भूलोकावर ढकलून दिला. त्या पर्वतप्राय असुराचे राईराईएवढे तुकडे झाले. दैत्यवधानंतर देवतांनी दुंदुभि वाजवून आनंद प्रदर्शित केला, आणि सच्चिदानंद प्रणवरूपिणी आदिमायेचें स्तवन केलें. कोपाविष्ट देवी शांत झाली. दुर्गदैत्याचा वध केला म्हणून ती दुर्गा या नांवाने प्रसिद्ध झाली.

दुर्गदैत्याचा वध झाला आणि देवी अंतर्धान पावली; परंतु एवढ्यानेच तिचें कार्य संपलें नाही. दुर्गाच्या वंशांतील महिषानेहि बिकट तपःसाधना

केली आणि महादेवांना प्रसन्न करून घेतलें. त्यांच्या वरप्रभावाने तोहि मातला! सर्व देवांना त्याने सळो की पळो करून सोडलें. तेव्हा ब्रह्मा-विष्णु-महेशांनीं दुर्गेची प्रार्थना केली. देवी प्रकट झाली तेव्हा तिच्या अष्टभुजा निःशस्त्र होत्या. त्याच वेळीं ब्रह्मा-विष्णु-महेशांच्या मुखांतून ज्वाळा निघाल्या आणि आदिमायेच्या शरिरांत विलीन झाल्या. देवीचें शरीर तेजःपुंज झालें. वैकुंठाने तिच्या एका हातांत सुदर्शन दिलें, लगेच शिवांनीहि दुसऱ्या हातांत त्रिशूळ दिला. याचप्रमाणे ब्रह्मदेव, इंद्र, कुबेर, अग्नि, विश्वकर्मा, वरुण, यांनी तिच्या प्रत्येक हातांत शस्त्र दिलें.

सायुध अशी देवी विंध्य पर्वताच्या दिशेने चालत गेली. महिषाने ज्यावेळीं तिला पाहिली त्यावेळीं अचकटविचकट शब्द उच्चारून त्याने तिला पकडायचा प्रयत्न केला; परंतु त्याला हुलकावण्या देत चकवायचा प्रयत्न देवी करूं लागली. दैत्याने निरनिराळीं रूपें धारण केलीं. शेवटीं तो युद्धास प्रवृत्त झाला. नऊ रात्री हें युद्ध चालू होतें. अखेर दुर्गेने आपल्या त्रिशूळाने महिषावर प्रहार करून त्याला ठार मारलें. महिषासुराच्या वधामुळे देवीला महिषासुरमर्दिनी असें नांव पडलें. देवांनी दुर्गेची स्तुति करून नऊ रात्री मोठा उत्सव केला. तेव्हापासून ही नवरात्राची प्रथा सुरू झाली.

दोन्ही वेळां केवळ आपणामुळे जगदम्बेला श्रम झाले, यामुळे तरी पस्तावून महादेवांनी गप्प बसावें; परंतु नाही! भोळ्या सांबाने कठीण तपस्या करणाऱ्या शुंभ-निशुंभ दैत्यांना असाच एक बेफाट वर दिला—आणि ते प्रबळ झाले. कुणालाहि ते आटोपेनात. तेव्हा चामुंडा देवीच्या रूपाने दुर्गा अवतरली. आणि तिने या दोन्ही असुरांचा संहार केला. चामुंडा दशभुजा आहे. ती सिंहावर आरूढ झालेली अशी आहे. मुकुटधारी असून अंगावर रत्नजडित वस्त्रें आहेत.

‘काळ’ या नांवाचा एक राक्षस असाच मदोन्मत्त झाला. आर्यांना आणि अनार्यांना—मिळेल त्याला—भक्षण करायचा त्याने सपाटा चालवला होता. त्यावेळीं दुर्गेने कालीचें रूप घेतलें. त्या वेळच्या तिच्या रूपाचें

वर्णन काय करावें. ती अर्धनग्न होती. कमरेला तोडलेल्या हातांच्या माळेचा पट्टा घातला होता. गळ्यांत नरमुंडांची माळ होती. आपल्या काळ्याकभिन्न शरिरावर तिने रक्ताचे पट्टे ओढलेले होते. चतुर्भुज अशा या मूर्तीच्या एका हातांत प्रचंड खड्ग होतें. काळाच्या बाजूने रक्तवीर नांवाचा एक राक्षस तिच्याशीं लढूं लागला. तेव्हा आपल्या खड्गाने तिने त्याचें डोकें कापून, त्या रक्तवीराचें रक्त ती घटघटा प्याली. नंतर काळालाहि ठार केलें. या विजयोन्मादाच्या भरांत ती थै थै नाचूं लागली. तिच्या त्या तांडवनृत्याने पृथ्वी थरथरां कापूं लागली. ती कशाच रीतीने आवरेना तेव्हा तिच्या पायाखाली भगवान् शंकरांनी आपला देह अंथरला. बेभान नाचणाऱ्या कालीने आपल्या पायाखालीं येणाऱ्या शंकरांना पाहिलें. अचानक तिची नजर गेली. ती लाजली आणि स्त्रीसुलभ वृत्तीने तिने आपली जीभ बाहेर काढली. (देवीचें तेंच रूप अधिक प्रसिद्ध आहे.) लवलवणाऱ्या लांब जिभेचें खड्गपाशधर, रक्तलोचना असें तें अक्राळविक्राळ रूप पाहून सर्व देवता घाबरल्या. तेजोगोलांचें तेज नाहीसें झालें. महाकालीने कराल नृत्य थांबविलें खरें; पण तिचा क्रोधाग्नि कांहीं शांत झाला नाहीं. तिच्या शरिरांतून प्रगट होणाऱ्या अग्निस्फुलिंगांनी पृथ्वीला दाह होऊं लागला. ब्रह्मा, विष्णु, महेशासह सर्व देवता एकत्र झाल्या आणि त्यांनी स्तुति आरंभिली—

"संपूर्ण जगताचें धारण-पोषण करणाऱ्या महादेवी, तुला आमचा नमस्कार असो! त्रैलोक्यव्यापिनी कल्याणमयी शिवे तुला नमस्कार असो! हे विष्णुस्वरूपे तूंच संस्कृतीची जन्मभूमि आहेस! इंद्र, चंद्र, कुबेर, वरुण, यम, ईशान आणि अग्नीची शक्ति देखील तूंच! सूर्याच्या प्रभेची शक्तीहि तूंच आहेस! चतुरानस्वरूपे देवी पंचमहाभूतें हीं तुझीं रूपें आहेत. तूं इंद्रियांची अधिष्ठात्री देवता. पंचमहाभूतांना मिळवून तूंच हा ब्रह्मांडगोळा निर्माण केलास. आणि तुझी इच्छा झाली तर तूंच क्षणांत निर्दाळण करूं शकशील; परंतु हे महामाये तूं जगताची आधारशक्ति आहेस. दृष्य, अदृष्य, स्थूल, सूक्ष्मरूपांतहि तुझीच शक्ति विद्यमान आहे. आमचें रक्षण तुझ्याशिवाय

अन्य कोण करणार? तुझ्याशिवाय आम्ही कुणाला शरण जावें? हे चित्-शक्ति महामाये महादैत्याधिपति दुर्गाला मारून तूं आमचें रक्षण केलेंस. आम्ही तुझ्या चरणावर नतमस्तक आहोंत आम्हांला अभयदान दे! हे भवानी, तुझी करालदृष्टि आवरून अमृतमय दृष्टीने आमच्याकडे पाहा, आणि विपत्तीपासून आमचें रक्षण कर."

ऋषि, गंधर्व, चारणांसहित इंद्रादि देवांनी केलेली ती स्तुति ऐकून महांकालीमाता शांत झाली. तिने सर्वांना अभयदान दिलें आणि म्हणाली—"सर्व देव हो जा तुमचा अधिकार ग्रहण करा! तुम्हीं जी माझी स्तुति केलीत त्याने मी संतुष्ट झालेलें आहें. जो कोणी पवित्र भक्तीने माझें स्मरण करील त्याला विपत्ति कधीहि शिवणार नाही असें मी वरदान देतें."

महामुनि लोमेशांनी सांगितलेल्या या कथा स्कंदांनी अगस्तीस सांगितल्या. त्या स्कंदपुराण म्हणून लौकिकमान्य झाल्या. या स्कंद पुराणाचे ८११०० श्लोक आहेत. आणि त्यांत दुर्गेसंबंधी अनेक कथा आढळतात. स्कंद-पुराणाच्या ६ संहिता आणि ५० निरनिराळे खंड आहेत. रेवा खंडांत निराळ्या, काशी खंडांत निराळ्या, तसेंच माहेश्वर, ब्रह्म, प्रभास, अवन्ती, नागर इत्यादि खंडांत जगदम्बा दुर्गेच्या नांवावर शेकडो कथा आढळतात. तसेंच दुर्गापूजेचे प्रकार देखील भारतांतील प्रत्येक प्रांतांत वेगवेगळ्या तऱ्हेचे आहेत. गुजरातेंत—पांढऱ्या रंगाने भिंत सारवून त्यावर शेंदुराचा त्रिशूळ काढतात आणि त्याच्या पुढ्यांत मातीचा ढीग रचून त्यावर धान्य पेरतात. एका छिद्रांकित मातीच्या कलशांत दिवा ठेवून तो त्या त्रिशूळासमोर ठेवला जातो आणि नऊ रात्रीपर्यंत अखंडितपणें तो पेटत राहतो. नवव्या दिवशीं नृत्य-गायनादि प्रकारांसह उत्सवाचें विसर्जन होतें! महाराष्ट्रांत मूर्तीऐवजी कलशावर देवीची स्थापना करतात. कलशासभोवती धान्यहि पेरण्याची पद्धत आहे. भवानीआई, अंबाबाई आदि देवींचे भक्त या दिवसांत मशाली घेऊन घरोघरीं कपडे गोळा करीत फिरत असलेले सर्वपरिचित आहेत. रजपूत लोकांत तोफेवर कुंकवाचा त्रिशूळ काढून त्याची पूजा नवरात्रांत करण्याची पद्धत आहे. दक्षिणेकडील देवळांतहि मोठ्या प्रमाणावर नवरात्राचा उत्सव होतो.

वर्णन काय करावें. ती अर्धनग्न होती. कमरेला तोडलेल्या हातांच्या माळेचा पट्टा घातला होता. गळ्यांत नरमुंडांची माळ होती. आपल्या काळ्याकभिन्न शरिरावर तिने रक्ताचे पट्टे ओढलेले होते. चतुर्भुज अशा या मूर्तीच्या एका हातांत प्रचंड खड्ग होतें. काळाच्या बाजूने रक्तवीर नांवाचा एक राक्षस तिच्याशीं लढूं लागला. तेव्हा आपल्या खड्गाने तिने त्याचें डोकें कापून, त्या रक्तवीराचें रक्त ती घटघटा प्याली. नंतर काळालाहि ठार केलें. या विजयोन्मादाच्या भरांत ती थै थै नाचूं लागली. तिच्या त्या तांडवनृत्याने पृथ्वी थरथरां कापूं लागली. ती कशाच रीतीने आवरेना तेव्हा तिच्या पायाखाली भगवान् शंकरांनी आपला देह अंथरला. बेभान नाचणाऱ्या कालीने आपल्या पायाखालीं येणाऱ्या शंकरांना पाहिलें. अचानक तिची नजर गेली. ती लाजली आणि स्त्रीसुलभ वृत्तीने तिने आपली जीभ बाहेर काढली. (देवीचें तेंच रूप अधिक प्रसिद्ध आहे.) लवलवणाऱ्या लांब जिभेचें खड्गपाशधर, रक्तलोचना असें तें अक्राळविक्राळ रूप पाहून सर्व देवता घाबरल्या. तेजोगोलांचें तेज नाहीसें झालें. महाकालीने कराल नृत्य थांबविलें खरें; पण तिचा क्रोधाग्नि कांहीं शांत झाला नाहीं. तिच्या शरिरांतून प्रगट होणाऱ्या अग्निस्फुल्लिंगांनी पृथ्वीला दाह होऊं लागला. ब्रह्मा, विष्णु, महेशासह सर्व देवता एकत्र झाल्या आणि त्यांनी स्तुति आरंभिली—

"संपूर्ण जगताचें धारण-पोषण करणाऱ्या महादेवी, तुला आमचा नमस्कार असो! त्रैलोक्यव्यापिनी कल्याणमयी शिवे तुला नमस्कार असो! हे विष्णुस्वरूपे तूंच संस्कृतीची जन्मभूमि आहेस! इंद्र, चंद्र, कुबेर, वरुण, यम, ईशान आणि अग्नीची शक्ति देखील तूंच! सूर्याच्या प्रभेची शक्तीहि तूंच आहेस! चतुराननस्वरूपे देवी पंचमहाभूतें हीं तुझीं रूपें आहेत. तूं इंद्रियांची अधिष्ठात्री देवता. पंचमहाभूतांना मिळवून तूंच हा ब्रह्मांडगोळा निर्माण केलास. आणि तुझी इच्छा झाली तर तूंच क्षणांत निर्दाळण करूं शकशील; परंतु हे महामाये तूं जगताची आधारशक्ति आहेस. दृष्य, अदृष्य, स्थूल, सूक्ष्मरूपांतहि तुझीच शक्ति विद्यमान आहे. आमचें रक्षण तुझ्याशिवाय

अन्य कोण करणार ? तुझ्याशिवाय आम्ही कुणाला शरण जावें ? हे चित्-शक्ति महामाये महादैत्याधिपति दुर्गाला मारून तूं आमचें रक्षण केलेंस. आम्ही तुझ्या चरणावर नतमस्तक आहोंत आम्हांला अभयदान दे! हे भवानी, तुझी करालदृष्टि आवरून अमृतमय दृष्टीने आमच्याकडे पाहा, आणि विपत्तीपासून आमचें रक्षण कर."

ऋषि, गंधर्व, चारणांसहित इंद्रादि देवांनी केलेली ती स्तुति ऐकून महांकालीमाता शांत झाली. तिने सर्वांना अभयदान दिलें आणि म्हणाली— "सर्व देव हो जा तुमचा अधिकार ग्रहण करा! तुम्हीं जी माझी स्तुति केलीत त्याने मी संतुष्ट झालेलें आहें. जो कोणी पवित्र भक्तीने माझें स्मरण करील त्याला विपत्ति कधीहि शिवणार नाही असें मी वरदान देतें."

महामुनि लोमेशांनी सांगितलेल्या या कथा स्कंदांनी अगस्तीस सांगितल्या. त्या स्कंदपुराण म्हणून लौकिकमान्य झाल्या. या स्कंद पुराणाचे ८११०० श्लोक आहेत. आणि त्यांत दुर्गेसंबंधी अनेक कथा आढळतात. स्कंद-पुराणाच्या ६ संहिता आणि ५० निरनिराळे खंड आहेत. रेवा खंडांत निराळ्या, काशी खंडांत निराळ्या, तसेंच माहेश्वर, ब्रह्म, प्रभास, अवन्ती, नागर इत्यादि खंडांत जगदम्बा दुर्गेच्या नांवावर शेकडो कथा आढळतात. तसेंच दुर्गापूजेचे प्रकार देखील भारतांतील प्रत्येक प्रांतांत वेगवेगळ्या तऱ्हेचे आहेत. गुजरातेंत—पांढऱ्या रंगाने भिंत सारवून त्यावर शेंदुराचा त्रिशूळ काढतात आणि त्याच्या पुढ्यांत मातीचा ढीग रचून त्यावर धान्य पेरतात. एका छिद्रांकित मातीच्या कलशांत दिवा ठेवून तो त्या त्रिशूळासमोर ठेवला जातो आणि नऊ रात्रीपर्यंत अखंडितपणें तो पेटत राहतो. नवव्या दिवशीं नृत्य-गायनादि प्रकारांसह उत्सवाचें विसर्जन होतें! महाराष्ट्रांत मूर्तीऐवजी कलशावर देवीची स्थापना करतात. कलशासभोवती धान्यहि पेरण्याची पद्धत आहे. भवानीआई, अंबाबाई आदि देवींचे भक्त या दिवसांत मशाली घेऊन घरोघरीं कपडे गोळा करीत फिरत असलेले सर्वपरिचित आहेत. रजपूत लोकांत तोफेवर कुंकवाचा त्रिशूळ काढून त्याची पूजा नवरात्रांत करण्याची पद्धत आहे. दक्षिणेकडील देवळांतहि मोठ्या प्रमाणावर नवरात्राचा उत्सव होतो.

गोमंतकांत, विशेषतः 'अंत्रुज महालांत', पत्र-पुष्प-फल-तोयाची समृद्धि असल्याने तिथे या उत्सवाला अधिक रंग येतो. उत्सवमूर्ति आरतीच्या वेळीं मखरांत बसवून त्या मखराला झोके दिले जातात. समोर सुस्वरवाद्यांचा गजर एकसारखा चालत असतो. आणि त्या तालावर तें मखर हालवलें जातें. भारतांतील इतर कोणत्याहि प्रांतापेक्षा बंगालांत दुर्गापूजा हा कुलाचार असल्याने तिथे या महोत्सवाचें महत्त्व फार आहे. देवीच्या मूर्तीबरोबरच घटस्थापना करून वाद्य-नृत्य-गायन-ललितादि कार्यक्रमाच्या जल्लोशाबरोबरच दीपोत्सवहि केला जातो. 'कालीमातेचा विजय असो' अशा घोषाने कलकत्ता नगरी दुमदुमून जाते. शेवटच्या तीन रात्री महापूजेच्या असतात. उच्चनीचतेच्या किंवा कसल्याहि हीन भावनांचा लेश या काळांत तिथे मानला जात नाही. स्त्री-पुरुष, राव-रंक सगळेच आपण एकाच कालीमातेचीं लेकरें आहोंत असें समजून देवीसमोर शिर नमवतात. दुर्गेच्या या पूजेंत पशुबलीचे प्रकार मात्र भारतांत सर्व ठिकाणीं अजून आहेत. नवरात्र संपतें आणि दसरा उदय पावतो. वास्तविक दसरा हा कृषिविषयक सण आहे. आपल्या कृषिप्रधान देशांत नवधान्याच्या उत्सवाप्रीत्यर्थ तो साजरा केला जातो असा उल्लेख कांही ग्रंथांत सांपडतो. स्कंद पुराणांत या संबंधींची एक कथा जोडलेली आहे. वरतंतु ऋषीच्या कौत्स नांवाच्या शिष्याने विद्या-विभूषित झाल्यावर आपल्या गुरूला गुरुदक्षिणा मागण्याबद्दल अत्याग्रह केला. वरतंतूंनी चौदा कोटी सुवर्णमुद्रा मागितल्या. कौत्साने तें मान्य करून तो दानशूर आणि उदार अशा रघुराजाकडे गेला. याच वेळीं रघुराजा विश्वजित् यज्ञ करून निष्कांचन झालेला होता; परंतु कांही झालें तरी याचकाची इच्छा पुरी करायची प्रतिज्ञा करून, त्यानें इंद्राशीं एवढ्या रकमेची मागणी केली आणि न दिल्यास लढण्याची तयारी दर्शविली. इंद्राने कुबेराकडून अयोध्या नगरीच्या बाहेर असलेल्या शमीच्या झाडावर सुवर्ण-मुद्रांचा वर्षाव केला. रघूने त्या सर्व मुद्रा कौत्साला दिल्या. कौत्साने त्या आपल्या गुरूस दिल्या. परंतु चौदा कोटीच्या वर कांही वरतंतू घेईना म्हणून कौत्साने परत आणून दिलेल्या बाकी सुवर्णमुद्रा शमीच्या झाडाखाली ठेवून

रघुराजाने त्या प्रजाजनांस लुटायला सांगितल्या. सुव्रत अशा प्रजाजनांनी त्या शमीची पूजा करून मगच त्या मुद्रा लुटल्या. तो दिवस आश्विन महिन्यांतील शुक्ल दशमीचा होता. प्रतिवर्षी रघुराजाच्या अयोध्या नगरींत चाल होती; परंतु कालांतराने फक्त शमीच्या झाडांचीं पानेंच लुटण्याचा प्रघात राहिला.

श्रीरामचंद्रांनी रावणाशीं युद्ध करायला आश्विन शुद्ध दशमीच्या सुमुहूर्तावर सीमोल्लंघन केलें म्हणून या दिवसाला सीमोल्लंघनाचें महत्त्व प्राप्त झालेलें आहे अशी कथा रामायणांत आहे. पांडवांचा अज्ञातवासहि याच दिवशीं संपला. विराट नगरींत जातांना सीमेवर असलेल्या दुर्गेच्या प्रतिमेची धर्मांनी भक्तिभावाने पूजा केली. आणि आपलें रक्षण करण्याची विनंती केली. धर्मराजाने केलेलें हें दुर्गास्तोत्र प्रसिद्ध आहे. पांडवप्रतापांत श्रीधरांनी त्याचें सुंदर मराठी भाषांतर केलेलें आहे. धर्मराजाला प्रसन्न झालेली जगदंबा म्हणते, “तुम्ही वास्तव्य करा येथ। प्रगट नेदीच जनांत। शत्रू क्षय पावतील समस्त। सुख अद्भुत तुम्हां होय॥ त्वां जें हें स्तोत्र केलें संपूर्ण। तें पठण करील रात्रंदिन। त्यासी मी दुर्गा प्रसन्न होऊन। वर प्रसाद देईन॥”

—गोपाळकृष्ण भोबे

x x x



# दत्त दिगंबर

मालाकमण्डलुधरः करपद्मयुग्म ।
मध्यस्थपाणियुगले डमरुत्रिशूले ।
यस्य स्त ऊर्ध्वकरयोः शुभशङ्खचक्रे ।
वन्दे तमात्रिवरदं भुजषट्कयुक्तम् ॥

माला आणिक कमंडलू या दोन्हीं करकमली धरलेलीं
डमरूसह हे त्रिशूळ वरिले मध्य-स्थित या पाणी-युगलीं
दोन्हीं ऊर्ध्वकरांतुनि ज्यांच्या शुभशंखासह चक्र गरगरे
' सहाभुजां ' ना नित्य वंदीं तूं तारिल तारक तीन-वरें

— लोककवि **श्री मनमोहन**



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३७५८ ........ दि: २५-७-१९
क्रमांक ३०५ ........ नों: दि: २५-

# दत्त दिगंबर



दत्त दिगंबर हें साक्षात्कारी दैवत आहे. तत्काळ फळ देणारें असें दत्ताशिवाय अन्य दैवत नाही, असा मुमुक्षु लोकांचा समज आहे. तशा जाज्वल्य निष्ठेने गुरुचरित्राच्या सप्ताहाचें पारायणव्रत केलें तर सातव्या दिवशीं स्वप्नांत किंवा जागृतावस्थेंत दृष्टांत होतो, असा भक्तांना अनुभव आहे. दत्तभक्ति ही शुचिर्भूत, शुचिष्मंत वृत्तीनेच करावी लागते. त्यांत कांही आगळिक झाली तर परिणाम उलटाहि होतो. कारण दत्त ही उग्रमूर्ति असून ती क्षमाशील नाही. याविषयींच्या पडताळ्याच्या कथा श्रीगुरुचरित्रांत विस्ताराने सांगितलेल्या आहेत. दत्तभक्तीने अंगीं निष्ठा बळावते. सत्त्व, रज, आणि तम हे तीन गुण सर्व प्राणिमात्रांस खेळवीत असतात. या तिन्ही गुणांच्या आहारीं जाऊन, भलतीं सलतीं कृत्यें आपल्या हातून घडूं

नयेत म्हणून निष्ठेने ही त्रिगुणात्मक त्रैमूर्तीच्या भक्तीची प्रथा आपल्या पूर्वजांनी अंगीकारिली असावी.

दत्तजीवनासंबंधी मार्कंडेय पुराणांत वेगळी, स्कंद पुराणांत वेगळी व महाभारतांतल्या अनुशासन पर्वांत वेगळीं, अशा वेगवेगळ्या कथा आहेत. कर्दम प्रजापतीची पत्नी देवहूति हिला दोन मुलें झालीं. एक कपिल महामुनि व दुसरी अनसूया. भगवान् कपिलदेव हा जगदीश्वराचाच अवतार होता. सिद्धमुनींत तो अग्रगण्य समजला जातो. सांख्यशास्त्राचा त्यानेच प्रचार केला. अनसूया ही ब्रह्मदेवाच्या आज्ञेने अत्रिऋषीची पत्नी झाली. अत्रिऋषींनी आपल्या सनत्सुजात या थोरल्या भावापासून मंत्ररहस्य व उपासना पद्धतीचें सांगोपांग ज्ञान प्राप्त करून घेतलें होतें. आपल्या पोटीं कुलदीपक संतान व्हावें म्हणून दोघांनीहि घोर तपश्चर्या केली. महापतिव्रता अनसूयेचा दरारा फार मोठा होता. सूर्य-चंद्र तिच्या आज्ञेशिवाय उगवत नसत अशी आख्यायिका होती. एकदा देवर्षि नारद फिरत फिरत तिच्या आश्रमांत आला. सती अनसूयेने त्याचें चांगलें स्वागत केलें. तिला आशीर्वाद देऊन नारद तडक कैलासाला गेला. आणि स्वतःच्या सद्गुणांबद्दल अत्यंत गर्वयुक्त असणाऱ्या पार्वतीजवळ त्याने अनसूयेची वारेमाप स्तुति केली. आपल्याहून श्रेष्ठ अशी अन्य स्त्री, शिवाय ती पृथ्वीतलावर, असावी हें शल्य पार्वतीला सहन झालें नाही. तिच्या मनांत असूया उत्पन्न झाली, व कांही तरी करून या अनसूयेचें सत्त्व हरण केलें पाहिजे असा हट्ट तिने शिवाजवळ धरला.

इकडे नारद ब्रह्मलोकाला गेला व ब्रह्मपत्नीच्या मनांत किल्मिष उत्पन्न करून तिथून वैकुंठाला जाऊन लक्ष्मीच्याहि मनांत मत्सर पेरून तो स्वस्थानीं गेला. झालें. ब्रह्मा-विष्णु-महेशांच्या स्वाऱ्या स्त्रीहट्ट पुरविण्यासाठीं ब्राह्मणांच्या रूपाने अत्रिऋषींच्या आश्रमापाशी टळटळीत दुपारीं येऊन 'भिक्षां देहि' म्हणाल्या. अनसूया त्यावेळीं आंघोळ करीत होती. "थांबा, मी विवस्त्र आहें, एवढी आंघोळ पुरी करतें, आणि तुम्हांला इच्छाभोजन देतें" असें तिने आंतून ओरडून सांगितलें, परंतु "असशील

तशी बाहेर येऊन भिक्षा वाढ, नाहीतर अम्ही शाप देऊं!" असे शब्द बाहेर उभ्या असलेल्या त्या तिन्ही ब्राह्मणांनी उच्चारतांच पतिभक्तिपरायण अशा त्या पतिव्रतेने पतिचरणांचें मनांत चिंतन करून आंतूनच म्हटलें, "तुम्ही काय, मला लहान बालकांसारखेच आहांत. ही पाहा मी आलें भिक्षा घेऊन!"

आणि बाहेर येऊन तिने पाहिलें तों तीं तीन बालकें आपल्या आश्रमाच्या ओसरीवर खेळत असलेलीं तिला दिसलीं. इतक्यांत अत्रिऋषि अनुष्ठान आटोपून आश्रमांत आले. अंतर्ज्ञानाने त्यांनी सगळा प्रकार जाणला, आणि तिन्ही बालकांचें संगोपन करण्यास पत्नीस अनुज्ञा दिली.

एवढा लहानसा हट्ट पुरविण्याकरिता पृथ्वीवर गेलेले आपले नवरे कित्येक दिवसपर्यंत परत न आलेले पाहून देवपत्न्यांचें धाबें दणाणलें. डोळ्यांत प्राण आणून त्या प्रतीक्षा करीत होत्या. इतक्यांत पुनश्च देवर्षींची स्वारी हजर झाली, आणि तिघींचे नवरे बालरूपाने अनसूयेच्या आश्रमांत खेळतांना प्रत्यक्ष पाहिल्याचें त्यांनी देवपत्नींना सांगितलें. पश्चात्तापदग्ध अशा त्या तिघीहि अत्रींच्या आश्रमांत येऊन अनसूयेजवळ आपल्या पतींचें दान मागूं लागल्या. अत्रि आणि अनसूया यांनीं ब्रह्मा-विष्णु-महेशांची स्तुति करून त्यांना आपलें पूर्वीचें रूप घ्यायची विनंति केली. तिघांनीहि आपलें पूर्वीचें रूप धारण करून अत्रि-अनसूयेला इच्छित वर मागायला सांगितलें. आपल्या अंगावर वाढत असलेलीं हीं मुलें आपल्याला आता सोडून जाणार या विचाराने अनसूया दुःखित झाली; पण तिचें मनोगत जाणून देवांनी एकरूप होऊन तीन शिरें, सहा हात असलेला एक पुत्र अनसूयेला दिला. दत्त म्हणजे दिलेला, दत्तक, दैवाने लाभलेला. अचानक येऊन उभा राहिला म्हणून त्याचें नांव दत्त. त्रिमुखी म्हणून दत्तात्रेय व दिगंबर म्हणून अवधूत. परंपरागत चालत आलेली अशी दत्तात्रेयजन्माचीही एकच कथा. आणखीहि आहेत पण त्या विशेष प्रचारांत नाहीत.

महाभारतांतील अनुशासनपर्वात, अत्रीला तीन पुत्र होते व दत्त हा त्यांपैकी एक असून अत्रीचा पुत्र म्हणून दत्त-आत्रेय या नांवाने प्रसिद्ध झाला,

असें आख्यान आहे. कांही ठिकाणीं तर दत्त हा एक ऋषि असून त्याला 'निमि' नांवाचा एक पुत्रहि होता अशी आख्यायिका आढळते. सृष्टिक्रमानुसार नवमास गर्भवास भोगून मार्गशीर्षाच्या पौर्णिमेस अनसूयेस पुत्र झाला. तोच दत्त, असा स्कंदपुराणांत उल्लेख आढळतो.

श्रीपादयति, नृसिंहयति, नरहरियति असे तीन दत्तसांप्रदायिक झाले. त्यांनी दत्तभक्तीचा बराच प्रसार केला. भाविक लोक त्यांना दत्ताचे अवतार मानतात. गाणगापूर, नरसोबाची वाडी आणि औदुंबर हीं दत्ताचीं राहण्याचीं ठिकाणें. गोव्यांत सांखळी, अबू, गिरनार, चिकमंगळूर, सातारा जिल्ह्यांतील अखलकोप हीं दत्ताचीं जाज्वल्य स्थानें मानलीं जातात.

तीन शिरें, सहा हात, मस्तकीं जटाभार, हातीं शंखचक्रादि तिन्ही देवांचीं आयुधें, काखेंत झोळीं व पुढें चार श्वानें असें दत्तगुरूंचें रूप आहे. सोबतीला असणारीं चार श्वानें हीं चतुर्वेदरूप गणलेलीं आहेत. आपल्या अवतारकार्यांत दत्तांनी अनेक चमत्कार केले. निर्धनाला धन दिलें, निपुत्रिकांना पुत्र दिला, वांझ महिषीला दुभती केली, शुष्ककाष्ठाला पालवी फोडली, कृपादृष्टीने मृतात्मा सजीव केला. गुरुचरित्रांत या कथा मोठ्या रसाळपणें नामधारकांनी सिद्धाला सांगितलेल्या आहेत. दत्तसंप्रदायाची व नाथसंप्रदायाची घडण एक वाटते. महाराष्ट्र दोन्ही संप्रदायांना सारखाच मानतो. किंबहुना दत्त ही देवता महाराष्ट्रांत जेवढ्या भाविकतेने पूजिली जाते व तिच्या भक्तीचा महाराष्ट्रांत जेवढा प्रसार आहे, तेवढा भारतवर्षांतील अन्य प्रांतांत असेल की नाही शंका आहे.

महाराष्ट्रांतील खेड्यांत माध्यान्हकाळीं एखादा जोगी, बैरागी भिक्षेसाठी दारांत आला तर तो श्रीदत्तच असेल या भावनेने त्याची संभावना होते. दत्तभक्तीच्या आधीन झालेल्या माणसाचें "दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान। हरपलें मन झालें उन्मन" अशी अवस्था होते. दत्त हा भुतेंखेतें काढून लावणारा देव म्हणूनहि ख्याति आहे. अशा अवस्थेने पछाडलेले, भ्यालेले रोगी गाणगापूर किंवा नरसोबाची वाडी येथे जाऊन राहिले की कालांतराने बरे झालेलेहि अनेकांच्या पाहण्यांत आहेत.

जावयाचें बिनसलें. यानंतर संधि मिळेल तिथे दक्ष प्रजापति श्रीशंकरांचा पाणउतारा करूं लागला. रुद्रांनी तें फारसें मनावर घेतलें नाही; परंतु एकदा मात्र कळस झाला.

दक्षाने एक महायाग केला. त्या यागासाठी त्याने तिन्ही लोकांचे ऋत्विज बोलावले. त्याप्रमाणें सर्व लोक आले. ब्रह्मा-विष्णूहि आले; पण श्रीशिवाला आमंत्रण गेलें नाही. श्रीशिव आलेहि नाहीत; सर्व देवऋषिमुनींना चुकल्या चुकल्यासारखें होऊं लागलें; पण दक्षाच्या हट्टापुढे उपाय नव्हता. प्रत्यक्ष ब्रह्माविष्णूंच्या विनंतीलाहि त्याने दाद दिली नाही. आपल्या वडिलांच्या या महायागाला आमंत्रण नसतांनाहि पितृप्रेमाच्या मोहाला बळी पडून सतीने यज्ञसमारंभाला जाण्याची आज्ञा श्रीशंकराजवळ मागितली. शंकरांनी तिला वस्तुस्थिति समजावली असतां 'जावयाशीं मतभेद असला तरी त्याचा मुलीशीं कांहीहि संबंध पोहोचत नाही' असें समर्थन करून पतीची आज्ञा घेऊन सती निघाली.

यज्ञमंडपांत पोहोचतांच आमंत्रणाशिवाय आल्याबद्दल तिची प्रथम निर्भर्त्सना करून सर्वांसमक्ष दक्षाने शंकराचीहि यथेच्छ निंदा केली. लोकांसमोर पित्याने केलेला हा अपमान सतीला सहन झाला नाही. तिने तत्काल धडधडत्या यज्ञकुंडांत उडी घेतली. सर्व देवांना जबरदस्त धक्का बसला. मुनि नारदांनी महादेवाच्या कानावर भीत भीत ही हकीकत घातली. तेव्हा तो जगदीश्वर रुद्र क्रोधाविष्ट झाला. त्याने जटा उपटून पर्वतशिखेवर आपटली आणि त्यांतून वीरभद्र उत्पन्न केला व त्याला आज्ञा केली, "जा, महाबाहो वीरभद्रा, दक्षाच्या यज्ञाचा विध्वंस कर!" वीरभद्राने स्वामींच्या आज्ञेप्रमाणे सर्व कांही केलें. दक्षाचें शिर धडापासून वेगळें करून तें यज्ञकुंडांत फेकून दिलें. यज्ञाचा विध्वंस केला. पुढे ब्रह्माविष्णूंनी श्रीशंकरांची प्रार्थना करून त्यांना शांत केलें आणि श्रीशिवांनी अमृतदृष्टीने दक्षाला जिवंत केलें. दक्षाने भगवान् शंकरांची अपार स्तुति केली आणि तो म्हणाला—

**नमामि विश्वेश्वर विश्वरूपं सनातनं ब्रह्म निजात्मरूपम् ।**
**नमामि सर्वं निजभावगम्यं वरं वरेण्यं वरदं नतोऽस्मि ॥**

दक्षाने केलेली स्तुति ऐकून भगवान् शंकर प्रसन्न झाले. आसनस्थ होऊन श्रीशिव म्हणाले—

"सुरश्रेष्ठा, माझ्या भजनांत सदा दंग असणारे जे पुण्यात्मे आहेत त्यांचे चार प्रकार आहेत. आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी. या सर्वांत ज्ञानी अधिक श्रेष्ठ आहे, व म्हणूनच समस्त ज्ञानी पुरुष मला विशेष प्रिय आहेत यांत मुळींच संशय नाही. यज्ञ, याग, तप इत्यादि गोष्टी ज्ञानाशिवाय व्यर्थ आहेत. सज्ञान झाल्याशिवाय योगसिद्धीच्या मागे लागणारा खरा अज्ञानी होय. तूं केवल महायागादि कर्मांनी भवसंसार पार करूं पाहतोस; परंतु तपस्या, यज्ञ किंवा दानादि कर्मे आसक्तीने करूं पाहणाऱ्या मूढात्म्यांना मी कधीच प्राप्त होऊं शकणार नाही. अतएव अंतःकरण एकाग्र करून, ज्ञाननिष्ठ होऊन सुखदुःखांत समानभाव राखून, सदा प्रसन्न राहून कर्म कर, म्हणजे मग माझी प्राप्ति दूर नाही."

दक्षाला श्री शिवांनी केलेला हा उपदेश स्कंदपुराणांतील माहेश्वर खंडांत विस्ताराने दिलेला आहे.

अपार शक्तिशाली अशी ही देवता तितकीच अपार भोळीहि आहे. सुरांप्रमाणे असुरांनीहि आपल्या उग्र भक्तीने श्रीशिवाला वश करून घेऊन, बेफाट वर मिळविले. आणि वरप्रभावाने भूमिभार झालेल्या त्या असुरांच्या निर्दालनासाठी श्रीविष्णूला वारंवार अवतार घ्यावे लागले; परंतु या भोळ्या देवतेला पश्चात्ताप म्हणून कधीहि झाला नाहीं. उलट भोळेपणाच्या अतिरेकामुळे कधी कधी एवढे मोठे घोटाळे निर्माण झाले की त्यांतून देवांना खदखदून हसविणारे विनोदी प्रसंग मात्र भरपूर निर्माण झाले. भस्मासुरामुळे झालेला गोंधळ व हलकल्लोळ सर्वप्रसिद्ध आहे. रावणाच्या अचाट भक्तीला भुलून प्रसन्न होऊन, स्वपत्नीहि त्याला देऊन टाकायला मागेपुढे पाहिलें नाही. एकदा तर स्वात्मलिंगहि खुशाल देऊन टाकलें. आणि या संकटाचें निवारण करतांना बिचाऱ्या गणपतीला आपला एक दांत गमवावा लागला. प्रसन्न झाल्यानंतर एकदा त्यांनी 'वर माग' असें म्हटल्यावर भक्ताने

मागितलेला वर कितीहि बिकट असो, त्याचा सारासार विचार केल्याखेरीज 'तथास्तु!' म्हणून ते अंतर्धान पावतील.

असा हा महादेव अत्यंत साध्या वेषाचा तापसी. बैल, खाटलें, त्रिशूळ, भस्माचा ढीग, आजूबाजूला सर्प आणि हातांत नरोटी ही त्याची संपत्ति. इतकें असून तो आदिमाया पार्वतीचें प्रेमाचें स्थान बनला. त्या प्रणयविहाराच्या रसभरित कथा पुराणांत विखुरलेल्या आहेत.

आपल्या या भारतवर्षात अंदाजें ८५ टक्के शिवपूजक असून साधारणपणें १५ टक्के विष्णुपूजक व इतर पंथाचे आहेत. शैवांतहि अनेक पोटभेद आहेत. स्कंद, सौर, गाणपत्य, वीरशैव, लिंगायत, पाशुपत, स्पंद, श्रीविद्या, कापाल, सरभंगी असे अनेक भेद आहेत; परंतु शिव हेंच त्यांचें आराध्यदैवत आहे. सृष्टीच्या उत्पत्तीस कारण म्हणून शिवाची पूजा लिंगाच्या रूपाने केली जाते. त्याला स्वयंभूस्थानें असेंहि म्हणतात. सौराष्ट्रांत सोमनाथ, श्रीशैल्य पर्वतावर मल्लिकार्जुन, उज्जयिनीचा महांकाल, हिमालयांत केदारनाथ, वाराणशीचा काशीविश्वेश्वर, आंवढ्या नागनाथ, रामेश्वर, घृष्णेश्वर, गोकर्ण वगैरे बारा ज्योतिर्लिंगांचें एक स्तोत्र प्रसिद्ध आहे. तें सर्वदा म्हटलें जातें.

नृत्य, संगीत, वादन यांची या देवतेला अत्यंत आवड. स्वतः ते एक महान् नर्तक. नटराज हें त्यांचें रूप सर्व जगतांत प्रसिद्ध आहे. शिवरात्र हें भक्तांनी अंगीकारलेलें त्यांचें आवडतें व्रत. प्रत्येक महिन्यांत शिवरात्र असते पण माघ महिन्यांत तिचें महत्त्व विशेष असतें. भारतवर्षातल्या कृषीवलांनी शिवाची 'पशुपति' या नांवाने पूजा केली. उपयुक्त जनावरांचा तो पालनकर्ता असून वृषभ हें त्याचें वाहन असल्याने त्यांनी श्रीशिवाला हें नांव दिलें असावें.

— गोपालकृष्ण भोवे

× × ×



गरुडासनांकित अजमीर
येथील विष्णु लक्ष्मीचें शिल्प

# लक्ष्मीनारायण

*लक्ष्मीलालितपादपङ्कजयुगं भोगीन्द्र भोगासनं*
*क्षीरोदार्णवबिन्दुभिः परिवृतं कारुण्यकल्पैः सदा।*
*नाभ्युद्भूतकुशेशयान्तरखिल स्रष्टारमुद्भाव्य नि-*
*र्व्याजं नंदितविश्वमाद्यमनघं वन्दे मुकुन्दं प्रभुम् ॥*

•••••••••••••••••••••••••••••••••••

*शेषाधिष्ठित जो, पदा चुरितसे लक्ष्मी जयाच्या नित*
*कारुण्यें द्रवलाच जो गमतसे क्षीराब्धिने सिंचित*
*ब्रह्माविश्वविनिर्मिता सृजि तया जो नाभिपद्मांतुन*
*विश्वानंदन आद्य निष्कपट त्या विष्णूस हें वन्दन*

—वृंदा लिमये



# लक्ष्मीनारायण



मद्रास म्युझियममधील
श्री विष्णूचें एक शिल्प

महान् क्षीराब्धीला घुसळून काढण्याचें काम देव आणि दानव यांनी मोठ्या हिरिरीनें आरंभिलें होतें. मंदार पर्वताची रवी करण्यांत आली होती आणि वासुकि सर्पाला दोरी बनवून तो प्रचंड जलोदधि एकसारखा घुसळला जात होता. गगनापर्यंत उसळून उठणाऱ्या त्या रत्नाकराच्या फेसांतून एकापेक्षा एक अद्वितीय रत्नें बाहेर पडत होतीं. इंद्राच्या वैभवाला भूषविणारा सप्तशुंडांचा शुभ्र ऐरावत या समुद्रमंथनांतून बाहेर आला.

गगनाला शीतल किरणांनी न्हाऊं घालणारा रुपेरी चंद्रमा या समुद्रमंथनानेच विश्वाला दिला आणि अशा अद्वितीय रत्नांतच एक स्त्रीरत्न बाहेर पडलें. विश्वाच्या सर्व संपदेची साक्षात् प्रतिमा अशी श्रीलक्ष्मी त्या मंथनांतून वर आली.

सुंदर रक्तवर्णी कमलावर ती अधिष्ठित होती. सुवर्णासारखी तिची कांति तेजःपुंज होती. सौंदर्य आणि वैभव यांचेंच जणू तें मूर्तस्वरूप होतें. ऋग्वेदाने जिचें वर्णन 'हिरण्यवर्णा, हरिणी, सुवर्णरजतस्रजा, पद्ममालिनी आणि चंद्रा' अशा नामाभिधानांनी केलें आहे अशी ती लावण्यवती लक्ष्मी पाहून समुद्रमंथनाला जमलेल्या देवदानवांचीं मनें मोहित झालीं. आता ही सुंदरी कुणाला माळ घालणार याची जो तो उत्सुकतेने वाट पाहूं लागला. प्रत्येकाला तिची इच्छा होती.

पण त्या तेजस्वी कन्यकेने त्या साऱ्यांना उद्देशून म्हटलें, "ज्याने खरोखरीच माझी अभिलाषा धरली नाही त्यालाच मी वरणार आहें." तिच्या या बोलण्याने साऱ्यांचे चेहरे हिरमुसले झाले. विश्वाला लाजवणाऱ्या या संपदेची इच्छा कोण धरणार नाही? असा कुणीतरी असणें शक्य आहे का?—

पण असा एक अद्वितीय पुरुष तिथे हजर होता—ज्याच्या हृदयांत शांति होती, स्वानंदसुखाच्या आस्वादांत जो तन्मय झाला होता, या साऱ्या विश्वाच्या पसाऱ्याचें रहस्य ज्याला कळलें होतें आणि म्हणूनच एखाद्या कमलपत्राप्रमाणें ज्याने आसक्तीचा थेंबहि स्वतःला चिकटून घेतला नव्हता. तो पुरुषोत्तम म्हणजे 'नारायण'.

त्या जगचालकाकडे लक्ष्मी धावली. 'न मागे तयाची रमा होय दासी' हा धडा तिने विश्वाला दिला. नारायणाच्या गळ्यांत तिने माळ घातली आणि नारायणाच्या पदस्पर्शाने ती धन्य झाली.

साक्षात् लक्ष्मीचीहि इच्छा न धरणारा नारायण शिवाप्रमाणें वैरागी नाही. शिवाप्रमाणे राख फासून आणि रुंडमाळा घालून तो विरक्त झालेला नाही. चंदनाच्या उटीची त्याला आवड आहे. सुंदर वस्त्रालंकारांनी तो

नटलेला आहे. देदीप्यमान वैजयंतीमाला त्याला भूषवते आहे. त्या मालेंतला अद्वितीय कौस्तुभमणि त्याच्या वक्षःस्थलावर चमकत आहे. त्याच्या मनगटावर स्यमंतकमणि प्रकाशत आहे. त्याने पीतांबर परिधान केला आहे. त्याच्या मुखावर शांति आणि तुष्टीचें माधुर्य पसरलें आहे. कमलदलाप्रमाणे दिसणारे त्याचे नेत्र सुखावले आहेत. आणि विश्वसंसाराच्या पालनासाठी तो सदैव तयार आहे. "धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे" हें त्याने जगाला दिलेलें कायमचें अभय आहे. विश्वचक्राच्या कुटिलपणाने, पापमयतेने, नश्वरतेने तो कंटाळून कोपिष्ट झालेला नाही. उलट त्याचें वर्णन 'शांताकारं भुजगशयनम्।' असेंच करण्यांत आलें आहे. भुजंगाची शय्या असूनहि तो शांताकारच राहिला आहे. संकटावर आरूढ होणारा तो परमपुरुष आहे.

या नारायणाचें वसतिस्थान क्षीरसागर आहे. दुधासारख्या शुभ्र आणि मधुर सागरांत शेषनागावर तो विसावला आहे. त्याला 'नारायण' हें नांव कां पडलें याचा खुलासा त्याने स्वतःच महाभारतांत पुढीलप्रमाणें केला आहे—

**"आपो नारा इति प्रोक्तास्तासां नाम कृतं मया।**
**तेन नारायणोऽप्युक्तो मम तत्त्वयनं सदा॥"**

"पाण्याला पूर्वी 'नारा' म्हणत असत. माझें निवासस्थान (अयन) पाणी आहे म्हणून मला 'नारायण' म्हणतात."

या नारायणाने दशसहस्रमुखाच्या काळ्याकभिन्न शेषनागाची शय्या केली आहे. पृथ्वीचा डोलारा शिरावर घेणारा बलशाली शेष आपल्या फण्याचें छत्र नारायणावर धरून त्याचा सेवक बनला आहे. नारायणाने स्वतःची शय्या म्हणून स्वीकारलेल्या या शेषालाहि कांही आध्यात्मिक अर्थ आहे. हा शेष म्हणजे प्रत्यक्ष काल आहे. या शेषस्वरूपी कालगतीचें चक्र सतत जागृत आहे म्हणूनच पृथ्वीला अस्तित्व आहे. पृथ्वी जन्माला आली नव्हती तेव्हाहि काल अस्तित्वांत होता आणि ही पृथ्वी नष्ट झाली तरीहि हा काल शिल्लकच राहणार आहे. म्हणूनच कालाला 'शेष' (शिल्लक राहणारा) असें संबोधिलें आहे. या शेषाचें वाहन करून नारायण विश्रांति घेतो आहे.

या नारायणाचा रंग गगनसदृश आहे. तो घनश्याम आहे. आकाशाचा आणि त्याचा संबंध निकटचा आहे, कारण विष्णु हें त्याचें दुसरें नांव व विष्णु या शब्दाचा धात्वर्थ सर्वव्यापी असा आहे. ऋग्वेदांतील ऋषींनी 'तो आकाशाप्रमाणे सर्वव्यापी आहे' असा त्याचा गौरव केला आहे. तैत्तिरीयोपनिषदांत 'आकाशशरीरं ब्रह्म' असें त्याला म्हटलें आहे. स्कन्द पुराणांत विष्णूचें मस्तक आकाश आहे असें सांगितलें आहे तर चंद्र व सूर्य हे त्याचे नेत्र असल्याचा उल्लेख भगवद्गीतेंत आला आहे. म्हणूनच कवि-प्रतिभेने त्याचा रंग हा आकाशाचा नीलवर्ण असल्याची कल्पना केली आहे.

नारायणाला बहुधा चतुर्भुज मानण्यांत येतें. पण क्वचित् प्रसंगीं दोन, आठ अगर दहा हात असल्याचा उल्लेख आढळतो. या विविध हातां-संबंधीच्या कल्पना त्याच्या आकाशस्वरूपाशींच निगडित आहेत. आकाशाच्या दिशा हेच त्याचे हात मानण्यांत येतात. आपण मुख्यतः चार दिशा मानतों म्हणून या नारायणाला चार हात असल्याची कल्पना केली जाते. पुढची मागची एकच दिशा मानली तर आकाशाच्या फक्त दोनच दिशा ठरतात; अशा वेळीं नारायणाला दोनच हात मानले जातात. अष्टदिशांचा विचार केला तर आठ, आणि दशदिशांचा विचार केला तर दहा हात. अशा या हातांसंबंधी विविध कल्पना आहेत.

चतुर्भुज नारायणाच्या हातांसंबंधी ज्ञानेश्वरांनी फार सुंदर काव्यमय कल्पना केली आहे :

**दोंवरी दोन्ही। भुजा आलों घेवोनी।**
**आलिंगावयालागोनी। तयाचा देह॥**
**तया पहावयाचे डोहाळे। म्हणून अचक्षूसी मज डोळे।**
**हातींचे नि लीलाकमळे। तयासी पुजूं॥**

कृष्णरूपी नारायण अर्जुनाला सांगतो, "मी निराकार असूनहि साकार झालों याचें कारण माझ्या भक्ताला डोळे भरून पाहण्याची मला ओढ लागली आहे. त्या भक्ताला प्रेमपूर्वक दृढालिंगन देतां यावें म्हणून मी चतुर्भुज बनलों आहें. हातांतल्या कमळांनी माझ्या भक्ताची पूजा करायला मी उत्सुक झालों आहें."

पांचजन्य शंख, सुदर्शन चक्र, कौमोदकी गदा व पद्म हीं या नारायणाचीं चार आयुधें आहेत. हीं आयुधें स्थूल स्वरूपाचीं नसून त्या निरनिराळ्या चैतन्यशक्ति आहेत आणि आपल्या भक्ताच्या रक्षणार्थ नारायण या चैतन्यशक्तींचा उपयोग करीत असतो. स्कन्दपुराणांत या आयुधांबद्दल पुढील श्लोक आढळतो:

"ज्ञानाहङ्कारकैश्वर्यशब्दब्रह्मासि केशव।
चक्रपद्मगदाशङ्खपरिणामानि धारयन्॥"

"हे केशवा, ज्ञान, अहंकार, ऐश्वर्य व शब्दब्रह्म यांच्या परिवर्तित रूपांत चक्र, पद्म, गदा व शंख तूं धारण केले आहेस."

हा नारायण भक्तवत्सल आहे. त्याला आपल्या भक्तांचें विलक्षण वेड आहे. आपल्या भक्तांच्या प्रेमासाठी तो भुकेला आहे. "यत्र गायन्ति मद्भक्तास्तत्र तिष्ठामि नारद।" असें त्याने नारदाला सांगितलें आहे. जिथे त्याचे भक्त त्याचें नामसंकीर्तन करीत असतात तिथे तो नेहमीच हजर असतो. आपल्या भक्ताची हाक ऐकूं येतांच क्षीरसागरांतील शेषशय्या सोडून तो भूतलावर धावत येतो.

त्याला प्रसन्न करून घेण्यासाठी घोर तपश्चर्येची गरज नाही. तो केवळ खऱ्या भक्तीचा भुकेला आहे. ती ज्याच्या हृदयांत आहे त्याच्यावर तो प्रसन्न आहे. भक्ताने मनःपूर्वक अर्पण केलेल्या 'पत्र, पुष्प, फल अगर तोय' यावरहि तो तृप्त आहे. आणि हें त्याने आपल्या विविध अवतारांत जगाला दाखवून दिलें आहे. शबरीच्या बोराने प्रसन्न होणारा श्रीराम, द्रौपदीच्या थाळीला चिकटलेल्या भाजीचें पान खाऊन ढेकर देणारा श्रीकृष्ण अगर गजेन्द्राच्या एका फुलाने वैकुंठांतून खाली उतरणारा श्रीविष्णु हीं सारीं त्या नारायणाच्या भक्तवत्सलतेचींच उदाहरणें आहेत.

या नारायणानेच आपल्या नाभिकमलांतून सृष्टि उत्पन्न करणाऱ्या ब्रह्मदेवाला जन्म दिला. म्हणजे या सृष्टीच्या उत्पत्तीला नारायणच एक प्रकारें कारणीभूत झाला आहे. विश्वाची उत्पत्ति, प्रतिपाल आणि लय हीं जीं तीन ईश्वरी कार्यें त्या कार्यांतील विश्वाच्या प्रतिपालाचें काम या नारायणाने

स्वतःकडे घेतलें आहे. ज्या ज्या वेळीं या भूतलावरच्या दुष्ट प्रवृत्ति वाढीला लागल्या, साधुजनांचा छळ होऊं लागला आणि धर्माला ग्लानि आली त्या त्या वेळीं पृथ्वीवरील हें संकट टाळण्यासाठी नारायणाने अवतार धारण केला आहे. भक्तप्रतिज्ञा खरी करण्यासाठी कृष्णावतारांत त्याने प्रतिज्ञा मोडून शस्त्र हातांत धरलें; व भक्त अंबरिषाचा कैवार घेऊन दुर्वास ऋषींनी त्याला दिलेला शाप आपल्या अंगावर घेऊन दुर्वासांचाहि शब्द खरा केला. अशा रीतीने दोन्हीं भक्तांची लाज राखण्याकरिता नारायणाला दहा गर्भवास भोगावे लागले.

धर्मराजांनी भीष्मांना प्रश्न केला—"पितामह, सर्वांत श्रेष्ठ देव कोण?" त्यावर भीष्माचार्य सांगतात, "हे अजातशत्रो, सर्व दैवतांत परम श्रेष्ठ दैवत विष्णु हेंच होय. त्याला आदि नाही किंवा अंतहि नाही. नवविधा भक्तीने त्याला आळविलें असतां उत्तम पदाची प्राप्ति होते. सृष्टीचें उत्पन्न करणारा व तिचें पालनपोषण करणारा सच्चिदानंदपरमात्मा तोच होय. यज्ञयागासारख्या गोष्टींनी किंवा जपतपाच्या अवडंबरांनी त्याला वश करतां येत नाही. त्याला शुद्ध भावाची निवृत्त अशी निष्काम भक्ति फार आवडते. आणि यालाच वासुदेव किंवा वैष्णवधर्म असें म्हणतात. अधर्माचें उच्चाटन करणारा नारायणासारखा श्रेष्ठ देव नाही. द्वादशीच्या दिवशीं त्याचें व्रत करावें म्हणजे तें कल्याणकारक होय!"

विश्वाधिपति, भक्तरक्षक, भक्ताभिमानी, अनंतकोटि ब्रह्मांडनायक राजाधिराज तो जगत्पालक नारायण...!

जेव्हा नारायण अवतार घेतो तेव्हा लक्ष्मीहि त्याची सहचरी होण्याकरिता बहुधा अवतार घेत असते. वामन अवतारांत ती पद्मा झाली, परशुराम अवतारांत तिने धरणीचें रूप घेतलें, राम अवतारांत ती सीता बनली आणि कृष्ण अवतारांत ती रुक्मिणी होऊन आली. नारायणाच्या सेवेसाठी लक्ष्मी अशा तऱ्हेने सदैव तत्पर आहे. जिथे तो जाईल तिथे ती त्याच्या मागोमाग जाते.

लक्ष्मीचीं एकंदर आठ स्वरूपें सांगण्यांत येतात. आणि हीं आठहि

स्वरूपें महालक्ष्मी या तिच्या स्वरूपांत समाविष्ट आहेत. धनलक्ष्मी, धान्यलक्ष्मी, धैर्यलक्ष्मी, शौर्यलक्ष्मी, कीर्तिलक्ष्मी, विनयलक्ष्मी, राज्यलक्ष्मी व संतानलक्ष्मी हीं तीं आठ स्वरूपें. तिच्या या स्वरूपावरून हें सिद्ध होतें की जें जें म्हणून समृद्धिदर्शक आहे, सुखकारक आहे, तेजस्वितेने नटलेलें आहे, आनंदाचें निधान आहे, तें तें सारें लक्ष्मीच्या स्वरूपांत समाविष्ट आहे. म्हणूनच जगाला तिचा मोह आहे. तिच्या कृपेसाठीं सारी दुनिया आसावली आहे.

पण असें असूनहि लक्ष्मीचें स्वतंत्र देवालय सहसा कोठे नाही आणि एखादें असलें तरी तें अपवादाच्या रूपांतच. लक्ष्मी ही मुळांत चंचल. आज ती प्रसन्न होईल आणि उद्या निघून जाईल. जो तिची इच्छा करील त्याच्यापासून ती दूर पळेल, ज्याला तिची इच्छा नाही त्याला ती प्राप्त होईल. तिची भक्ति कशी करावी आणि तिची कृपादृष्टि कशी मिळवावी हें ठरविणेंच कठीण! म्हणून तिची इच्छा करणारे सुद्धा नारायणाचेच पाय धरतात. लक्ष्मी आणि नारायण या उभयतांची भक्ति करतात. ज्याला नारायण प्रसन्न झाला त्याला लक्ष्मी प्रसन्नच आहे. कारण जिथे नारायण आहे तिथे तिचें अस्तित्व आहे.

— चित्रकार **भय्यासाहेब ओंकार**

× × ×



# भारतीय स्त्रीत्वाचें महान् गाणें

*तां सुमध्यां पृथुश्रोणीं प्रतिमां काञ्चनीमिव ।*
*प्राप्तेयं देवकन्येति दृष्ट्वा संमेनिरे जनाः ॥*
*तां तु पद्मपलाशाक्षीं ज्वलन्तीमिव तेजसा ।*
*न कश्चिद्वरयामास तेजसा प्रतिवारितः ॥*

—वनपर्व, महाभारत

*ती कनकाची पुतळी केवळ नितंबिनी सुंदरी*
*स्तिमित जनांना गमलें आली देवसुता भूवरी*
*राजिवराजस नेत्र, धगधगे तेजानें अंग तें*
*त्या दीप्तीनें दूर राहिलीं सकलांचीं वांछितें*

— कुसुमाग्रज



# भारतीय स्त्रीत्वाचें महान् गाणें



चिदंबरम् येथील
यमाचें एक शिल्प

गावाबाहेर वटवृक्षाचा दाट विस्तार आहे. मूळ वृक्ष कोणता आणि त्याचा वंश कोणता हें ओळखणेंहि कठीण आहे. बुंध्याला टेकून मी आकाशाकडे पाहत होतों. मला आकाश असें दिसतच नव्हतें. अगणित पानें मस्तकावर झुलत होतीं. आणि त्या पानांचा हिरवा रंग घेऊन मावळतीचा पिवळा प्रकाश वटवृक्षांच्या त्या राईंत पाझरत होता. सभोवार अमर्याद एकांत होता. केवळ झाडाचीं पानें तेवढीं सळसळत होतीं. आणि कोणी एक

रानपाखरूं तीव्र स्वरांत साद घालीत होतें. ती साद एकांताच्या त्या घुमटांत घुमत होती. त्या मंद धूसर, स्वप्नमय प्रकाशाने तळपणाऱ्या घुमटांत. "सावित्री—सावित्री"—ती साद घालत होती. "सावित्री—सावित्री"—फिरत्या डोळ्यांनी मी ऐकत होतों. आता दुसरें एक पाखरूं साद घालूं लागलें. "सत्यवान—सावित्री"—उंचस्वरांत तें लल्कारत होतें. "सत्यवान—सावित्री" ..."सावित्री—सत्यवान"...

आज दिवसभर मीं सावित्रीचें पुण्यनाम ऐकलें होतें. सुवासिनींनी आज उपोषण केलें होतें. शुचिर्भूत आणि सुभग अशा व्रतस्थ ललना वटवृक्षाला प्रदक्षिणा घालीत होत्या. सावित्रीच्या सत्त्वाला, सावित्रीच्या प्रेमाला, सावित्रीच्या निष्ठेला, सावित्रीच्या धैर्याला त्या वंदन करीत होत्या. सावित्रीपासून त्या प्रेरणा मागत होत्या, आशीर्वाद मागत होत्या. सालंकृत सुंदरींचे समूह आज सावित्रीचें गुणसंकीर्तन करीत होते. "सावित्री—सत्यवान", अनेक कंठांतून शब्द उमटत होते, "सत्यवान—सावित्री".

आणि तीं दोन पाखरें उंच स्वरांत परस्परांना साद-पडसाद देऊन लल्कारत होतीं, "सावित्री—सावित्री", "सत्यवान—सावित्री". अगणित हिरव्या पानांनी बांधलेल्या त्या वटवृक्षाच्या मनोऱ्यांत शब्द घुमत होते. शतकाशतकांतून! सहस्रावधि वर्षांतून! सावित्री-सत्यवानांच्या त्या प्रेमगंगेने त्या वटवृक्षाला अमरत्व दिलें होतें. ह्या वृक्षाने दिव्य प्रेमाचा तो सारा इतिहास मूर्तिमंत पहिला होता. ह्या वृक्षाने? खरोखर ह्या वृक्षाने? सावित्री ह्याने पाहिली होती? सत्यवान—सावित्री?

"होय. शाल्वकन्या सावित्री." तो स्वर म्हणत होता. सत्यवानाची सावित्री! राजा अश्वपतीची मुलगी सावित्री! प्रेममयी, तेजमयी, त्यागमयी, सत्त्वधीर, तपस्विनी सावित्री!

"तिला पाहिलं आहे तुम्हीं?" मीं विचारलें.

"होय!" त्या स्वराने उत्तर दिलं.

"तुम्हीं तिला कसं पाहिलं असाल?" साशंक स्वरांत मीं विचारलें.

"तूं मला पाहतोस हें खरं आहे की नाही?"

"खरं आहे."

"तर मग मीं सावित्रीला पाहिलं हेंहि खरं आहे. कारण मी तोच सनातन वृक्ष आहें. सावित्रीचं प्रेम जितकं सनातन, सावित्रीची तपस्या जितकी सनातन, सावित्रीची थोरवी जितकी सनातन, तितकाच सनातन मीहि आहें. मी जुना किंवा नवा नाहीं. मी तोच आहें."

"तूं—तुम्ही तेच आहांत?"

"होय, मी तोच आहें. माझं रूप तेंच आहे. माझे गुण तेच आहेत. माझी आकृति तीच आहे. माझी प्रकृतीहि तीच आहे. त्याच भूमींतील जीवनसत्त्वावर मी तसाच पोसला जात आहें. हीच ती भूमि आहे, व ह्याच मातींत माझीं मुळें खोलवर गेलीं आहेत. त्या मातीनेच मला माझे प्राण व गुण दिले आहेत. ह्या सनातन मातींतच मी अनादिकालापासून उभा आहें. ह्या मातीनेच सावित्रीलाहि निर्माण केलें. सावित्रीची परंपरा पोसणारी व फुलविणारी ती हीच माती आहे."

"तर मग सावित्रीला तुम्हीं पाहिली आहे एकूण!" अविश्वासाच्या स्वरांत मी उद्गारलों. "मला वाटलं कीं सावित्री ही केवळ कविकल्पना असेल."

"होय." तो वृक्ष उत्तरला. "सावित्री हें एक कविकल्पनेइतकेंच सुंदर सत्य आहे. कल्पना हेंहि एक सत्यच नाही काय? कल्पना सत्याला सजवीत नाही काय? कल्पनेंतूनच सत्य आकारास येत नाही काय? त्या कल्पनारम्य सत्यार्चीं कविकुलें गाणीं गात नाहीत काय? त्या सुंदर सत्यावर माणसें युगानुयुगें लुब्ध होत नाहींत काय? सावित्री हेंहि एक असेंच सुंदर व सनातन सत्य होतें! तें एक असेंच अमर प्रेमाचें, अमर्याद निष्ठेचें व अलोट धैर्याचें गाणें होतें. तें गाणें ह्या देशांतील स्त्रिया आजहि मोठ्या भक्तिभावाने आळवीत आहेत!"

"तर मग सावित्री काय केवळ एक गाणें होतें?" मीं विचारलें.

कांही क्षण शांततेचे गेले आणि मग त्या स्वरानें फार निश्चितपणें उत्तर दिलें, "गाणें आणि सत्य. सत्याचें गाणें. तें पाहा—तें प्रेमाचें सनातन सत्य, ती पाहा सावित्री......"

रानपाखरूं तीव्र स्वरांत साद घालीत होतें. ती साद एकांताच्या त्या घुमटांत घुमत होती. त्या मंद धूसर, स्वप्नमय प्रकाशाने तळपणाऱ्या घुमटांत. "सावित्री–सावित्री"–ती साद घालत होती. "सावित्री–सावित्री"–फिरत्या डोळ्यांनी मी ऐकत होतों. आता दुसरें एक पाखरूं साद घालूं लागलें. "सत्यवान–सावित्री"–उंचस्वरांत तें ललकारत होतें. "सत्यवान–सावित्री" ..."सावित्री–सत्यवान"...

आज दिवसभर मीं सावित्रीचें पुण्यनाम ऐकलें होतें. सुवासिनींनी आज उपोषण केलें होतें. शुचिर्भूत आणि सुभग अशा व्रतस्थ ललना वटवृक्षाला प्रदक्षिणा घालीत होत्या. सावित्रीच्या सत्त्वाला, सावित्रीच्या प्रेमाला, सावित्रीच्या निष्ठेला, सावित्रीच्या धैर्याला त्या वंदन करीत होत्या. सावित्री-पासून त्या प्रेरणा मागत होत्या, आशीर्वाद मागत होत्या. सालंकृत सुंदरींचे समूह आज सावित्रीचें गुणसंकीर्तन करीत होते. "सावित्री–सत्यवान", अनेक कंठांतून शब्द उमटत होते, "सत्यवान–सावित्री".

आणि तीं दोन पाखरें उंच स्वरांत परस्परांना साद-पडसाद देऊन ललकारत होतीं, "सावित्री–सावित्री", "सत्यवान–सावित्री". अगणित हिरव्या पानांनी बांधलेल्या त्या वटवृक्षाच्या मनोऱ्यांत शब्द घुमत होते. शतकाशतकांतून! सहस्रावधि वर्षांतून! सावित्री-सत्यवानांच्या त्या प्रेमगंगेने त्या वटवृक्षाला अमरत्व दिलें होतें. ह्या वृक्षाने दिव्य प्रेमाचा तो सारा इतिहास मूर्तिमंत पहिला होता. ह्या वृक्षाने? खरोखर ह्या वृक्षाने? सावित्री ह्याने पाहिली होती? सत्यवान–सावित्री?

"होय. शाल्वकन्या सावित्री." तो स्वर म्हणत होता. सत्यवानाची सावित्री! राजा अश्वपतीची मुलगी सावित्री! प्रेममयी, तेजमयी, त्यागमयी, सत्त्वधीर, तपस्विनी सावित्री!

"तिला पाहिलं आहे तुम्हीं?" मीं विचारलें.

"होय!" त्या स्वराने उत्तर दिलं.

"तुम्हीं तिला कसं पाहिलं असाल?" साशंक स्वरांत मीं विचारलें.

"तूं मला पाहतोस हें खरं आहे की नाही?"

"खरं आहे."

"तर मग मीं सावित्रीला पाहिलं हेंहि खरं आहे. कारण मी तोच सनातन वृक्ष आहें. सावित्रीचं प्रेम जितकं सनातन, सावित्रीची तपस्या जितकी सनातन, सावित्रीची थोरवी जितकी सनातन, तितकाच सनातन मीहि आहें. मी जुना किंवा नवा नाहीं. मी तोच आहें."

"तूं—तुम्ही तेच आहांत?"

"होय, मी तोच आहें. माझं रूप तेंच आहे. माझे गुण तेच आहेत. माझी आकृति तीच आहे. माझी प्रकृतीहि तीच आहे. त्याच भूमींतील जीवनसत्त्वावर मी तसाच पोसला जात आहें. हीच ती भूमि आहे, व ह्याच मातींत माझीं मुळें खोलवर गेलीं आहेत. त्या मातीनेच मला माझे प्राण व गुण दिले आहेत. ह्या सनातन मातींतच मी अनादिकालापासून उभा आहें. ह्या मातीनेच सावित्रीलाहि निर्माण केलें. सावित्रीची परंपरा पोसणारी व फुलविणारी ती हीच माती आहे."

"तर मग सावित्रीला तुम्हीं पाहिली आहे एकूण!" अविश्वासाच्या स्वरांत मी उद्गारलों. "मला वाटलं कीं सावित्री ही केवळ कविकल्पना असेल."

"होय." तो वृक्ष उत्तरला. "सावित्री हें एक कविकल्पनेइतकेंच सुंदर सत्य आहे. कल्पना हेंहि एक सत्यच नाही काय? कल्पना सत्याला सजवीत नाही काय? कल्पनेंतूनच सत्य आकारास येत नाही काय? त्या कल्पनारम्य सत्याचीं कविकुलें गाणीं गात नाहीत काय? त्या सुंदर सत्यावर माणसें युगानुयुगें लुब्ध होत नाहींत काय? सावित्री हेंहि एक असेंच सुंदर व सनातन सत्य होतें! तें एक असेंच अमर प्रेमाचें, अमर्याद निष्ठेचें व अलोट धैर्याचें गाणें होतें. तें गाणें ह्या देशांतील स्त्रिया आजहि मोठ्या भक्तिभावाने आळवीत आहेत!"

"तर मग सावित्री काय केवळ एक गाणें होतें?" मीं विचारलें.

कांही क्षण शांततेचे गेले आणि मग त्या स्वरानें फार निश्चितपणें उत्तर दिलें, "गाणें आणि सत्य. सत्याचें गाणें. तें पाहा—तें प्रेमाचें सनातन सत्य, ती पाहा सावित्री......"

डोळे फाडून मी पाहत राहिलों. विजेसारख्या तेजस्वी, फुलासारख्या कोमल, गंगेसारख्या विशुद्ध आणि निर्झरासारख्या चपळ अशा एका बालेची मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर साकार झाली होती. "सावित्री," श्वास आवरत मी म्हणालों, "सावित्री." माझें मन चाचपडत होतें. ती खरेंच सावित्री होती काय? ती काय माझ्या परिचयाची होती? तिला मीं कुठे पाहिलें होतें? कुठे पाहिलें होतें बरें मीं तिला? हें कोवळें वय आणि ही कठोर तपस्या! हें बालिश सौन्दर्य आणि ही भावनेची उत्तुंगता! हें लवचिक शरीर आणि ही वृत्तीची स्थिरता! हें निरागस स्मित आणि ही निष्ठेची सखोलता! हा दुबळा देह आणि हें दुर्दम्य सामर्थ्य! प्रत्यक्ष मृत्यूला सामोरें जाणारें! प्रत्यक्ष मृत्यूवर मात करणारें! सारें जग जेथे हतबल होतें, तेथेहि हिची इच्छा बलवत्तर ठरली, हिची निष्ठा बलवत्तर ठरली! जेथे सारें जग पराभूत होतें तेथें हिचें प्रेम विजयी ठरलें! प्रत्यक्ष कृतांतासमोर! प्रत्यक्ष मृत्यूने हिच्या सौभाग्याला पुनर्जन्म दिला! अंध द्युमत्सेनाला त्याने दृष्टीचें वरदान दिलें. त्या विजनवासी राजाला सिंहासनाचें वरदान दिलें! शैब्येला त्याने पुत्रांचें वरदान दिलें. सत्यवानाचे हरण केलेले प्राण त्याने परत केले. एका कोवळ्या पोरीसमोर प्रत्यक्ष मृत्यूने माघार घेतली! हें सारें कसें घडलें असेल? सावित्री यमधर्माला काय म्हणाली असेल? प्रेममयी सावित्री यमधर्माला म्हणाली असेल की,

'हे यमधर्मा, मी सावित्री, सत्यवानाची पत्नी, तुझ्या मागोमाग येत आहें. आपल्या ह्या मुलीवर कृपा कर, साऱ्या स्त्रीजातीवर कृपा कर, आणि माझा सत्यवान मला परत दे. सत्यवानावर मीं प्राणाधिक प्रेम केलें आहे. मद्रदेशाच्या ह्या विजनवासी राजपुत्रापेक्षां अधिक प्रिय मला कांहीहि नाही. मीं वैभवावर प्रेम केलें नाही अथवा सत्तेवर प्रेम केलें नाही. ह्या गुणशाली व तापसी सत्यवानावर मीं प्रेम केलें. माझा पति म्हणून ह्या गुणसुंदर पुरुषाला माळ घालतांना दारिद्र्याचें भय मीं बाळगलें नाही, वनवासाचें भय बाळगलें नाही, आणि हे सर्वशक्तिमान् मृत्यो, तुझेंहि भय मी बाळगलें नाही.

'हे मृत्यो, तुझ्या सामर्थ्याला माझे प्रणाम असोत. पण तुझ्या

सामर्थ्याचा प्रहार तूं माझ्या सत्यवानावर करूं नकोस. कारण तो प्रहार एकनिष्ठ प्रेमावर पडेल. तो प्रहार तारुण्यसुलभ स्वप्नांवर पडेल. तो प्रहार पतिव्रतेच्या पुण्याईवर पडेल. पतिव्रतांच्या सामर्थ्यावर पडेल. हे दयाळू यमधर्मा, आपल्या राज्याला आणि आपल्या वैभवाला मुकलेला हा सत्यवान आपल्या प्राणांनाहि मुकणार आहे. आमच्या विवाहघटिकेपासून एका वर्षातच तो तुझ्या स्वाधीन होणार आहे, हें विधिलिखित नारदानें माझ्या पित्याला सांगितलें होतें. हें भीषण भविष्य माझ्या पित्यानें मला अश्रुपूर्ण डोळ्यांनी कंथन केलें होतें. आणि तरीहि मी सत्यवानाशीं विवाहबद्ध झालें. सत्यवानावर माझें प्रेम जडलेलेंच होतें. मरणभयानें जें माघार घेतें तें प्रेम कसलें? जें कच खातें, जें चळतें, जें सुखदुःखाचे हिशेब करतें तें प्रेम कसलें? यमधर्मा, प्रेम करतांना मीं हिशेब केला नाही, प्रेम करतांना मीं भय बाळगलें नाही. मला माझा सत्यवान पाहिजे होता—आमरण पाहिजे होता व मरणोत्तरहि पाहिजे होता. मी त्याची पत्नी म्हणून जगणार होतें व त्याचीच पत्नी म्हणून मरणार होतें! एक क्षण, एक वर्ष, अनंत-काल! पण सावित्री पत्नी होती सत्यवानाचीच. तो दरिद्री असेल, वनवासी असेल, तापसी असेल व परागंदाहि असेल! परंतु छायेंत अथवा प्रकाशांत, सुखांत अथवा दुःखांत, जीवनाच्या राज्यांत अथवा मृत्यूच्या साम्राज्यांत त्याची पडछायेप्रमाणें सोबत करणें हेंच माझें, त्याच्या पत्नीचें, कर्तव्य होतें! तेंच कर्तव्य यमधर्मा, ह्या भूमीच्या परंपरेनें मला शिकविलें आहे! तेंच कर्तव्य तुझ्या साक्षीनें मी पार पाडीत आहें.

'अल्पायुषी?–नाही–नाही यमधर्मा! पतिव्रतेचें सौभाग्य अल्पायुषी कसें असेल? एका निष्पाप मुलीचें प्रेम अल्पायुषी कसें असेल? तिची निष्ठा अल्पायुषी कशी असेल? श्रद्धा अल्पायुषी कशी असेल? तिचें सुख अल्पायुषी कसें असेल? सत्यवान अल्पायुषी कसा असेल?

'हे परम न्यायी व परम कृपाळू यमधर्मा! जर्जर जरा अल्पायुषी असावी! पाप अल्पायुषी असावें! पुण्य अल्पायुषी कसें असेल? तारुण्य अल्पायुषी कसें असेल? सत्यवान अल्पायुषी कसा असेल? सावित्रीचें कुंकू,

सावित्रीचें सौभाग्य अल्पायुषी कसें असेल ? सावित्रीच्या सत्यवानावर प्रेतकळा आली तर निरागस प्रेमावर प्रेतकळा येईल ! निष्ठेवर प्रेतकळा येईल ! पतिव्रतांची तपश्चर्या निष्फल ठरेल ! अमर्याद प्रेमाला व अविचल निष्ठेला वैधव्याचें प्रायश्चित्त मिळतें असा विपरीत अनुभव आला तर जगांत आकांत उडेल ! सत्य हेंच पाप ठरेल ! नीति हीच अनीति ठरेल ! प्रेम हाच अपराध ठरेल ! असें जर झालें तर साध्वींचा व सद्गुणांचा आधारच तुटेल. मग धर्मावर कोण खरें श्रद्धा ठेवील ? म्हणून म्हणतें, देवा यमधर्मा ! माझा सत्यवान तूं मला परत दे ! पतिव्रतेच्या प्रार्थनेला तूं यश दे. तुझें सामर्थ्य मी नाकारीत नाहीं, पण प्रेमाचें सामर्थ्य तुला तरी कसें नाकारतां येईल ? पातिव्रत्याचें सामर्थ्य तूं तरी कसें नाकारशील ? उत्कट आणि एकनिष्ठ भावना मृत्युंजय असतात हेंहि जगाला पाहूं दे ! ह्यांतच माझा तरणोपाय आहे ! माझा सत्यवान मला परत दे आणि साऱ्या स्त्रीजातीला आशेचें वरदान दे ! अमर निष्ठेचें वरदान दे !

'माझ्या श्वशुराला दृष्टिलाभ ! दृष्टिलाभ आणि पुत्रलाभ ! पुत्रलाभ आणि राज्यलाभ ! प्रणाम !—यमधर्मा ! त्रिवार प्रणाम !—ह्या तुझ्या वरदानासाठी त्रिवार प्रणाम ! पण सावित्रीला राज्याचा लोभ नाही ! वैभवाची तिला अभिलाषा नाही ! सत्तेचा तिला मोह नाही ! सावित्रीला कांही वेगळंच हवं आहे ! ह्या तुझ्या मुलीची केवळ एकच आस आहे. जें मरणास योग्य, तें तूं मारून टाक. पण जें जगावयास योग्य तें तूंहि जगविलेंच पाहिजेस ! विनाशाच्या कुशींतूनहि तूं तें जन्मास घातलें पाहिजेस ! सावित्रीला, ह्या तुझ्या मुलीला, तूं वैधव्य देशील काय ! प्रेममय श्रद्धा तूं अनाथ करशील काय ? मूर्तिमंत मातृत्व वांझोटें करशील काय ? तर मग मला काय पाहिजे ? कां म्हणून मी ठेचाळत तुझा मागोवा घेत आहें !—मला मातृत्व पाहिजे ! ऐकलेंस मृत्यूच्या महाराजा ! मला जन्मदात्रीचें सिंहासन पाहिजे !—दिलेंस ! माझ्या पित्या, माझ्या उपकारकर्त्या, माझ्या रक्षणकर्त्या, दिलेंस ! मातृपदाचें वरदान तूं मला दिलेंस !—तुझ्या ह्या अशक्त, कष्टी मुलीचे तुला शतशः प्रणाम ! तर मग तूं मला माझा सत्यवानहि दिलास ! स्त्रीजातीला तूं एक

नवी आशा दिलीस! प्रेमाला तूं एक नवें सामर्थ्य दिलेंस! निष्ठेला एक नवें बळ दिलेंस! तपश्चर्येस तूं एक नवें तेज दिलेंस! तो पाहा माझा सत्यवान पुन्हा चलनवलन करूं लागला!

'तें पाहा स्त्रीजातीचें सौभाग्य पुन्हा चलनवलन करूं लागलें! तें पाहा मातृजातीचें सुख पुन्हा चलनवलन करूं लागलें! माझा सत्यवान मला मिळाला! माझा सत्यवान मला मिळाला...'

मी सावित्रीकडे पाहत होतों. अंतराळांत अद्याप ती तशीच उभी होती. स्थिर, प्रेममय, करुणामय, हास्यमुख! सावित्रीची ती वंदनीय व व कमनीय मूर्ति मला परिचित वाटत होती!—कुठे? कुठे बरें पाहिलें होतें मीं हिला?—होय! हें तर गुणवती स्त्रीचें सनातन रूप होतें! कोमल आणि तरीहि बलाढ्य! मंद आणि तरीहि तेजस्वी! अवखळ आणि तरीहि सखोल! इवलेंसें आणि तरीहि उत्तुंग! मृत्यूला सामोरें जाऊन आणि मृत्यूला पराभूत करून माणसाला जीवनाचें वरदान देणारें!—परम पावन! परम मंगल! चिरसुंदर! चिरतरुण! सदा वंदनीय!—सावित्री? सावित्री?—होय-होय! ही तर स्त्रीजातींतील उत्तम मोहाची प्रातिनिधिक पुतळी होती! हा तर स्त्रीत्वाचा आत्मा होता, सुभग स्त्रीत्वाचें हें सार आणि सत्त्व होतें! सावित्री! सावित्री!—होय-होय! सावित्री! सावित्री! सत्यवानाची सावित्री! स्त्रीत्वाची देवता! मनुष्यतेची माता! सावित्री!—सावित्री!

तो प्रचंड वटवृक्ष पुन्हा एकदा पानापानांत सळसळला आणि मग गंभीर ध्वनि उठला—"बोल? ही कविकल्पना की सत्य!"

"सत्य!" मी जयघोष करीत ओरडलों. चिरंतन सत्य! सनातन सत्य! सुंदर सत्य! एकमेव सत्य! स्त्रीच्या प्रेमाचें सत्य! स्त्रीच्या त्यागाचें सत्य! स्त्रीच्या निष्ठेचें सत्य! स्त्रीच्या सामर्थ्याचें सत्य! स्त्रीच्या सौंदर्याचें सत्य! स्त्रीच्या उद्धारक शक्तीचें सत्य! स्त्रीच्या मातृत्वाचें सत्य!

—**पु. भा. भावे**

× × ×



# मर्यादापुरुषोत्तम श्रीराम

*रामं दूर्वादलश्यामं पद्माक्षं पीतवाससम् ।*
*स्तुवन्ति नामभिर्दिव्यैर्न ते संसारिणो नरः ॥*

—रामरक्षा

*हरळीचे दळापरी, सावळा, डोळे साम्य दाविती*
*कमळां, नेसला पीतांबर पिंवळा, श्रीराम तो,*
*तया श्रीरामाची स्तुति, दिव्य नामजपें जे करिती,*
*संसारामाजी असोनिया नसती, पुरुष ते,*

—ग. दि. माडगूळकर



# मर्यादापुरुषोत्तम श्रीराम



मद्रास म्यूझियममधील
'सीते'चे एक रेखीव शिल्प

वैवस्वत मनूला श्रद्धा नांवाच्या पत्नीपासून इक्ष्वाकु नांवाचा पुत्र झाला. त्याच्या सत्यशीलता, सदाचारप्रियता इत्यादि सद्गुणांकडे पाहून, मनूने आपलें साम्राज्य निश्चितपणें त्याच्या हवालीं केलें; परंतु इक्ष्वाकूने वडिलांपासून प्राप्त झालेल्या साम्राज्याचा एकट्याने उपभोग न घेतां आपल्या सर्व भावांना तें उचित रूपाने वांटून दिलें, व आपण स्वतः मध्यप्रदेशाचा अधिकारी झाला. अयोध्या ही त्याने आपली राजधानी बनविली.

याच इक्ष्वाकूच्या वंशांत पुढें अनेक महापराक्रमी, चारित्र्यवान् असे राजे होऊन गेले. महाराजाधिराज मांधाता, कालयवनाला नुसत्या

दृष्टिक्षेपाने भस्म करणारा मुचकुंद, ज्यानें समस्त हिंदवासियांना गंगेसारखा अमूल्य निधि दिला तो भगीरथ, परम भागवत धर्मात्मा राजा रुक्मांगद, सत्त्वधीर राजा हरिश्चंद्र, राजर्षि दिलीप, दानशूर राजा रघु व परमप्रतापी राजा दशरथ.

महाराज दशरथाला कित्येक राण्या होत्या; परंतु त्यांमध्यें कौसल्या, कैकेयी व सुमित्रा या तीन प्रमुख होत्या. वृद्धावस्था येऊं लागली तरी दशरथाच्या राज्याला उत्तराधिकारी होईना. म्हणून कुलगुरु वसिष्ठांच्या सल्ल्याने त्याने पुत्रकामेष्टि यज्ञ केला. साक्षात् अग्निदेव हवि घेऊन प्रकट झाले, व चार मुलांचें वरदान देऊन अंतर्धान पावले. दशरथ राजाच्या कौसल्या या ज्येष्ठ राणीच्या पोटीं सनातन पुरुष सच्चिदानंद भगवान् श्रीरामचंद्रांनी अवतार घेतला. कैकेयीला भरत व सुमित्रेला लक्ष्मण व शत्रुघ्न असे पुत्र झाले.

प्रभु रामचंद्रांनी अवतार घेतला त्याला कारणेंहि तशींच होतीं. भरत-खंडाच्या दक्षिणेला एका विराट राक्षसी सभ्यतेच्या अधिनायकाने प्रचंड धुमाकूळ माजवला होता. त्याचें साम्राज्य विशाल होतें; किंबहुना दक्षिण भारताच्या अधिकांश भागावर त्याचा अंमल चालत होता. सत्-चित्-शिवानंदाची पूजा करणाऱ्या आर्यांना रावणाच्या अनुयायांनी 'त्राहि भगवन्' करून सोडलें होतें. सद्धर्म लोपूं लागला. अधर्माने डोकें वर काढलें. वास्तविक एवढ्या मोठ्या धनकनकसंपन्न लंकेच्या साम्राज्याचा रावण हा अधिपति. त्याला दहा तोंडें होतीं, वीस हात होते. तो अतुलित पराक्रमशाली होता. महामुनि पुलस्त्यांचा तो नातू. त्याच्या वडिलांचें नांव विश्रवा व आईचें कैकसी. त्यानें अघोर तपस्या करून कांही ब्रह्मदेवापासून व कांही श्रीशिवापासून दुर्मिळ असे वर मिळविले व तो अजिंक्य झाला. ब्रह्मदेवाच्या वरप्रभावाने तो वाटेल तसा कायापालट करूं शके व जळीं, स्थळीं, आकाशांत मनमाना संचार करूं शके. मायावी प्रतिसृष्टि निर्माण करूं शकणाऱ्या मयासुराची धर्मपरायण मुलगी मंदोदरी ही त्याची पत्नी होती.

रावणाला अनुयायीहि तसेच पराक्रमी पण महाभयंकर असे राक्षस मिळाले. त्यामुळें लंकाधिपतीला आपल्या दुर्गुणांची उधळण करायला स्वतःचें साम्राज्य पुरेना. त्याने हिमालयापर्यंत आपले हात पसरविले. त्याचे निशाचर नरभक्षक अनुयायी मुक्तपणें भारतांत संचार करूं लागले. जप-तप-अनुष्ठानांत दंग असलेले ऋषिमुनि भयभीत झाले. त्यांना नित्य-कर्मेंहि करतां येईनात. कुणी वाली दिसेना. अशा वेळीं दुष्टांचें निर्दालन करून भक्तजनपालनार्थ प्रत्यक्ष भगवंतांनी चैत्र शुद्ध नवमीला मध्यान्हीं प्रभु रामचंद्राच्या रूपाने अयोध्येंत अवतार घेतला.

ज्या राजकुलांत प्रभूंनी जन्म घेतला त्या वंशांत धर्मपरायण, प्रजापालक, पराक्रमी, विद्याविनयसंपन्न असे अनेक नृपति होऊन गेले होते. दशरथ राजांतहि वरील सर्व गुण होतेच. तो राजनीतिविशारद, प्रजेवर पुत्रवत् प्रेम करणारा, देशाच्या उन्नतींत सदा लक्ष घालणारा, व एकवचनी असा होता. पित्याचे हे सर्व गुण प्रभु रामचंद्रांच्या अंगीं होतेच; परंतु त्यांचें व्यक्तिमत्त्व अत्यंत आकर्षक होतें. सुंदर मस्तक, भव्य ललाट, कमल-पत्रासारखे आकर्ण पाणीदार नयन, सरळ सुंदर नाक, आजानु बाहु, भव्य वक्षस्थल इत्यादि शुभलक्षणांनीं संपन्न, धैर्यवान्, कांतिमान्, जितेंद्रिय, नीतिज्ञ, असे होते. याशिवाय उत्तमांत उत्तम असे वक्ते, धर्मज्ञाते, सत्यप्रतिज्ञ, यशस्वी, ज्ञानी, पवित्र, श्रीसंपन्न, वेद-वेदांगांच्या तत्त्वांना जाणणारे, धनुर्वेधांत प्रवीण, अखिल शास्त्रांचे मर्मज्ञ, दांडग्या स्मरणशक्तीचे, प्रतिभासंपन्न व चतुर असे सकलगुणालंकृत असल्याने सर्व अयोध्यानिवासियांच्या हृदयाचे ते स्वामी व्हावे यांत आश्चर्य नाही.

वयाच्या सोळाव्या वर्षीं महर्षि विश्वामित्राच्या मखरक्षणार्थ गेले असतां ऋषींच्या यज्ञांत वारंवार विघ्न आणणाऱ्या ताटका, सुबाहु, मारीच आदि असंख्य राक्षसांचा त्यांनी निःपात करून त्या महामुनीच्या कृपाप्रसादाने अनेक दिव्यास्त्रें मिळविलीं. मिथिला नगरींत सीता-स्वयंवरासाठी जात असतांना वाटेंत अहिल्योद्धार केला. धनुर्भंग करून जानकी वरिली आणि अफाट धनसंपत्ति घेऊन श्रीराम अयोध्येला परत आले. इकडे राजा दशरथाने

कुलगुरु वसिष्ठांच्या सल्ल्याने रामचंद्राच्या राज्याभिषेकाची तयारी केली. दशरथाची दुसरी पत्नी कैकेयी हिनें मंथरा नांवाच्या दासीच्या शिकवणीने राज्याभिषेकांत ऐन वेळीं मोडता घालून व आधीच दशरथापासून मिळविलेले व अजूनपर्यंत तिने राखून ठेवलेले दोन वर याच वेळीं मागून, एका वराने श्रीरामचंद्राला चौदा वर्षे वनवासाला पाठवून दुसऱ्या वराने आपला मुलगा भरत याला राज्याचे उत्तराधिकार मिळावे असा घाट घातला. या सर्व प्रसंगाच्या नुसत्या जाणिवेने पित्याने दिलेल्या वचनाला बाध येऊं नये म्हणून प्रभु रामचंद्रांनी स्वेच्छेने वनवास पत्करला. आज्ञापालक अशा लक्ष्मणाला व पतिभक्तिपरायण अशा सीतेला बरोबर घेऊन ते वनवासाला जायला निघाले. सारी अयोध्या शोकाकुल झाली.

श्रीरामांनी दंडकारण्यांत प्रवेश करून विराध नांवाच्या राक्षसरूपी शापभ्रष्ट गंधर्वाचा वध करून त्याचा उद्धार केला व ते शरभंगऋषीच्या आश्रमांत आले. तिथे अत्यंत तेजस्वी, महातपस्वी असे ऋषि श्रीरामचंद्रांच्या दर्शनार्थ आले. प्रत्येकानें प्रभूंना अनेक वर दिले. यानंतर प्रभूंनी महाप्रतापी अगस्तींचें दर्शन घेतलें. त्यांनी दिलेल्या अक्षय भात्याचा व अनेक अस्त्रांचा स्वीकार करून प्रभु पंचवटींत येऊन राहिले. श्रीरामांची कीर्ति राजा रावणाच्या कानावर गेलीच होती. सीतास्वयंवरांत त्याचा अपमानहि झाला होता. त्या दुष्टकर्म्यानें नाना यत्नांनी प्रभूंचा मानभंग करायचा प्रयत्न केला; पण त्यांनी त्याला दाद दिली नाही. अखेर राम-लक्ष्मण आश्रमांत नाहीत असें पाहून रावणाने यतिवेषांत येऊन सीताहरण केलें. प्रभूंनी सुग्रीव नांवाच्या वानरप्रमुखाची व त्याचा सचिव जो महाबलाढ्य, मर्मज्ञ हनुमंत त्याची मदत घेऊन सेतु बांधून लंकेवर हल्ला केला आणि रावणादि दुष्ट राक्षसांना मारून भक्त बिभीषणाला लंकेचें राज्य दिलें व सीतेला घेऊन ते अयोध्येस परत आले.

रामराजांच्या सद्गुणांचें, चरित्राचें वर्णन करतांना महापंडितांच्या वाणीला, लेखणीला मर्यादा राहिली नाही. श्रीरामचंद्र सद्गुणांचा समुद्र होते. सत्य, सुहृदता, दया, क्षमा, शांति, गंभीरता, त्याग, मर्यादारक्षण, एक

पत्नीव्रत, मातृपितृभक्ति, गुरुभक्ति, भ्रातृप्रेम, शरणागतवत्सलता, प्रतिज्ञापालन, पवित्रता इत्यादि गुणांचा मर्यादापुरुषोत्तम श्रीरामांत पूर्ण विकास झाला होता. इतक्या महान गुणांची खाण अशी व्यक्ति आतापर्यंत या पृथ्वीच्या पाठीवर कुठेहि झालेली नाही. म्हणून आपण श्रीरामचंद्रांना श्रीविष्णूचा अवतार मानतों. लोकाराधनेच्या नादांत अपवादासारख्या क्षुल्लक गोष्टीची थोडीशीहि झळ लागूं नये म्हणून त्यांनी प्रातःस्मरणीय अशा पत्नीचा त्याग केला. "वडिलांनी नुसती आज्ञा केली तर वडवानलांत उडी घ्यायला मी कमी करणार नाहीं! पित्याची सेवा व त्याचें आज्ञापालन याहून श्रेष्ठ धर्म मीं मानत नाहीं. मग वनवास तो काय?" असें रोख उत्तर त्यांनी कैकेयीला दिलें. सीतेचा त्याग केल्यानंतर अश्वमेध यज्ञांत तिची आवश्यकता असतांना व सर्व हितचिंतक, पौरोहित्य करणारे ऋत्विज विनंती करीत असतांना सीतेची स्वर्णमूर्ति करून त्यांनी समारंभ साजरा केला, पण एकपत्नीव्रतपालक रामराजाने गरज म्हणून दुसरा विवाह केला नाही.

परदाराहरण करणाऱ्या वालीसारख्या बलाढ्य वानराचा श्रीरामांनी वध केला. वास्तविक सुग्रीवापेक्षा वाली कितीतरी पटीनें शक्ति-युक्तीने मोठा होता. रावणाला, आपल्या मुलाच्या पाळण्यावर विचित्र खेळणें म्हणून उलटा टांगणारा वाली श्रीरामांच्या अधिक उपयोगीं पडला असता; पण मित्रप्रेमाला जागून त्यांनी स्वार्थ पाहिला नाही. बिभीषण शरण आल्यानंतर शरणागत वत्सल रामांनी त्याला मोठ्या मनाने आश्रय दिला. "प्रिय हनुमंता, तुझ्या उपकारांच्या बदल्यांत मीं माझे प्राण दिले तरी तुझ्या उपकारांचें ऋण शेष राहील. सीताशुद्धि, लक्ष्मणाला प्राणदान इत्यादि गोष्टींनीं तूं अजर-अमर झालेला आहेस. केवळ माझ्यावर नव्हे तर समस्त रघुवंशावर तूं उपकार केलेले आहेस. तुला माझा आशीर्वाद आहे. चिरंजीव हो!" भक्तवत्सल रामाचे हे उद्गार महाकवींनी सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवलेले आहेत. अशा परंतप, साक्षात् अविनाशी अव्यक्त ब्रह्म असलेल्या श्रीरामांचें चरित्र सामान्य लेखणीने वर्णन करणें ही गोष्ट टिटवीने समुद्र आटवायला निघाल्यासारखी आहे. एकनाथ, समर्थ रामदास, श्रीधर, वामन, मोरोपंत आदि कवींनी

यथाशक्ति श्रीरामाचें गुणगान केलेलें आहे. ज्यांच्या महाकाव्याच्या आधारावर आजवरच्या सर्व कवींनी श्रीरामाचे गुण गायिले, त्या महाकवि वाल्मीकींना रामायण रचण्याच्या आधी आपल्या संकल्पित महाकाव्याला सर्वगुणसंपन्न अशा नायकाची जरुरी भासली. त्या वेळीं मुनि नारदांनी त्यांना रामचरित्र सांगून त्रिभुवनांत अलौकिक असा नायक त्या महाकाव्याला दिला.

भरतभूला ललामभूत झालेल्या रामचरित्राची मोहिनी केवळ भारतापुरतीच मर्यादित नाही, तर भारताबाहेरील अनेक देशांत रामचरित्रावरील प्रेम अनन्यसाधारण आहे. भारताशेजारील कित्येक देश रामचरित्र आपल्या-कडेच घडलें असें मानतात. किंबहुना कांही कांही देशांत तर 'अयोध्या' नांवाची नगरी व 'शरयु' नांवाची नदीहि आहे. ब्रह्मदेशांत 'रामावती' नांवाचें शहर आढळतें. तिथल्या उत्खननांत श्रीरामाच्या शेकडो मूर्ति सांपडलेल्या आहेत. 'रामयागन' या तिथल्या काव्यग्रंथाला अलौकिक असें स्थान आहे. सयामी लोकांना श्रीरामचंद्राचें चरित्र आपल्या देशांत घडलें असें वाटतें. सयामचा राजवंश 'रामाधिपति' अशी पदवी लावतो. व तेथील लोकहि स्वतःच्या नांवापुढे 'राम' हीं अक्षरें जोडतात. जसें 'महामतंगराम' वगैरे! सयाम किंवा ब्रह्मदेशांतहि रामलीलेचा उत्सव पिढ्यानपिढ्या चालत आलेला आहे. जावा, सुमात्रा, बोर्नियो, हिंदचीन आदि देशांतहि श्रीरामाबद्दल फार आदर व प्रेम आहे. अंगकोर, ईश्वरपूर या देशांत विशाल अशीं कित्येक राममंदिरें आहेत. रामचरित्रावर तिथे अनेक ग्रंथहि सांपडलेले आहेत. तुर्कस्थानांत, लंकेंत, तिबेटमध्ये देखील रामचरित्रावर अनेक हस्तलिखितें सापडलेलीं आहेत. याशिवाय जगांतील मोठमोठ्या भाषांतून रामायणाचे अनुवाद होतच आहेत. जावांतले लोक श्रीरामाला आपले पूर्वज समजतात व श्रीरामाचा जन्म तिथेच झालेला आहे असेंच समजतात.

'राम' या द्व्यक्षरी महामंत्राने 'भूत-प्रेत-समंधादि रोग-व्याधी समस्तही नासती' असें आपले पूर्वज सांगत आले. रामनामाने भगवान् शंकराच्या कंठांतील विषदाह शमन झाला. समर्थ रामदास म्हणतात, "उठोनिया

प्रातःकाळीं । जपा रामनामावळी । स्वयें ध्यातो चंद्रमौळी । शैल्बाळेसमवेत ।। राम योग्यांचें मंडण । राम भक्तांचें भूषण । राम धर्माचें रक्षण । संरक्षण दासांचें ।।"

अहिंसेच्या व्रतानें परदास्यशृंखला तोडून जगाला थक्क करून सोडणाऱ्या महात्म्यानेंहि इहलोक सोडतांना दोनच शब्द उच्चारले—हे राम ! हे राम !

—गोपालकृष्ण भोबे

× × ×

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१५६ वि: ८२-५ पाठ्य
क्रमांक ३०५ नों: दि: २८-८-६९



# भारताचें शक्तिस्थान

मनोजवं मारुततुल्यवेगं
जितेन्द्रियंम् बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥

मनावाऱ्याऐसी झेप वेगवान ।
इंद्रियें जिंकून वरकोटी ॥
असा ज्ञानवंत पूत वारियाचा ।
वानर वीरांचा गणराव ॥
दूत राघवाचा शोभे हनुमान ।
असो लोटांगण त्याच्या पायीं ॥

—मधुकर केचे



९२२९३



# भारताचें शक्तिस्थान

मनोजवं मारुततुल्यवेगं
जितेन्द्रियंम् बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥

मनावाऱ्याऐसी झेप वेगवान ।
इंद्रियें जिंकून वरकोटी ॥
असा ज्ञानवंत पूत वारियाचा ।
वानर वीरांचा गणराव ॥
दूत राघवाचा शोभे हनुमान ।
असो लोटांगण त्याच्या पायीं ॥

—मधुकर केचे

# भारताचें शक्तिस्थान



हनुमंताचे सीलोन येथील
एक आगळे शिल्प

"सौमित्रा, सुग्रीवाचा सचिव असलेला हा वानरराज त्याच्या लहानशाच, परंतु अर्थपूर्ण संभाषणावरून अत्यंत बुद्धिमान् वाटतो. ऋग्वेद् आणि यजुर्वेद् यांचा त्याने चांगलाच अभ्यास केला असला पाहिजे. याच्या अत्यंत गोड वाणीवरून आणि जें त्याला सांगायचें होतें त्यांतल्या प्रत्येक वाक्याचा स्वर, लय आणि शब्दोच्चार यांवरून सामवेदांत तर हा निपुण वाटतो. ज्या राजाजवळ असा दूत असेल, त्या राजाचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. शत्रूदेखील याच्या या मिठ्ठास वाणीवर लुब्ध होतील. म्हणून हे लक्ष्मणा, याच्याशीं स्नेहपूर्ण आणि तितक्याच मधुर वाणीने संभाषण कर !"

असे उद्गार सुग्रीवाचा निरोप घेऊन आलेल्या हनुमंताला उद्देशून, श्रीरामाने लक्ष्मणाजवळ काढले. यानंतर राम-लक्ष्मणाशीं झालेल्या पहिल्याच भेटींत, आपलीं कांही वैशिष्ट्यें सांगतांना आरंभींच सुग्रीव सांगतो, "रघुनंदना, माझ्या मंत्रिमंडळांतील सर्वश्रेष्ठ, अतिशय बुद्धिमान् आणि बलाढ्य, ज्याला सर्व सिद्धि वश आहेत, शिवाय जो एकनिष्ठ असून स्वामिनिष्ठहि आहे अशा या हनुमंताने मला तुझी सर्व हकीकत सांगितली."

मारुतीच्या योग्यतेविषयींचीं वरील दोन वर्णनें वाल्मीकि-रामायणांतल्या किष्किंधाकांडांत प्रथमदर्शनींच सापडतात. वालीचा वध झाल्यावर त्याच्या तारा आणि इतर पत्न्यांनी अपार शोक केला. त्या प्रसंगीं विकल झालेल्या सुग्रीवाने त्यांचें सांत्वन करायची विनंती, प्रथम हनुमंतालाच केली. हनुमंताने शोक आवरण्यासाठीं तारेला केलेला उपदेश आणि संसार असार असल्याचें त्याने केलेलें निरूपण, प्रगल्भ आहे. राज्य मिळाल्यानंतर स्वेच्छाचारी झालेला सुग्रीव, रामाला दिलेलें वचन विसरला; परंतु योग्य वेळींच त्याला सावध करण्याकरितां आलेला मारुती, कठोर नव्हे, पण मर्यादितहि नव्हे असें जें जागृत करणारें सुंदर भाषण करतो त्याला तोड नाहीं. राजाने कोणत्या वचनाला कसें जागलें पाहिजे याबद्दल त्याने केलेलें विवेचन मुद्देसूद तसेंच मार्मिक आहे.

सीतेच्या शोधासाठी प्रस्थान करणाऱ्या शेकडो पराक्रमी वानरांत सुग्रीवाचा सर्व भार होता तो हनुमंतावरच. त्या सर्वांसमोर उपदेशपर भाषण केल्यावर हनुमंताचा हात धरून त्याला श्रीरामाजवळ नेऊन सुग्रीव म्हणतो, "रामचंद्रा, अंतरिक्ष, पृथ्वी किंवा समुद्र या तिन्ही ठिकाणीं विहार करण्याची या महाकपीची गति सारखीच वेगवान आहे. नीतिशास्त्राचा हा पंडित असून, देशकालपरिस्थितीचें तसेंच भूत-भविष्य-वर्तमानाचें याला संपूर्ण ज्ञान आहे. आणि म्हणूनच माझा सारा विश्वास याच्यावरच आहे."

सुग्रीवाची ती हनुमंतस्तुति ऐकून श्रीराम प्रसन्न झाले. मारुतीला त्यांनी जवळ बोलावलें, त्याला कडकडून आलिंगन दिलें, व खुणेसाठी त्याच्या हातीं आपली मुद्रिका देऊन ते म्हणाले, "कपिश्रेष्ठा, माझे बरेचसे कार्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम … दि: …
क्रमांक … नों: दि: …

तुझ्या हातून पूर्ण होईल यांत संदेह नाही. जा. तुला माझा पूर्ण आशीर्वाद आहे.

असा हा भीमरूपी वज्रदेही महारुद्र, विनयीहि तेवढाच होता. सीतेचा शोध लावून परत आल्यावर, सर्व वानरांनी किष्किंधेला परततांना अमाप उत्साहाच्या भरांत, मधुवनांत धुडगूस घातला; परंतु हा वानरश्रेष्ठ मात्र एका बाजूला एकांतांत आपल्या स्वामीची करुणा भाकीत उभा होता. आपण केलेला अचाट पराक्रम स्वतःच्याच मुखांतून श्रीरामाला कसा सांगावा, याची त्याला विवंचना पडली होती. भावार्थ रामायणांत एकनाथांनी अशा प्रसंगीं त्याच्या तोंडांत सुंदर ओव्या घातलेल्या आहेत. या वेळीं श्रीरामाचे पाय आठवून स्वतःला अत्यंत लहान समजून मारुती म्हणतो—

**धाव पाव गा श्रीरामा। माझा अपराध करीं क्षमा।**
**पडिलों संकटीं दुर्गमा। सर्वोत्तमा पाव वेगें॥**
**मीं तुझें निज बाळक। ज्ञानमूढ अति उत्संक।**
**क्षमा करोनि सकळीक। कृपा आवश्यक करीं मज॥**

शेवटीं ब्रह्मदेवाने त्याची ती अडचण निवारली. ताडपत्रावर हा सर्व इतिहास लिहून स्वदस्तुरीने त्यांनी रामाकडे द्यायला तो मजकूर मारुतीकडे दिला. रामदर्शनानंतर दिव्यमण्यांबरोबर ब्रह्मदेवाचें तें पत्र मारुतीने श्रीरामांना दिलें; परंतु स्वतःच्या मुखांतून एक अवाक्षरहि सांगितलें नाही. आपला थोडाहि पराक्रम स्वतःच्या मुखाने न सांगणारा इतका विनयी अवतार सबंध पुराणांत आणखी दुसरा नाहीं.

मारुतीच्या जन्माविषयी अनेक कथा प्रचलित आहेत. केसरी वानराच्या अंजनी नांवाच्या पत्नीने कैक संवत्सरपर्यंत तपश्चर्या करून महादेवाला प्रसन्न करून घेतलें आणि त्याच्या वरप्रभावाने तिला जो पुत्र झाला तोच हा हनुमंत. त्यांतहि एक जोडकथा अशी की, दशरथ राजाने जो पुत्रकामेष्टि यज्ञ केला त्या यज्ञांतून निघालेल्या प्रसादरूपी पायसाचे त्याने तीन हविर्भाग केले. त्यांतला एक हविर्भाग घारीने पळवला आणि तो घेऊन पळतांना तिच्या पायांतून गळून पडून दैवयोगाने नेमका तो अंजनीच्या

ओंजळींत पडला. तो शिवाचाच प्रसाद असें समजून अंजनीने भक्षण केला. त्यापासून तिला झालेल्या पुत्रावर मरुतहि आपला हक्क सांगूं लागला. आपणच घारीच्या हातून प्रसाद पाडायची किमया केली असें मरुताचें म्हणणें. असो !

देवांच्या वरप्रभावाने अंजनीचा हा पुत्र, परमप्रतापी, तसाच वज्रदेही झाला. श्रीरामचंद्राने त्याला चिरंजीव केलें. सप्त चिरंजीवांतला तो एक, मोक्षदायक.

द्विवेदी नांवाचे एक उत्तर हिंदुस्थानी शास्त्री, मारुतीचा जन्म 'स्वीडन' येथे झालेला आहे, असें वाल्मीकि-रामायणाचा आधार घेऊन स्वच्छ लिहितात. शम्बसादन म्हणजे स्वीडन, हरिणक्षेत्र म्हणजे हॉर्न, यमकोटिपत्तन = आस्ट्रेलिया, उमानदी = ओबी, मंगल = मंगोलिया, सूरसेन = सायबेरिया वगैरे वगैरे नामसादृश्यांतल्या जुळवलेल्या नामावळी देऊन तें सिद्ध करायचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे; परंतु तो हास्यास्पद वाटतो. कारण सुग्रीवाने सीतेच्या शोधार्थ पाठवलेल्या वानरश्रेष्ठांत ज्यांना ज्यांना ज्या ज्या दिशेची चांगली चांगली माहिती होती त्यांना त्या त्या दिशेला पाठवलें. पूर्वेकडे यूथपति नांवाच्या बलाढ्य वानराला ससैन्य पाठवला. सुषेण, अर्चिष्मान्, अर्चिर्माल्य या वानरांना पश्चिमेकडे पाठवलें. शतबळीला उत्तरेकडे पाठवलें आणि हनुमान्, अंगद, नील, जाम्बवान्, सुहोत्र आदि बलाढ्य वानरांना दक्षिणेकडे पाठवलें. मारुती जर स्वीडनमधून इथे आला असता तर त्याला तिथल्या देशांची अधिक माहिती असल्यानें सीतेच्या शोधार्थ तिथे पाठवलें असतें. सुग्रीवाने त्याला दक्षिणेकडेच कां पाठवलें ?

यावनी सत्तेच्या काळांत दीन, हीन, अनाथ झालेल्या महाराष्ट्राला चैतन्य प्राप्त करून देण्यासाठी समर्थ रामदासस्वामींनी संप्रदायाप्रमाणे अकरा मारुतींची स्थापना करून शक्तीची उपासना करायला शिकविलें. पुढे समर्थ-शिष्यांनी त्याच संप्रदायाचा फार मोठा प्रचार केला. कुठे आखाड्याच्या रूपाने तर कुठे लहानमोठ्या देवळांच्या रूपाने महाराष्ट्रभर झपाट्याने त्याचा प्रचार झाला आणि एका परीने हितकर अशा या देवाचें वैभव वाढलें.

मारुती हा महान् गायक होता. एकदा नारद आणि तुंबरु यांच्यांत परस्परांच्या श्रेष्ठतेविषयी वाद उत्पन्न झाला आणि तो विकोपाला गेला. मध्यस्थी करणाऱ्या श्रीविष्णूंनी त्यांना मारुतीची भेट घ्यायला सांगितलें. मारुतीच्या दर्शनासाठीं आलेल्या त्या उभयतांना दुरूनच असा एक स्वर ऐकूं येऊं लागला की, त्या स्वरांतला एकनाद कुठल्याहि वाद्यांतला नव्हता. तो जीवमात्राचा म्हणावा तर जीवमात्राला एवढा दमश्वास कुठून असणार? आणि इतका मधुर गायनाच्या ज्ञानाशिवाय येणें मुष्कील. दोघेहि आपसांतलें भांडण विसरून त्या स्वराच्या रोखाने झपाट्याने निघाले. जवळ जाऊन त्यांनी पाहिलें तों खुद्द मारुतिराय षड्जांत तल्लीन होऊन बसले होते.

—गोपाळकृष्ण भोबे

× × ×

१२२१३



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१६५८ वि: ...
२०५ नों: दि: ...

REFBK-0012213